म. ग्रं. सं. ठाणें
वि. कादंबरी
सं. नं. ६०१३

म. ग्रं. सं. ठाणें

विषय कादंबरी

लय क्रमांक ७४०

लेखक वि. ता. मुणगेकर आपटे

सन १८९३

पुस्तकाचें नांव रामभद्र भाग

३६१६

७४०
कांद

वा॰ का॰ ७०/२

Acc. 336
3
3696

वा॰ का॰ ७०/२

अनु - 980

मराठी ग्रंथ संग्रहालय

शामभट्ट.

(एक नामांकित जोशी)

आणि त्याचा शिष्य बटो यांचा वृत्तांत.

भाग ३ रा.

चिंतामण मोरेश्वर आपटे,

उत्तम शेतकरी, पुतळाबाई, सुमित्रनाटक, सत्यासत्यविचार या पुस्तकांचा कर्ता.

उमरावती, प्रांत वऱ्हाड.

आवृत्ति पहिली.

(हें पुस्तक आक्ट नंबर २५ सन १८६७ प्रमाणें नोंदून सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपणाकडे राखून ठेविले आहेत.)

सन १८९३.

किंमत १ रुपया.

(पोष्ट व प्याकिंग खर्च शिवाय.)

पुणें.
" जगद्धितेच्छु " छापखान्यांत छापिलें.
प्रती दोन हजार.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.

अनुक्रमणिका.

भाग तिसरा.

प्रकरण सोळावें—एका सरोद्यानें केलेली बड-बड. सरोदी कोण होता. ....पान १
प्रकरण सतरावें—एका मुलाच्या जन्मपात्रि-केवरून केलेलें भाकीत व त्याचा परि-णाम..... ... .पान १७
प्रकरण अठरावें—वीर आणि विद्वान् यांची तुलना.... ....पान ४३
प्रकरण एकुणिसावें—पुष्यनक्षत्रावर कार्य केल्याची सिद्धि. ....पान ९८
प्रकरण विसावें—पत्रिकेंतील ग्रहांचा गुणाव-गुण.... ....पान ७९
प्रकरण एकविसावें—श्री रामदासस्वामि यां-जकडे शामभट्टाची रवानगी. ....पान १०२
प्रकरण बाविसावें—स्वामींनीं शामभट्टास के-लेला उपदेश.... ....पान १२४
प्रकरण तेविसावें—उपसंहार. ....पान १४८

वा का ७०/२

शामभट्ट.

भाग तिसरा.

प्रकरण सोळावें.

ज्या रात्रीं शामभट्ट आणि बटो या दोघांमध्यें बटोच्या वागणुकीसंबंधानें करार झाला ती रात्र जाऊन दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं आपलीं नित्य-नैमित्तिक स्नानसंध्यादि कर्में सारून शामभट्ट नरसिंहभट्टाच्या ओसरीवर बसला होता व बटो कांहीं अंतरावर पोथी हातांत घेऊन पाठ ह्मणत उभा होता. पूर्व दिवशीं झालेल्या वादानंतर शाम-भट्टाला किंवा बटोला एकमेकाशीं भाषण करण्याची फारशी संधि सांपडली नाहीं; कारण दोघांमध्यें तह-नामा झाल्यावर लक्ष्मीपूजनाच्या पानविड्यासाठीं ते ांवांत फिरले व घरीं परत आल्यावर लवकरच सुख-शय्येवर जाऊन ते निजले. त्यानंतर गुरुशिष्यांस एके ठिकाणीं बसून बोलण्याचा हाच काय तो प्रसंग आला, परंतु पूर्व दिवशीं बसलेल्या चापट्यांची आठ-वण बटोला इतकी सुरेख राहिली होती कीं त्याला आपलें तोंड उघडवत नव्हतें. शामभट्टानें बोलण्याची सुरुवात केल्याशिवाय मी बोलणार नाहीं असा निश्चय

त्यानें केला होता. बटोच्या अपराधाची क्षमा शामभट्टानें केली होती, परंतु पुरे चोवीस तास जाण्यापूर्वीच आपला राग शांत झाला असें आपण दाखवूं नये असें त्यास वाटत होतें, ह्मणून तो हा कालपावेतों कारणावांचून फारसें बोलला नाहीं. परंतु या अबोल्याचा दोघांनाहि कंटाळा आला होता. आपलें घर नाहीं, दार नाहीं, इष्ट नाहीं, स्नेही नाहीं व आप्तहि नाहीं, अशा समयीं एकुलता एक आप्त ह्मणा, शिष्या ह्मणा किंवा सोबती ह्मणा, त्याचें व आपलें वैमनस्य वाढावें असें कोणासाहि वाटणार नाहीं. शामभट्टाचें व आपलें पूर्वीप्रमाणें सख्य व्हावें अशी बटोला इच्छा झाली होती व तशी शामभट्टालाहि होती, परंतु आपण स्वतः घालून दिलेल्या नियमाचें उल्लंघन आपणच कसें करावें असें शाममट्टास वाटत होतें, व आपण आपल्या गुरुजीची आज्ञा मोडल्यास पुन्हा मार खाण्याचा आपणावर प्रसंग येईल अशी भीति बटोला वाटत होती.

सासूबाईच्या धाकानें वाळलेली सून, सासूबाईची स्वारी पाय ताणून खुशाल बसली असतां जशी चोरट्यासारखी एका कोंपऱ्यांत जाऊन उभी राहते, (याबद्दल सासूबाईला वाईट वाटलें पाहिजे यांत संशय नाहीं.) किंवा न्यायाधिशापुढें जसा गुन्हेगार हात जोडून उभा राहतो, तशासारखा शामभट्टापुढें बटो उभा राहिला असतां रस्त्यांतून एक मनुष्य दरवाज्यांतून शिरून नरसिंहभट्टाच्या पडवींत येऊन पोहोंचला. या मनुष्याच्या डोक्याला लाल पागोटें बांधलेलें होतें व पागोट्यावरून रेशीमकांठी दुहेरी धोतराचे पदर

एकावर एक तिरपे टाकून कानाच्या मागें धोतराच्या पट्टींत खोंचलेले होते. त्याच्या कपाळावर गोपीचंदनासारखें पांढरें स्वच्छ त्रिपुंड गंध लाविलेलें होतें. त्याच्या आंगांत पायघोळ आंगरखा घातलेला होता व त्याच्या खांद्यावर जुनीं धोतरें व लुगडीं यांचा भारा होता. तो दुहेरी धोतर नेसलेला होता. त्याच्या पायांत जोडा नव्हता, परंतु त्याच्या हातांत जानव्याच्या जोड्यासारखा दोऱ्याचा गुंडाळा दिसत होता. हा मनुष्य नरसिंहभट्टाच्या दरवाज्यांतून आंत शिरल्यावर पुढें लिहिल्याप्रमाणें त्यानें आपल्या तोंडानें बडबड सुरू केली. ती ऐकून नरसिंहभट्ट व त्याचा मुलगा हे दोघे ओसरीवर आले आणि गोपिकाबाईहि त्यांच्या मागून कांहीं वेळानें ओसरीच्या दारांत येऊन उभी राहिली.

" औंदा या घराच नशीब लई जोरावर येईल बगा. औंदा या घराच्या मालकाच कल्यान व्हईल. औंदा या घरांत लक्षुमी वास करील." नरसिंहभट्ट माजघरांतून इतक्यांत बाहेर आला, त्याच्याकडे पाहून तो म्हणाला—" औंदा या बाबाच दोंद वाढल. तुला येक मुलगा व मुलगी व्हईल. औंदा राजलक्षुमी तुझ्यावर दय्या करील. " नंतर नरसिंहभट्टाच्या मुलाकडे पाहून तो म्हणाला—" या बाबाच औंदा लगन व्हईल. याच्या कपाळीं चांगली नवरी लिहिली आहे बगा. " इतक्यांत गोपिकाबाई ओसरीच्या दारांत येऊन उभी राहिली तेव्हां तिला अनुलक्षून सरोदी म्हणाला—" या घराची मालकीन मोठी पुन्यवान्

हाय. हिच्या पुन्याईन या घराला भाग्य येईल; आन् इच्या भाग्यान या घरांत लक्षुमी येईल; आन् इच्या भाग्यान या घराचा दरवाजा मोठा व्हईल. पन बाई, तुमच्या घरधन्याला शनीची पीडा आहे बगा. एक तांब्याचा ताईत मंत्रून त्याच्या हाताला बांधून दे, आन् हा एक मंतरलेला दोरा त्याच्या गळ्यामंदी बांधून दे, आन या सरोद्याला जुन वस्तर, चवली, पावली ओवाळून दान कर, मनजे शनीची पीडा दूर व्हईल. दान केल्यान पुन्य घडल, पुन्यान पीडा दूर व्हईल. या माझ्या सरोद्याच इतक वचन खर मान, आन् तुझ्या भाग्याला अजमावून पहा. एका चवली पावलीकड आन् तुझ्या जुन्या लुगड्याकड पाहूं नको, आन् आलेल्या लक्षुमीला पाठ दाऊ नको. "

रस्त्यांतून नरसिंहभट्टाच्या आंगणांत आल्यावर ओसरीवरून माजघरांत जाण्याचें दार समोर दिसत होतें व ज्या पडवींत शामभट्ट बसला होता व बटो उभा होता ती पडवी उजव्या हाताकडे होती. सरोदी समोर पहात असल्यामुळें पडवींत बसलेला शामभट्ट त्याला पहिल्यानें दिसला नाहीं, तो दिसला असता तर त्यानें त्याला अनुलक्षून एखादा आशीर्वाद झोंकून दिला असता. सरोद्यानें शनीच्या अनिष्टपणाबद्दल कांहींच भाषण केलें नसतें तर कदाचित् शामभट्टानें त्याच्या भाषणाकडे लक्ष्य दिलें नसतें, परंतु ज्योतिःशास्त्रांतील गोष्टींत सरोद्यानें जी ढवळाढवळ केली ती शामभट्टास खपली नाहीं. तो नरसिंहभट्टास म्हणाला— " ज्या मनुष्यास ओनामासी येत नाहीं किंवा ज्याला

बेबे चार आणि अठरा चोक बहात्तर इतकें सोपें गणित कळत नाहीं, त्याच्या बडबडण्यावर तुम्ही बिलकुल भरंवसा ठेवूं नका. त्याला मूठभर दाणे घालून चालता करा." ही शामदेवाची आज्ञा ऐकून नरसिंहभट्टानें सरोद्याला दाराबाहेर आधीं घालवून दिलें असतें, नंतर मूठभर दाणे आणून त्याला दिले असते, परंतु त्या अवकशांत सरोदी ओसरीवर येऊन नरसिंहभट्टाच्या मुलाचा हात पाहूं लागला होता,त्यामुळें नरसिंहभट्ट दाणे आणण्याकरितां आधीं घरांत गेला.शामभट्टाचा आवाज ऐकून सरोदी आपल्या मनांत चपापला. नरसिंहभट्टाचे मुलाचा हात सोडून देऊन तो एकदम शामभट्टाजवळ चालून गेला व त्याच्या पायांवर आपलें डोकें टेंकून तो म्हणाला—"अहाहा! महाराज, मला आज परत्यक्ष गर्गरुसींचें दर्शन झाल बगा. जसा मारुती रामाचे पाय धरतो, तसा हा गरीब सरोदी या गुरूच्या पायाला नम्मन करतो. गुरु लेंकराचा मायबाप आहे, गुरु गरीबाचा दाता आहे, गुरु अंधळ्याची काठी आहे, गुरु भुकेल्याची रोटी आहे." हें सरोद्याचें कृत्य पाहून शामभट्ट गुंग झाला, बटो आश्चर्यचकित झाला आणि नरसिंहभट्ट आपल्या ओंजळींत जोंधळे घेऊन आला तो वेड्यासारखा पाहूं लागला! सरोद्यानें शामभट्टास ओळखिलें याचें सर्वांना आश्चर्य वाटलें. नंतर सरोदी उठून उभा राहिला आणि नरसिंहभट्टाच्या मुलाला म्हणाला. "औंदा बाबा तुझं उखळ लई पांढर दिसतया. हा तुझ्या घरीं बाम्हन बसलाय्, हा बाम्हन नव्ह; देव हाय देव.

ह्यान इक्रम राजाला शनीच्या हातून सोडवल व्हत बगा. या घरामंदी शनीच वारसुद्धां तो पडून देन्हार नाहीं." ही सरोद्यानें केलेली स्तुति ऐकून शामभट्टास आनंद झाला. कळसूत्री बाहुल्यांचा खेळ होत असतांना त्यानें विक्रमराजाला शनीच्या पीडेपासून मुक्त केलें ह्या गोष्टीची त्याला आठवण झाली. तो म्हणाला—"बटो, इकडे ये. अरे, मी विक्रमादित्य राजाला दुष्ट दूतांच्या हातून सोडविलें व उज्जनी नगराला पाठवून दिलें; ही घडलेली खरी गोष्ट या सरोद्याच्या तोंडानें मी ऐकत आहें, तेव्हां याला सामुद्रिक लक्षणें समजत नाहींत असें मी कसें म्हणावें? सांग." नंतर तो सरोद्याला म्हणाला—"होय बेटा, तूं कथन केलेंस तें खरें आहे, तथापि तुझ्या पूर्वीच्या भाषणांत थोडीशी अतिशयोक्ति आहे, कारण मी आंधळ्याची काठी नाहीं, किंवा भुकेल्याची रोटी नाहीं. मी आपल्या विद्येच्या बळानें लोकांना नवग्रहांपासून पीडा होऊं देत नाहीं, हें मात्र खरें आहे. मी कोणाचें लग्न जुळवून देतों, कोणाला लढाईवर पाठवितों, कोणाचें घर बांधवितों, कोणाचा कान टोंचवितों, या सर्व कामांत लोकांना सुख होईल अशी काळजी घेतों व तजवीज ठेवितों. असें तूं म्हटलें असतेंस म्हणजे तूं अक्षरशः खरें बोललास असें झालें असतें."

शामभट्ट व बटो यांमध्यें झालेल्या अबोल्याचा कंटाळा बटोला आला होता, परंतु शामभट्टानें बोलण्याची सुरुवात केल्याशिवाय मी बोलणार नाहीं असा बटोनें निश्चय केला होता हें मागें सांगितलेंच आहे.

हा केलेला पण सिद्धीस गेला असें पाहून बटोला आनंद झाला. "शामभट्टानें मला जवळ बोलावून विचारिलें कीं सरोदी सामुद्रिक लक्षणें जाणत नाहीं काय ? एवढ्यावरून आपल्यामधील अबोल्याचा शेवट झाला," असें बटो आपल्या मनांत समजला. नंतर तो शामभट्टाजवळ आला आणि आपले दोन्ही हात जोडून त्यास म्हणाला— "गुरो, आपण विचारिलें म्हणून मी बोलतों. माझ्या गतापराधाची आपण मला क्षमा केली आहे व पूर्ववत् प्रेमांत घेतलें आहे असें समजून मी आपणाला उत्तर देत आहें. गुरु महाराज, या सरोद्याला सामुद्रिक लक्षणें चांगलीं समजतात अशाबद्दल माझ्या मनाची खातरी होत नाहीं; कारण विक्रमराजाला आपण सोडविलें ही गोष्ट शेंपन्नास लोकांदेखत झाली म्हणून त्यानें ती पाहिली असेल किंवा ऐकिली असेल. ज्या वेळेस आपण आणि मी असे दोघेजण एकटे होतों व अंधार किट्ट पडला होता, त्यावेळेस घडलेली गोष्ट तो बिनचूक सांगेल तर मात्र माझ्या मनाची खातरी होईल. आपण आज्ञा कराल तर मी त्याला तिज-विषयीं एक प्रश्न करतों."

शामभट्टानें बटोला उत्तर केलें—"हो हो, तूं म्हणतोस त्यांत तथ्यांश दिसतो आहे खरा. या सरोद्यानें नरसिंहभट्टाच्या मुलाचा हात पाहिला आणि त्याच्या हातावरून माझ्या कर्तृत्वाची वाखाणणी केली, ही गोष्ट आतां माझ्या लक्ष्यांत पक्की येऊन चुकली. मुसलमानांच्या बायका गोषांत असतात म्हणून त्यांच्या मणगटास नाडीचें एक टोंक बांधून दुसऱ्या टों-

कावर वैद्यानें आपलीं बोटें ठेवून जशी त्या बायांची नाडी पहावी तशी गत या सरोद्यानें केलेली दिसते खरी ! हा उंटावरून शेळ्या हांकणारा दिसतो. त्याच्या खरेपणाबद्दल मलाहि संशय येऊन चुकला होता. बटो, अलीकडे कीं नाहीं जो तो आपलीं सामुद्रिक लक्षणें सांगण्याला तयार होतो. जो उठतो तो आपला हात पहातो आणि सांगतो कीं ' तुझ्या आंगठ्याच्या पेरावर यवाकृति आहे तेव्हां तुला अन्नाची दादात पडणार नाहीं; तुझ्या हातावर कातर आहे तेव्हां तुझ्याजवळ मोठा द्रव्यसंचय होणार नाहीं; तुझ्या आयुष्याची रेषा मधल्या बोटापर्यंतच आहे, तेव्हां तूं साठ वर्षांच्यापुढें वांचणार नाहींस; नवराबायकोच्या प्रीतिदर्शक रेषा एकांत एक मिळाल्या नाहींत, तेव्हां तुझ्या बायकोचें व तुझें कधीं कधीं भांडण होईल. ' सामुद्रिक लक्षणांची अशी हुर्रेवडी उडाली आहे आणि खरें काय आहे तें कोणालाच कळेनासें झालें आहे. आतां पहा, ह्या गोष्टी अगदीं साहजिक आहेत. मिळविलेलें सर्व द्रव्य कोणाच्याच जवळ राहात नाहीं; कारण त्याला खर्च असतो. प्रत्येक बोटापलीकडे आयुष्यरेषा गेली म्हणजे दर बोटाला वीस वर्षें आयुष्य वाढतें असें लोक म्हणतात, पण मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे कीं ज्या मनुष्याची आयुष्यरेषा दोन बोटांच्यापलीकडे गेली नव्हती तो नव्वद वर्षांचा म्हातारा होऊन मेला आणि ज्याला लांबलचक रेषा होती तो अल्पवयांतच स्वर्गस्थ झाला. तसेंच नवराबायकोचें भांडण हें होणारच: पाण्यावर अनेक मडकीं तरंगत

असलीं तर वाऱ्यानें म्हणा किंवा पाण्याच्या ओघानें म्हणा, एकाला दुसरें येऊन लागणार यांत मोठीशी गोष्ट नाहीं. आतां तुझ्या मनांत एक प्रश्न करावयाचा असेल व आपली बालंबाल खातरी करून घ्यावयाची असेल तर तूं बेलाशक कर, तुला माझी मनाई नाहीं. त्याला खरी विद्या येत असेल तर माझीच गोष्ट खरी ठरेल. ”

सरोदी लोक बहुतेक चाणाक्ष असतात. लोकांचा विश्वास, धार्मिकपणा व भोळसरपणा, यांचा उपयोग ते आपणास तेव्हांच करून घेतात. आपल्या धूर्ततेनें गरीब बायाबापड्यांस ते कित्येक वेळां फसवितात. “ तुझा नवरा तुझ्या स्वाधीन होईल, तुला मुलगा होईल, तुझ्या वैरिणीचें कांहीं चालणार नाहीं ” अशा कोरड्या भुलथापा देऊन सरोदी लोकांनीं बायकांपासून द्रव्य उपटल्याचीं उदाहरणें ज्या लोकांच्या ऐकिवांत असतील, तेच अशा ढोंग्यांपासून सावध राहतील; परंतु ज्यांस सरोदी ढोंगी असतात हें माहीत नसेल ते सरोद्यांपासून गंडा, ताईत, किंवा अंगारा घेण्यास मागेंपुढें पाहणार नाहींत. शामभट्टाच्या भाषणांतील शेवटचें वाक्य ‘ त्याला खरी विद्या येत असेल तर माझीच गोष्ट खरी ठरेल ’ यावरून सरोद्यानें आपल्या उत्तराचें धोरण कसें बांधलें हें आतांच आपणांस कळून येईल. सरोद्यास प्रश्न करण्याविषयीं शामभट्टानें आपणास परवानगी दिली आहे, असें बटोस कळल्यावर तो सरोद्यास म्हणाला— “ अरे ए बुवा, तुला मी एकच प्रश्न विचारतों, त्याचें

उत्तर तूं बरोबर दिलेंस तर तूं अगदीं खरा सरोदी आहेस असें आह्मी समजूं व तुला काय द्यायचें तें देऊं. एके रात्रीं हे शामदेव महाराज घोड्यावर बसून वाट चालत असतां, त्यांच्या टांगांखालून घोडें निघून गेलें आणि ते दोन टेंकड्यांमध्यें जाऊन पडले, याचें खरें कारण काय होतें तें सांग. "

हा प्रश्न ऐकून सरोदी मोठ्या काळजींत पडला-सा दिसला, परंतु लागलींच त्यानें धोरण बांधलें कीं या गोष्टीविषयीं त्या दोघांमध्यें तंटा असावा व प्रत्येकाचें कारण वेगवेगळें असावें. त्यावरून दोघांनाहि पसंत पडेल असें उत्तर देण्याचें त्यानें आपल्या मनांत योजिलें. नंतर तो आपल्याशीं म्हणाला. "तुम्हीं मला एक वेळ फसविलें आहे, परंतु या वेळेस मी तुह्मांला फसवितों कीं नाहीं पहा" असें ह्मणून त्यानें आपल्या खाकेंतून एक कागद काढला. या कागदावर बारा कोष्टकें आंखलेलीं होतीं व प्रत्येक कोष्टकांत एक, दोन, तीन, चार ह्या अनुक्रमानें बारा आंकडे मांडलेले होते. तो कागद बटोच्या पुढें ठेवून तो ह्मणाला—"बामन बोवा, आपल्या मनामंदी मला मुरख ठरवायच आला हाय, पन माझ्या या गुरुच्या पुन्य परतापान मी ख्वटा ठरायाचा नाहीं बगा. मीबी लई देस आन लई इद्वान लोक पाह्यलेती. आन् या गुरूच्या पायापून् लई मोठ मानस बघल्याती. आन् या सरोद्याला कोनी लबाड ह्मंटल नाय्. या पोथीपुढ एक रुपया ठेवून द्या आन् जे मनामंदी असल ते ऐकताल बगा." परंतु या एवढ्याशा प्रश्नाबद्दल एक

वा. फा. ७०/२

सबंध रुपया काढून देण्याचा हिय्या बटोला झाला नाहीं. सरोदी लुच्चा आहे, तो पैसे उपटणारा आहे, अशा प्रकारचें निर्भर्त्सनायुक्त भाषण बटो करूं लागला. 'बामन्या, तुपातली माशी पिळून खाणारा' अशा प्रकारचीं नांवें सरोदी बटोला ठेवूं लागला. हें ऐकून शामभट्ट ह्मणाला. "अरे बटो, एक रुपया गेला तर जाऊं दे; तो माझा खर्च होईल." शामभट्टाची अशी आज्ञा झाल्यावर बटोनें एक रुपया काढून सरोद्यापुढें ठेविला. नंतर सरोद्यानें बटोला आपल्या इष्ट देवतेचें स्मरण करण्यास व देवाला नमस्कार करण्यास सांगितलें व बटोनें तसें केल्यावर कागदावरील कोणत्याहि एका आंकड्यावर आपलें बोट ठेवण्यास सांगितलें. बटोनें आपलें बोट टेंकल्यावर सरोद्यानें कागदास ह रुपया उचलून तो आपल्या खिशांत घातला आणि आपल्या तोंडानें पूर्ववत् बडबड करण्याचें काम सुरू केलें. तो म्हणाला—"आपल्या मन्नामंदी घोड्यावरून पडण्याच कारन आल हाय्, आन् ते कारन आपल्या मनाला ठाव हाय्. या सरोद्याला इचारुन उगच हैरान करन हाय् बगा. मातर आपल्या गुरुला शन्नीची लई दोड बाधा झालती, आन् इक्रमराजाला त्यान सोडवल व्हत, हे आपल्या परस्नामंदी लई आर्शावानी दिसल हाय् बगा. शन्नीदेव याहास्न थरथरा कापतोया आन् पीडाबी करतोया, याची परचिती आपल्याला आली हाय्. आता आपल चांगल दिवस आल हैति. आपल्याला लक्षुमीन पायल हाय्. आन् आतां आपल इघ्न गेल बगा. पोथीमंदी असच लिवल हाय्. या सरो-

च्याच्या वचनावर इश्वास ठेव. हें खोट ठरल तर या सरोद्याला हजार शिव्या दे. औंदा बाबाचा रोजगार वाढल, आन् औंदा बाबाला मुलगा व्हईल. आन् औंदा बाबाची पीडा दूर व्हईल." असें म्हणत सरोदी तेथून चालता झाला.

सरोदी गेल्यानंतर शामभट्ट आणि बटो या दोघांमध्यें थोडासा वाद सुरू झाला. बटो म्हणाला कीं शामभट्टाचे दोन्ही पाय टेंकड्यांवर अडकून तो उभा राहिल्यावर त्याच्याखालून तट्टू निघून गेलें ही गोष्ट खरी आहे असें सरोद्यानें सांगितलें. शामभट्ट म्हणाला कीं माझे दोन्ही पाय शनीनें उचलून धरिले होते हीच गोष्ट खरी आहे असें सरोद्यानें सांगितलें. त्या प्रत्येकास आपलें म्हणणें खरें आहे असें मानण्यास सरोद्यानें दिलेल्या उत्तरांत सारखा आधार होता. 'ते कारन आपल्या मन्नाला ठाव हाय्. या सरोद्याला इचारुन उगीच हैरान करन हाय्.' ह्या वाक्यांवर बटोचा विशेष जोर होता, आणि 'मातर आपल्या गुरुला शन्नीची लई दोड बाधा झालती.' या व आणखी अशा अर्थाच्या अन्य वाक्यांवरून आपलें म्हणणें खरें आहे असें शामभट्ट स्थापन करीत होता. ह्या वादाचा परिणाम कालच्यासारखा आपणासच सोसावा लागेल असें समजून बटोनें गय खाल्ली व निरुपायास्तव शामभट्टाचें म्हणणें खरें आहे असें कबूल केलें. तेव्हां तंटा तुटला; परंतु सरोद्यानें निश्चित असें कांहींच उत्तर दिलें नव्हतें ही गोष्ट त्यावेळेस बोलण्याच्या भरांत दोघांच्याहि लक्ष्यांत आली नव्हती.

हा सरोदा कोण होता हें सांगितल्यावांचून आपणाला त्याचें शहाणपण कळणार नाहीं. आठव्या प्रकरणांत कळसूत्री बाहुल्यांचा खेळ करणारा चित्रकार हा आपल्या ओळखीचा झाला आहे, त्यानेंच ह्या वेळेस सरोद्याचा वेष घेतलेला होता. बहुरुपी, कळसूत्राचा तमाशा करणारे, गारुडी किंवा टाकणकार[1] ह्या लोकांचा एकच एक धंदा नसतो; त्यांना एकाहून अनेक धंदे करावे लागतात. जो आपल्या घरीं दिवसास जात्याला टांकी लावण्यास येतो तोच मनुष्य कधीं कधीं आपलें घर रात्रीच्या वेळेस फोडतो; जो बहुरुप्याचें सोंग रोज सकाळीं आणतो तोच संध्याकाळीं फकीर अगर बैरागी बनून भिक्षा मागत गांवांतून फिरतो. यांपैकीं कांहींच्या बायका पोत विकीत रस्त्यांतून फिरतात. अशा प्रकारचा निरनिराळा धंदा केल्याशिवाय त्यांचें पोट भरत नाहीं. खेडेगांवांतून कळसूत्राचा तमाशा फारतर एकदोन वेळ कोणी करील, परंतु सरोद्याला आपला रोजगार चार पांच दिवस चालवितां येतो. हे लोक बहुतकरून गांवापासून दूर जाऊन रानामध्यें उतरतात व गांवकऱ्यांची दाट ओळख कधींहि करून घेत नाहींत. बाणेरें या गांवीं कळसूत्राचा खेळ चालला असतां शामभट्टानें बाहुल्यांचा विध्वंस केला होता, नंतर मोडलेल्या चित्रांच्या किंमती-

---

१ म्हणजे जातीं टाकणारे. ह्या लोकांची 'टाकणकार' या अडनांवाची एक जात आहे ती चोऱ्या करण्याच्या कामीं कुशल आहे.

बद्दल चित्रकारानें शामभट्टाजवळ मागणें केलें असतां त्यानें त्याच्या हातावर तुरी दिल्या होत्या, ह्या दोन गोष्टींची पक्की आठवण चित्रकारास राहिली होती, व त्या गोष्टी घडल्यापासून काय तो फक्त एकच दिवस आड गेला होता. बाणेरें या गांवीं तमाशा झाल्यावर चित्रकारानें लागलींच तेथून आपलें चंबूगवाळें उचललें असें पूर्वी सांगितलेंच आहे. गांवकऱ्याकडून मोडलेल्या चित्तांची किंमत त्यास भरून मिळाली होती तरी या थोड्या अवकाशांत त्याला नवीं चित्रें करतां आलीं नव्हतीं, म्हणून तीं तयार होईतोंपर्यंत त्यानें सरोदीपणाचा धंदा उचलला होता. शामभट्टाचें पुन्हा दर्शन होऊं नये असें जरी त्याच्या मनांत होतें तरी 'मनसाचिंतितंकार्यंदैवमन्यत्राचिंतयेत्' या वाक्याप्रमाणें ज्या गांवीं शामभट्ट येऊन पोहोंचला त्याच गांवीं तो चित्रकाराहि वाट चालत सहजीं आला. ज्या गांवांत बटोनें कुत्र्यांची ओरड माजविली होती त्याच गांवीं तो त्या रात्रीं वस्तीस राहिला होता, व दुसरें दिवशीं निघून तो पुरंदरास येऊन पोहोंचला.

सरोद्याचें सोंग घेतलेला चित्रकार नरसिंहभट्टाच्या मुलाचा हात पाहात असतां त्यानें शामभट्टाचें भाषण ऐकिलें तेव्हां आपलीं चित्रें मोडणाराचाच तो शब्द आहे असें सरोद्यानें तेव्हांच ओळखिलें. आपलीं चित्रें मोडल्यापासून शामभट्ट आपला वैरी आहे असें चित्रकार ऊर्फ सरोदी आपल्या मनांत समजत होता. शामभट्टाचा शब्द ऐकून सरोदी चपापला व लागलींच शामभट्टाच्या पायां पडला याचें कारण हेंच होतें. शा-

मभट्टाला शनीची बाधा आहे व विक्रमराजाला शामभट्टानें सोडविलें इत्यादि प्रकार त्याला माहीत होते, म्हणून शामभट्टाला फसविण्यासाठीं त्याला कांहींच वेळ किंवा मेहनत लागली नाहीं. परंतु चिलकार तोच सरोदी बनून आला आहे, हें शामभट्टास आणि बटोस माहीत नसल्यामुळें त्यांना मात्र त्याच्या भाषणाचा चमत्कार वाटला. नरसिंहभट्ट, त्याचा मुलगा व त्याची बायको, हा चमत्कार पाहून दिपून गेलीं होतीं. सरोदी निघून चालता झाला तरी नरसिंहभट्टाच्या हातांत जोंधळे जसेचे तसेच होते; ते सरोद्याच्या पदरांत घालण्याचें देहभान सुद्धां त्यास राहिलें नव्हतें! धर्मवेडे व भोळे लोकांची स्थिति नरसिंहभट्टासारखी होते; आतुर लोकांची स्थिति शामभट्ट व बटो यांसारखी होते.

सरोदी निघून गेल्यावर नरसिंहभट्ट घरांत गेला व आपल्या गृहकृत्यास लागला, त्याचा मुलगा खेळण्याकरितां शेजारच्या घरीं गेला आणि गोपिकाबाई स्वयंपाक सिद्ध करण्याकरितां स्वयंपाकघरांत गेली. शामभट्ट आणि बटो हे दोघे मात्र एकमेकांकडे टकमका पहात बसले. ते तसे कां पहात होते बरें? सामुद्रिक अगदीं खोटें आहे अशी जरी त्यांची समजूत नव्हती, तरी सरोद्याच्या शहाणपणावर दोघांचाहि विश्वास नव्हता हें उघड आहे. असें असूनहि ते दोघे फसले, या गोष्टीचें त्यांना आश्चर्य वाटत होतें म्हणून ते एकमेकांकडे टकमक पाहात बसले होते कीं काय कोण जाणे. असें आश्चर्य करीत त्यांस फार वेळ बसतां आलें नाहीं; कारण त्याच वेळेस एक गृहस्थ बाहे-

रून आंत आला व त्यानें विनंति केली कीं " माझ्या मुलाची जन्मपत्रिका करावयाची आहे, ती आपण करावी व मुलगा कसा निघेल याजविषयीं मला सांगावें. " प्रसिद्ध ज्योतिषी जवळ असल्यावर एरवींच्या जोशापासून आपल्या मुलाची जन्मपात्रिका करून घ्यावी असें कोणाहि समंजस मनुष्यास वाटणार नाहीं, हें ठीकच आहे. यापुढें शामभट्ट जोशानें त्या गृहस्थास काय सांगितलें व त्यापासून केवढा घोर अनर्थ घडला ह्या गोष्टी पुढच्या प्रकरणांत सांगितल्या आहेत.

प्रकरण सतरावें.

पत्रिका करण्यासाठीं आलेल्या गृहस्थानें मुलाचा जन्मदिवस व वेळ सांगितल्यावर शामभट्ट आपली पाटी घेऊन गणित करूं लागला. हल्लींप्रमाणें किल्ली देऊन चालणारीं व बिनचूक वेळ दाखविणारीं घड्याळें पूर्वी नव्हतीं, तरी तेव्हांच्या लोकांना मुलाचा जन्मकाळ तंतोतंत कसा कळत होता अशाविषयीं आतांच्या अभाविकांस शंका येईल. जुन्या काळच्या 'पिकल्या पानाच्या' तोंडून मीं असें ऐकिलें आहे कीं "मुलाचा जन्म रात्रीं झाल्यास अमुक तारा अमुक उंचीवर आला होता ही खूण ध्यानांत ठेवावी लागत असे, किंवा तो दिवसां झाला असल्यास सावली जोत्यापर्यंत आली होती असल्या प्रकारची निशाणी करून ठेवावी लागत असे. ह्या खुणेवरून जन्मपत्रिका तयार करतां येत होती व ती इतकी बरोबर उतरत होती कीं तिजवरून मूल कसें निघणार आहे हें निश्चयात्मक कळत होतें! हल्लीं बिनचूक वेळ दाखविणारीं घड्याळें असून पुष्कळ मुलांच्या पत्रिका खऱ्या ठरत नाहींत, किंवा जन्मकाळीं पडलेल्या ग्रहांचा गुण येत नाहीं हें नवल आहे." यावर मीं त्यास असें उत्तर दिलें कीं "हें कलियुगाचें माहात्म्य आहे." तें त्यांस मानलें.

शामभट्टानें कांहीं वेळपर्यंत गणित केल्यावर मुलाची जन्मकुंडली तयार केली व ती खरी आहे कीं

नाहीं तें ताडून पाहण्याकरितां त्यानें गोविंदपंतास (आलेल्या गृहस्थाचें हेंच नांव होतें) प्रश्न केला कीं, " तुमची बायको बाळंतीण झाली तेव्हां तिच्या खोलींत दोन बायका होत्या काय ? " गोविंदपंतानें उत्तर केलें—" त्या वेळेस तेथें बऱ्याच बाया जमल्या होत्या, परंतु खोलींत दोनतीनच असतील. " शामभट्ट म्हणाला. " पुष्कळ येणाऱ्या जाणाऱ्या बायकांसंबंधीं मीं विचारीत नाहीं. मुलाच्या जन्मकाळावरून दोनच स्त्रिया बाळंतिणीच्या खोलींत असाव्या असें निष्पन्न होतें, कारण म्हटलें आहे कीं (मीनेमेषस्त्रियौद्व्येचचतस्रोवृषकुंभयोः । तुलाकन्यकयोः सप्तबाणाख्याधनकर्कयोः ॥) मीनलग्नावर मुलाचा जन्म झाला असेल तर दोनच बाया बाळंतिणीजवळ असल्या पाहिजेत. " बायको बाळंत होण्याच्या वेळीं गोविंदपंतानें थोडेंच खोलींत जाऊन पाहिलें होतें ? ज्योतिषावर भरंवसा असल्यामुळें दोन बायका तिच्याजवळ होत्या असें गोविंदपंतानें कबूल केलें. नंतर शामभट्टानें आणखी विचारिलें—" काय हो, ह्या मुलाचा जन्म झाल्यापासून तुम्हाला कांहीं क्लेश झाले होते काय ? " गोविंदपंतानें उत्तर दिलें—" मी एकदां पाय घसरून चौकांत पडलों होतों तेव्हां मला भयंकर खोक पडली होती. त्यांतून मी बरा झालों नाहीं तोंच कोणी वैऱ्यानें माझ्या घराला आग लावली व त्यामुळें माझें पुष्कळ नुकसान झालें. "

बाप पाय घसरून पडला किंवा त्याच्या घराला कोणी आग लावली तर ह्या गोष्टींचा संबंध मुलाच्या

जन्माकडे कसा जाऊन पोहोंचतो याविषयीं हल्लींच्या अभाविक लोकांना मोठा अचंबा वाटेल, परंतु पूर्वीच्या भोळ्या लोकांना निर्जीव वस्तूचा देखील 'पायगुण' पहावा लागत होता. नवी केरसुणी विकत घेतल्यावर बाईच्या कानांतील बाळीचें मोतीं गळून पडलें तर केरसुणीच्या पायगुणामुळें आपलें नुकसान झालें असें बाईच्या मनांत पटकन् येत असे. बाळी जुनी झाली होती व सूत झिजलें होतें म्हणून मोतीं तुटून पडलें असा विचार एकदम सुचत नव्हता. मुलाचें लग्न होऊन सून घरीं आल्यावर सासुबाईचें अजारी मूल वर्ष सहा महिन्यांत वारलें अगर एखादा डागिना हरवला तर सुनेच्या पायगुणामुळें तें नुकसान झालें असें समजून तिला नेहमीं सासुबाईचीं बोलणीं ऐकून घ्यावीं लागत होतीं. पाय घसरला म्हणून गोविंदपंत चौकांत पडला व वैद्यानें आग लाविली म्हणून त्याचें घर जळालें, असे विचार गोविंदपंताच्या अगर विद्वान् शामभट्टाच्या मनांत आले नाहींत! मूल वाईट वेळेवर जन्मास आलें म्हणून हें नुकसान झालें असें समजण्यास त्यांस किंचित्हि शंका वाटली नाहीं! मला क्लेश झाले होते असें शामभट्टानें मुलाच्या जन्मकाळावरून बरोबर ओळखिलें असें समजून गोविंदपंत खुष झाला आणि म्हणाला—"मीं ग्रामजोशास विचारून मुलाच्या ग्रहांचीं दानें केलीं होतीं, परंतु दानें केल्यावर तिसरेच दिवशीं माझ्या घराला आग लागली. आपण नामांकित विद्वान् व प्रबुद्ध ज्योतिषी आहां असें ऐकून मीं आपल्या चरणाजवळ धांव घेतली आहे. ग्रहां-

चा योग्य बंदोबस्त आपण कराल तर मजवर आपले अनंत उपकार होतील." असें म्हणून त्यानें आपल्या हातांतील सोन्याचा सल्ला काढून शामभट्टापुढें ठेविला व त्यास नमस्कार केला.

हें गोविंदपंताचें भाषण ऐकून शामभट्टास पराकाष्ठेचें समाधान वाटलें, आणि त्यानें भक्तीनें दिलेला सल्ला पाहून त्यास आनंद झाला. मुलाचा जन्म गोविंदपंताला घातुक आहे असा शामभट्टाचा पक्का ग्रह झाला. जन्मनक्षत्राचा गुण अगदीं वाईट आहे ह्याविषयीं आपली निःसंशय खातरी करून घेऊन तो गोविंदपंतास म्हणाला—"चौकांत पडण्यावर आणि घराला आग लागण्यावर सध्यां तुमचें अरिष्ट टळलें आहे खरें; परंतु पुढें तुमच्यावर प्राणसंकट येणार आहे. कुनक्षत्र, कुयोग आणि तिथिगंडांत यांवर मुलाचा जन्म झाला आहे, म्हणून तो तुम्हाला धारजिणा होणार नाहीं. वाईट ग्रह ज्या मुलाला पडले आहेत त्याची पत्रिका करूं नये असें कांहीं ग्रंथकारांचें मत आहे. अलीकडे लोकांची श्रद्धा कमी झाल्यामुळें शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें लोक चालत नाहींत. याकरितां तुम्ही खोल पाण्यांत न शिराल तितकें बरें आहे."

दोनशें वर्षांपूर्वी जेव्हां लोक आतांपेक्षां भक्तिवान् व भोळे होते, तेव्हां त्यांची शास्त्रावरील श्रद्धा कमी झालेली होती असें शामभट्टानें म्हटलें! आतांच्या लोकांना तो पहाता तर त्याचें हृदय फाटून जातें! नवीन धोतरें नेसण्यास हल्लीं लोक चांगला दिवस पहात

नाहींत. आतांचीं टारगीं मुलें हजामतीला वार, नक्षत्र, तिथि पहात नाहींत, गांवास जाण्याकरितां मुहूर्त बघत नाहींत, किंवा निघतेवेळीं झालेल्या शकुनांचा कार्याकार्यविचार करीत नाहींत. अमावास्या असो, पौर्णिमा असो, व्यतिपात असो, भद्रा असो, आगगाडीच्या स्टेशनावर पहावें तों लोक भराभर जात असतात. अशी स्थिति शामभट्टानें पाहिली असती तर त्याला खरोखर वाईट वाटलें असतें. असा भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांत शामभट्टाचा जन्म झाला असता तर त्यानें आपल्याला कदाचित् आडविहीर करून घेतलें असतें, किंवा पुरुषांप्रमाणें बायका अजून भ्रष्टाचार करूं लागल्या नाहींत असें पाहून जगावें असें कदाचित् त्याला वाटलें असतें. घरोघरीं पंचांग झालें आहे तरी " आज भाजणी करूं का, लुगड्याची घडी मोडूं का, पापडाचें पीठ भिजवूं का ? किंवा कृष्णाचा कान टोंचावयाचा आहे, नारायणाची शेंडी ठेवावयाची आहे, मथीला पदर घालावयाचा आहे व बाळ्याचें जावळ उतरायाचें आहे, यांबद्दल चांगला दिवस पहा " अशा प्रकारचे प्रश्न विचारण्यासाठीं एकटीदुकटी बायको शामभट्टाकडे आली असती. एवढ्याच कारणावरून जोशास जीव देण्याची अजून पाळी येऊन पोहोंचली नाहीं असें शामभट्टानें मानलें असतें तर कोणाला ठाऊक ?

फलज्योतिषाचे खरेपणाविषयीं गोविंदपंताची बालंबाल खातरी होती. मुलाची पत्रिका न करण्याविषयीं व खोल पाण्यांत न शिरण्याविषयीं शामभट्टानें

केलेला उपदेश त्याला रुचला नाहीं. तो म्हणाला—" जोशीबुवा, फलज्योतिषाविषयीं लोकांची कांहींहि समजूत असो, पण माझा त्यावर पूर्ण भरंवसा आहे व मला ठोके येऊन चुकले आहेत. ज्या विद्वान पुरुषांनीं ग्रंथ लिहिले, व जे पुरुष हल्लीं त्या ग्रंथांचा अभ्यास करीत आहेत व त्यांवर विश्वास ठेवीत आहेत, ते सर्व गध्धे, मूर्ख किंवा भोंदू आहेत असें पाजी लोक म्हणतील तर म्हणोत, परंतु मी तसें म्हणणार नाहीं. मी शपथपूर्वक सांगतों कीं माझा आपल्यावर पूर्ण विश्वास आहे व ज्योतिषाप्रमाणें अक्षरशः वागण्यास मी तयार आहें. आपण विद्वान् व सद्धर्मी आहां. आपण सांगाल तें मला शिरसावंद्य आहे."

यावर शामभट्ट पोक्त विचार करून व तपकिरीची चिमूट ओढून म्हणाला—" अहो गोविंदपंत, आपलें मन आपल्याला ओळखतां येत नाहीं अशी आपली अवस्था आहे. मला वाटतें कीं मनुष्यामध्यें असा कोणी योद्धा नसेल कीं ज्याच्या मनांत रक्तपात होऊं नये असा सुविचार असतांहि त्यानें केलेल्या लढाईंत हजारों माणसांचे जीव जाणार नाहींत; असा कोणी विचारी पुरुष नसेल कीं रस्त्यांत पडलेली रत्नजडित सुवर्णाची आंगठी न उचलण्याच्या इराद्यानें तिला ओलांडून तो घरीं गेला असतांहि ती उचलून घेतली नाहीं अशाबद्दल यत्किंचितहि हळहळ त्याला वाटणार नाहीं. मनुष्याचें मन इतकें अस्थिर आहे कीं त्यानें आपले मनोविकार जिंकिले व आतां त्याला खचित भय नाहीं असें वाटूं लागलें आहे तोंच त्याचें मन पालटतें,

व जी गोष्ट त्याच्या हातून घडणार नाहीं अशी त्याला खातरी होती तीच गोष्ट एकवेळ त्याच्या हातून घडून जाते. तर गोविंदपंत, तुम्ही आपल्या मनाच्या निश्चयावर एकदम भरंवसा ठेवूं नका व मुलाच्या जन्मकाळावरून ज्योतिष्यानें केलेलें निदान तुम्ही खरें मानाल असें समजूं नका. "

गोविंदपंताचा ज्योतिषावर पूर्ण भरंवसा होता हें मागें सांगितलेंच आहे. आपल्यास न करतां येण्यासारखी एखादी गोष्ट ज्योतिषांत लिहिली आहे अशी कल्पना त्यास करतां आली नाहीं. ज्योतिष खरें आहे व ज्योतिषाप्रमाणें आपणास वागलें पाहिजे ही त्याची पूर्ण समजूत होती. मुलाच्या जन्मकाळच्या ग्रहांवरून ज्योतिषाचा भावार्थ सांगण्यास शामभट्ट जों जों उशीर करूं लागला तों तों गोविंदपंताची ईर्षा अधिकाधिक वाढूं लागली. त्यास असें वाटूं लागलें कीं द्रव्य, घर, जमीन व वस्त्रें द्यावीं लागलीं तरी हरकत नाहीं, परंतु मुलाच्या ग्रहांची शांति न केली तर मला पाप लागेल आणि नेहमीं दुःखांत दिवस काढावे लागतील. कांहीं होवो, जन्माची पीडा एकदांची दूर करून टाकावी असा विचार करून तो म्हणाला—" महाराज, मी आपलें शिर उतरून ठेवलें तरी आपणाला माझा विश्वास येणार नाहीं तर माझा निरुपाय आहे. मी आपल्या मुलाची शपथ घेऊन सांगतों कीं जें प्रायःश्चित्त पोथींत सांगितलें असेल तें घेण्यास मी तयार आहें. तसें मी न करीन तर खरव नरकांत जाऊन पडेन. "

गोविंदपंताचें निकराचें बोलणें ऐकून शामभट्टाला आनंद झाला. देवाची प्रतिमा पाहून भक्तिवान् मनुष्याला जितका आनंद होतो तितका आनंद पुराणिक, गवई, जोशी इत्यादि गुणवान् पुरुषांना त्यांच्या गुणांची पारख करणारा मनुष्य पाहून होतो. गोविंदपंताची भक्ति पाहून मुलाच्या जन्मकाळच्या शुभाशुभाविषयीं आपण विशेष काळजी ध्यावी असें शामभट्टास वाटलें, म्हणून त्यानें उपलब्ध असलेले सर्व ग्रंथ चाळून पाहिले; परंतु जन्मनक्षत्राचा दोष घालविणारें एकहि वचन त्यास सांपडलें नाहीं. शेवटीं निराश होऊन तो म्हणाला—" गोविंदपंत, शास्त्राप्रमाणें वागणारीं मनुष्यें फार सांपडत नाहींत, त्यांतून तुमच्यासारखा भक्तिवान् एखादाच सांपडतो. अज्ञान किंवा अभक्तिवान् मनुष्याची समजूत मी वरवर पाहून कशीतरी करून देतों. अशा लोकांना पीडा झाली तर त्याबद्दल मी थोडाच जबाबदार आहें ? तुमच्यासारखे लोक आले म्हणजे मला पुष्कळ विचार करावा लागतो व सर्व ग्रंथांचा विचार करून त्यांतील सार सांगावें लागतें. तुमच्या मुलाचा जन्म मूळनक्षत्राच्या पहिल्या चरणांत झाला आहे, त्याचें फळ वाईट आहे. त्याविषयीं असें एक वचन आहे. ' मूलेमूलविनाशायस्तंभेहानिर्धनक्षयः ' मूळनक्षत्राच्या पहिल्या चार घटकेंत मुलाचा जन्म झाला असल्यास तो बापाला वाईट. कालामृतग्रंथांत असें सांगितलें आहे कीं ' अभुक्तमूलसंभवंपरित्यजेत्तुबालकं ' हा नक्षत्रदोष झाला. आतां जन्मलग्नसंबंधीं असा विचार आहे कीं

तुमच्या मुलाचा जन्म मीन आणि मेष या दोन लग्नांच्या संधींत झाला आहे. याशिवाय तिथिगंडांताहि आलें आहे. गंडांताविषयीं असें सांगितलें आहे कीं (सर्वेषांगंडजातानांपरित्यागोविधीयते । वर्जयेद्दर्शनंशावंतच्चषाण्मासिकंभवेत् ॥) मुलाचा त्याग करावा किंवा सहा महिनेपर्यंत त्याचें तोंड आईबापांनीं पाहूं नये. मनुष्याला मोह सुटणार नाहीं म्हणून सहा महिने तोंड पाहूं नये हा गौण पक्ष सांगितला आहे. आतां ग्रहांच्या उच्चनीचत्वासंबंधीं विचार केला असतां असें दिसतें कीं ' रविर्मेषेतुलेनीचोवृषेचंद्रस्तुवृश्चिके ' या उक्तीप्रमाणें एकहि उच्चीचा ग्रह तुमच्या मुलाला पडलेला नाहीं, तेव्हां तुम्हीं त्याचा त्याग करावा हें सर्वथैव उत्तम आहे. "

आतांच्या काळांत मुलाला टाकून द्यावें असें जोशानें सांगितलें तर त्याप्रमाणें आईबाप करतील कीं नाहीं याविषयीं शंका आहे. गोविंदपंताच्या मनांत चौकांत पडल्याची व घराला आग लागल्याची ह्या गोष्टी पुन्हा उभ्या राहिल्या, व त्या गोष्टी मुलामुळें घडल्या असें आतां त्यास पक्केपणीं वाटूं लागलें. गंडांताचे दोष ऐकून त्याची आतां खातरी झाली कीं आपला मुलगा अगदीं वाईट गुणाचा आहे व तो आपल्या घरीं राहण्यायोग्य नाहीं. त्याला आपण घरांत ठेविलें तर आपणावर काय काय संकटें येतील यांविषयीं तो कल्पना[1] करूं लागला. तो मनांत म्हणाला—" मला

१ असल्या कुकल्पना हल्लींच्या काळांत अगदीं नाहींशा झाआहेत असें नाहीं. " एकादें मुलगें जन्मतांच आई किंवा

मोठें दुखणें येईल व मी मरेन, नंतर माझ्या काळजीनें माझी बायको मरेल, आणि माझ्या घराचें वाटोळें होईल." अशी कल्पना केल्यावर तो मुलगा आपला शत्रु आहे असें त्यास वाटूं लागलें. कांहीं वेळानें शत्रु नव्हे, तो आपला काळ आहे असें तो मानूं लागला. "तो काळ माझें सर्वस्व हरण करील व माझा जीव घेईल" असें म्हणून तो क्रोधानें व भयानें थरथर कांपूं लागला. त्याच्या सर्वांगावर शहारे आले व त्याचें आंग तप्त झालें. ग्रंथावलोकन करण्याच्या नादांत शामभट्ट निमग्न होता, त्याला गोविंदपंताच्या प्रकृतींत झालेला पालट दिसला नाहीं. तो दिसला असता तरी उपयोग झाला नसता. ग्रंथांत लिहिलेलें खरें होणार नाहीं असें त्याच्यानें म्हणवलें नसतें व गोविंदपंताच्या रागाची शांतता त्याला करतां आली नसती. ज्योतिषशास्त्रविषयासंबंधीं शामभट्ट कोणाशीं बोलत बसला असतां बटो उगीच तमाशा पहात असे, त्याप्रमाणें या वेळेसहि त्यानें तसेंच केलें. दोघांच्या भाषणांत तो बोलला नाहीं.

गोविंदपंताचें धैर्य खचलें व तो शामभट्टास म्हणाला—"मी आपल्या मुलाचें जातक ऐकिलें तेवढें पुरे

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

बाप यांतून कोणी मेलें, किंवा दुसरें कोणी कुटुंबांतील मनुष्य गचावलें, कीं आलें तें अपेश त्या बिचाऱ्या पोराच्या माथीं !' मग त्या पोराला कोणी चैन पडूं द्यायचें नाहीं. एकाद्या वैऱ्याशीं जसें वागावें त्याप्रमाणें त्या पोराचे सारखे हाल चालायाचे." असें निबंधमालाकारानीं वर्णन केलें आहे. भाग १ ला, पान २४९ पहा.

आहे, त्याहून जास्त ऐकिण्याचा धीर मला निघत नाहीं. मीं पूर्वीच प्रतिज्ञा केली आहे कीं मी शास्त्रांत लिहिल्याप्रमाणें वागणार नाहीं तर नरकांत जाईन. कुलक्षय करणारें असलें कारटें घरांत ठेवण्यापेक्षां टाकून दिलेलें पुरवलें. तसें मी करीन तरच मी नांवाचा गोविंदपंत समजा. शेणांत काय थोडे जीव उत्पन्न होतात ? त्याप्रमाणें हा एक जीव आहे असें समजून मी त्यास टाकून देईन ! शास्त्रहि त्याची किड्याप्रमाणेंच गणना करतें असें मला वाटतें; कारण मनुष्याचें मूल किड्याहून श्रेष्ठ आहे असा शास्त्राचा अर्थ असता तर तें टाकून देण्याविषयीं आज्ञा त्यानें कधींहि केली नसती ! ! "

आपलें रक्त ढेंकूण शोषण करीत आहे असें पाहून जसें आपण त्यास उन्हांत भाजून मरण्याकरितां टाकून देतों त्याप्रमाणें गोविंदपंतानें आपल्या तान्ह्या मुलास एकटें नेऊन सोडावें ही गोष्ट खोटी आहे असें आतांचे लोक म्हणतील, परंतु ती अगदीं खरी आहे असें मी खात्रीनें सांगतों. देवीला प्रसन्न करण्याकरितां माणसाचा बळी द्यावा, किंवा देहांत-शिक्षा होण्याकरितां हत्तीच्या पायाला बांधून मारावें, किंवा सहगमन करणाऱ्या सतीला जिवंत राहण्याविषयीं बलात्कार करूं नये, अशा प्रकारच्या पद्धती ज्या काळीं चालू होत्या त्या काळीं कुयोगावर जन्म पावलेल्या मुलाचा त्याग करण्याविषयीं प्रत्यवाय होता असें संभवत नाहीं. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें गोविंदपंत आचरण करीत आहे या कारणावरून तो लोकांच्या निंदेस व राज-

दंडास पात्र झाला नाहीं ! गोविंदपंतानें आपल्या मुलास कोंठें टाकून दिलें व मुलाची आई यमुनाबाई हिची काय अवस्था झाली ह्याबद्दलची हकीकत पुढें दिली आहे.

शास्त्राप्रमाणें चालण्याची प्रतिज्ञा करून व शामभट्टास नमस्कार करून गोविंदपंत जाऊं लागला असतां शामभट्ट कांहींच बोलला नाहीं. गोविंदपंताला ज्योतिषाविषयीं पूर्ण भक्ति आहे असें पाहून शामभट्टास आपल्या जोसपणाची धन्यता वाटली असावी. गोविंदपंत गेल्यावर लवकरच नरसिंहभट्टानें शामभट्टास व बटोस भोजनाकरितां घरांत बोलावून नेलें. जेवायला जाण्यापूर्वी गोविंदपंतानें दिलेला सोन्याचा सल्ला बटोनें आपल्या पडशींत नेऊन ठेविला. भोजन झाल्यावर शामभट्ट आणि बटो पुन्हा ओसरीवर येऊन बसले. बटो अध्ययन करूं लागला व शामभट्ट ग्रंथावलोकन करूं लागला. गोविंदपंतास दिलेला शास्त्रार्थ अगदीं बरोबर आहे हें निश्चित करून घेण्याकरितां शामभट्ट अनेक ग्रंथांचे आधार पहात बसला व या कामांत तो अगदीं गढून गेला. शामभट्ट विचार करूं लागला म्हणजे त्यास जवळपास काय चाललें आहे तें दिसत नव्हतें—म्हणजे तिकडे त्याचें लक्ष्य जात नव्हतें, हें आपणास त्याच्या स्वभावावरून व पूर्वीच्या इतिहासावरून कळलेंच आहे. असा तो निमग्न झाला असतां गोविंदपंताची बायको यमुनाबाई हळूहळू रडत रडत दरवाज्यांतून नरसिंहभट्टाच्या आंगणांत आली. तेथें येऊन तिनें काय केलें हें सांगण्यापूर्वी

गोविंदपंतानें आपल्या घरीं जाऊन काय काय केलें तें आधीं सांगितलें पाहिजे, म्हणजे आपल्याला ही गोष्ट चांगली समजेल.

घरीं गेल्यावर गोविंदपंतानें आपल्या बायकोपुढें शामभट्टानें सांगितलेल्या भवितव्याचा पाडा वाचला, तेव्हां शामभट्ट कोण, तो कोठें उतरला आहे, हें यमुनाबाईस कळलें. मुलाला वाईट नक्षत्र लागलें आहे हें ऐकून तिलाहि वाईट वाटलें, परंतु मुलाला टाकून द्यावें असें तिला वाटलें नाहीं. तेव्हां ह्या नवराबायकोची पुष्कळच बोलाचाली झाली व झटापटी झाल्या, परंतु त्या शेजारच्या घरीं ऐकूं गेल्या नाहींत. गोविंदपंतानें म्हटलें कीं "तुला मुलगा पाहिजे असल्यास माझी आशा सोड." हें ऐकिल्यावरोबर यमुनाबाईच्या काळजांत चर्र झालें. त्या नवराबायकोचें एकमेकांवर अत्यंत प्रेम होतें व जसा विस्तवाशिवाय धूर राहात नाहीं किंवा धूर झाल्याशिवाय विस्तव पेटत नाहीं त्याप्रमाणें त्या दोघांची सलगी होती. पुनर्विवाह करण्याची चाल त्या वेळेस पडली असती तरी गोविंदपंतापेक्षां मुलगा मला आवडता आहे असें यमुनाबाईनें म्हटलें नसतें. परंतु मुलाचा त्याग करावा हाहि विचार तिच्या मनांत शिरेना, त्याला तिनें तरी काय करावें ? हिकडे आड आणि तिकडे विहीर अशा प्रकारें तिच्या मनाची अवस्था झाली. वाईट ग्रहांच्या शांतीकरितां आपले डागिने, घरदार, शेतें, सर्व देण्याला ती तयार झाली. ह्या सर्वांपेक्षां तिला गोविंदपंत व मुलगा हे दोघे प्रिय होते. गोविंदपंतानें तिला

निकरानें सांगितलें कीं मुलाला टाकल्याशिवाय दुसरी तोड नाहीं. नवऱ्याच्या सत्तेपुढें बायकोचें शहाणपण किती चालणार? कांहीं पुरुष बायकांना चाकरांप्रमाणें लेखतात, तसा स्वभाव गोविंदपंताचा नव्हता तरी शास्त्राज्ञेपुढें बायकोची विनंति त्याला मान्य करतां येईना.

शेवटीं यमुनाबाईच्या विनवणीवरून आपलें मूल शेजाऱ्याच्या घरीं नेऊन ठेवण्याचें गोविंदपंतानें कबूल केलें. मुलास इतके वाईट ग्रह पडले आहेत कीं तें जन्मल्यापासून गोविंदपंताचें नुकसान झालें व आणखी नुकसान होईल असें 'शामदेवानें' भविष्य केलें आहे ही बातमी गांवांत कळल्यावर त्या मुलास आपल्या घरीं ठेवण्याचा पतकर कोणी घेईना. "माझें मूल तुम्ही ठेवतां काय?" असा गोविंदपंतानें प्रश्न केल्यावर तसें करण्याचें कारण लोक त्यास विचारीत व तें त्यानें सांगितल्यावर तें मूल बाळगण्याचा जिम्मा कोणी घेईना. त्या मुलाविषयीं पुष्कळांना वाईट वाटलें, परंतु ज्योतिषावर भरंवसा असल्यामुळें त्याला बाळगण्याविषयीं कोणाचाच हिय्या होईना. दुसऱ्याच्या घरची पीडा आपल्या घरीं आपखुषीनें कोण आणून घेतो? मुलाचा पतकर घेतल्यास द्रव्य देण्याचें व जमीन देण्याचें गोविंदपंतानें कबूल केलें तरी मूळनक्षत्रावर उपजलेलें मूल घराच्या व पालकाच्या मुळावर असतें अशा समजुतीवर तें सर्वांनीं नाकारिलें. हल्लींचे विद्वान् लोक ह्या समजुतीस वेडी समजूत म्हणतील, परंतु त्या वेळेचे विद्वान् तसें समजत नव्हते. सती

गेल्यानें आत्महत्या होते अशी समजूत नव्हती व मूळ-नक्षत्रावर जन्म पावलेलें मूल निराश्रित टाकून दिल्यानें अपराध घडतो असें लोक मानीत नव्हते. असें अमानुष कृत्य आतां कोणी करील तर हिंदुस्थानच्या अपराध्यास शिक्षा करण्याच्या कायद्याच्या ३१७व्या कलमाप्रमाणें त्यावर तत्काळ खटला सुरू होईल व त्या अपराधाबद्दल त्याला सात वर्षें सक्त मजूरीची कैद भोगावी लागेल. त्या वेळेस तो कायदा झाला नव्हता व अपराध्यास पकडण्याकरितां पोलीस लोकहि ठेविलेले नव्हते.

आपल्या मुलाचा प्रतिपाळ करण्याचें काम कोणी पतकरीत नाहीं अशी संकटावस्था पाहून गोविंदपंतानें आपलें मूल एका महादेवाच्या देवळांत नेऊन टाकलें. आपल्या मुलाविषयीं बापाला एक वेळ आपलें मन कठोर करतां येतें, परंतु नऊ महिनेपर्यंत गर्भांत वागवून प्रसवण्याचे क्लेश जिनें सोशिले असतात, उपजलेल्या मांसाचा गोळा जतन करण्याची काळजी जिनें घेतली असते, यदृच्छाधीन सांचलेलें दूध जिच्या स्तनांत दाटलें असतें, त्या आईला आपलें मन कठोर करतां येत नाहीं. गोविंदपंत मुलाला घेऊन जाऊं लागला तेव्हां वांसराकरितां जशी गाय हंबरडा फोडते तशी यमुनाबाई धाय मोकलून रडूं लागली. नंतर हळूच उठून ती त्याच्या मागोमाग गेली. गोविंदपंतानें आपलें मूल महादेवाच्या देवळांत ठेविलें तेव्हां ती त्या देवळाच्या मागें लपून उभी होती. तो गेल्यावर ती

देवळांत जाऊन मुलाजवळ येऊन बसली, व मुलाला पोटाशीं घेऊन त्यास पाजूं लागली.

शास्त्रोक्त धर्माचरण करण्याच्या भरांत आपण अमानुष कर्म करीत आहों असें गोविंदपंतास वाटलें नाहीं, परंतु यमुनाबाईच्या डोळ्यांपुढें मुलाला पुढें होणाऱ्या यातना स्पष्ट दिसूं लागल्या व आपलें मूल आजच स्वर्गस्थ होणार असें तिला वाटूं लागलें. दुःखाचा पहिला तडाका निवून गेल्यावर, तें दुःख होण्याचें कारण ती आपल्या मनांत शोधूं लागली, तेव्हां तिला असें वाटलें कीं, या गोष्टीस कारण शामभट्ट व त्याच्या पोथ्या आहेत. नंतर तिला त्यांचा अतिशय राग आला. रागानें संतप्त व निर्लज्ज होऊन शामभट्टाच्या पोथ्यांचा समाचार घेण्याकरितां तिनें नरसिंहभट्टाच्या घराची वाट धरली. ऐन क्रोधाच्या भरांत अविचारी मनुष्य काय करील आणि काय नाहीं हें सांगवत नाहीं, परंतु क्रोधानेंहि कधीं कधीं अविचार उत्पन्न होतो. यावेळेस यमुनाबाई वेड्यासारखी कृति करूं लागली. ती नरसिंहभट्टाच्या आंगणांत येऊन पोहोंचली, तेव्हां पोथ्यांचा भारा पुढें घेऊन शामभट्ट विचार करीत बसला आहे असें तिच्या दृष्टीस पडलें. रागाच्या झपाट्यांत पोथ्या तिच्यापुढें दिसल्याबरोबर तिला जास्त संताप चढला.तिच्या अंगाची लाही झाली व मी काय करतें आहें ह्याचें तिला देहभान राहिलें नाहीं.

मागें सांगितल्याप्रमाणें शामभट्ट विचारांत गुंग होता तोंच ती पोथ्यांजवळ आली आणि त्यांचा नाश करूं लागली. कित्येक ग्रंथांचीं पानें धरून तिनें उभीं

चिरलीं, कित्येक पोथ्यांचा तिनें चोळामोळा केला, कांहीं पानें कुसकरून फेंकून दिलीं, आणि कांहींवर तिनें शाईची दौत पालथी केली. हें सर्व कृत्य तिनें एका पळांत केलें. वीज पडून एखाद्या पदार्थाचा नाश जसा एका निमिषांत होतो त्या विजेप्रमाणें यमुनाबाईनें हें कृत्य केल्यामुळें तिला प्रतिबंध करण्यास शामभट्टास अवकाश मिळाला नाहीं. एकाएकीं त्याच्या पुस्तकांचा व पोथ्यांचा ऱ्हास झाला. शामभट्ट शुद्धीवर नव्हता हें मागें सांगितलेंच आहे. शुद्धीवर येऊन त्यानें पोथ्यांकडे पाहिलें तेव्हां त्याला तो नाश पहावेना म्हणून त्यानें आपले दोन्ही डोळे आपल्या दोन्ही हातांनीं झांकून ठेविले.

यानंतर शामभट्टानें किंवा बटोनें यमुनाबाईचें निवारण कां केलें नाहीं असें कित्येकांस वाटेल. ज्यावेळेस ही गोष्ट घडली त्या वेळेस स्त्रियांना पुरुषांकडून इतका मोठा मान मिळत होता कीं परस्त्रीच्या अंगाला स्पर्श करण्याचें पाप चोरी करण्याच्या पापापेक्षां मोठें आहे अशी सर्वत्र सामान्य समजूत होती. परस्त्रियांशीं भाषण करण्याची लाज वाटत होती व तशी चालपण नव्हती. या कारणामुळें शामभट्टास किंवा बटोस यमुनाबाईचा हात धरवला नाहीं. सर्व पोथ्यांचा नाश न होऊं देण्याविषयीं बटोला दुरून दुरून जी खटपट करतां आली ती त्यानें केली. यमुनाबाईच्या आंगाला हात न लावितां जीं पोथ्यांचीं पानें त्यास गोळा करतां आलीं तीं त्यानें उचलून घेतलीं व फाडून फेंकून दिलेल्या पानांचे तुकडे तो जमा करूं लागला. त्या

वेळेस मुद्रणकला निघाली नव्हती व हस्तलिखित पुस्तकें दुर्मिळ होतीं. शामभट्टाचें नुकसान झालें तें त्याला धड डोळ्यानें पाहवेना म्हणून त्यानें आपले डोळे गच्च मिटून धरले होते.

हल्लीं एखाद्या बाईनें असें कृत्य केलें असतें तर लागलीच तिच्यावर नुकसानीची फिर्याद झाली असती, किंवा त्या बाईला खूप झोडपलें असतें. बायकांच्या आंगाला हात न लावण्याची जुनी चाल हल्लीं कांहीं लोकांना अनावश्य वाटूं लागली आहे, व बायकाहि पूर्वीपेक्षां धीट होऊं लागल्या आहेत. परपुरुषांच्या वस्त्रप्रावरणाचा स्पर्श झाला असतां ज्या बायकांना पूर्वी मरणतुल्य लाज वाटत होती, त्यांच्याच मुलींना परपुरुषांच्या किंवा अन्य जातीच्या लोकांच्या हातांत हात घालून स्वागत करण्याची व कुशलवृत्त विचारण्याची संवय लागूं लागली आहे. ही संवय चांगली आहे किंवा वाईट आहे या गोष्टींचा निर्णय येथें करण्याचें मला कांहीं कारण नाहीं. आपल्या व आपल्या बायकांच्या चालीरीतींत असें अंतर पडल्यामुळें, शामभट्टानें किंवा बटोनें यमुनाबाईचे हात कां धरले नाहींत म्हणून आपणांस आश्चर्य वाटेल. तसें करण्यास त्याला अवघड होतें असें नव्हतें, किंवा ज्यानें शंभर लोकांदेखत कळसूत्री बाहुल्यांचा चुराडा केला, त्याला एकट्या यमुनाबाईला शासन करण्याचें धारिष्ट नव्हतें अशीहि गोष्ट नव्हती. केवळ यमुनाबाईची मर्यादा ठेवण्याकरितां शामभट्ट तिला शिवला नाहीं ही गोष्ट अगदीं खरी आहे. परस्त्रीवर आपलें मन जाऊं

नये म्हणून शामभट्ट किती जपत होता हें पंधराव्या प्रकरणांतील त्याच्या भाषणांवरून आपणांस कळलेंच आहे.

भर रागाच्या झपाट्यांत यमुनाबाई पोथ्यांचें नुकसान करीत आहे, शामभट्ट आपल्या डोळ्यांवर हात देऊन बसला आहे व अस्ताव्यस्त पडलेलीं व फाटलेलीं पानें व पोथ्या बटो मुकाट्यानें भराभर गोळा करीत आहे, अशावेळीं नरसिंहभट्ट घरांतून पडवींत आला व भयाभीत होऊन भिंतीशीं टेंकून स्तब्ध उभा राहिला. त्याच वेळेस आपली बायको घरीं नाहीं असें पाहून तिचा शोध करीत गोविंदपंत तेथें येऊन पोहोंचला. आपल्या बायकोनें पवित्र ज्योतिःशास्त्राच्या पोथ्यांचा चुराडा केलेला पाहून तो घाबरला. "आतां माझी दशा काय होईल?" असें म्हणून तो कांहीं वेळ वेड्यासारखा बघूं लागला. नंतर लागलीच अंमळसें पुढें होऊन "अँहह" असा शब्द करून तो मोठ्यानें खांकरला. पोथ्यांचा चुराडा केल्यावर यमुनाबाईचा राग कमी होत चालला होता, त्याच वेळेस तिनें आपल्या नवऱ्याचें खांकरणें ऐकिल्याबरोबर तिला रडूं कोसळलें व आपल्या डोळ्यांवर हात ठेवून ती ते चोळूं लागली. मर्यादेनें आपली मान खालीं करून दगडाच्या मूर्तीसारखी जागच्या जागीं शांतता धरून ती भयानें उभी राहिली. बायकोच्या अंगीं नवऱ्याची मर्यादा ठेवण्याचा गुण नसावा असें ज्यांस वाटत असेल त्यांना ह्या गोष्टीचें कौतुक कांहींच वाटणार नाहीं, परंतु यमुनाबाईची लीनता, पूज्य-

बुद्धि व पतिप्रेम पाहून गोविंदपंतास धन्यता वाटली व त्यानें लागलीच तिला क्षमा केली. ते दिवसापासून गोविंदपंत तिच्यावर अधिकाधिक प्रेम करूं लागला.

चारचौघांदेखत बायकोशीं बोलण्याची गोविंदपंताला संवय नव्हती तरी तो यावेळेस मोठ्या आनंदानें तिला म्हणाला, "उगी रहा; आतां तूं रडूं नकोस. तुझी लीनता पाहून मला फार आनंद झाला. रागाच्या झपाट्यांत तूं अविचार केलास हें आतां मीं ओळखिलें, व त्याबद्दल तुला क्षमा केली आहे. शामदेवाच्या पायां पडून तूं त्याजपासून क्षमा मागून घे म्हणजे झालें." ह्या आश्वासनापासून यमुनाबाईला धीर आला. आतां तिचा राग अगदीं गेला होता व कृतकर्माचा पश्चात्ताप तिला होऊं लागला होता. तिनें लागलीच शामभट्टाला नमस्कार केला व त्यानें तिला "अष्टपुत्रासौभाग्यवतीभव" असा आशीर्वाद दिल्यानंतर आपले हात जोडून ती त्यास म्हणाली— "महाराज, मी अनाथ गाय आहें. जनावराप्रमाणें मीं हें काम केलें याबद्दल मला क्षमा करावी. पोटच्या गोळ्याकरितां आईचें काळीज कसें तुटतें याचा अनुभव पुरुषांना नसतो. आतां कृपा करून मुलाला घरीं घेऊन जाण्याची आपण मला परवानगी द्या व माझे अपराध पोटांत घाला."

"उगी रहा; आतां तूं रडूं नकोस." असें गोविंदपंत म्हणाला त्याचवेळेस शामभट्टानें आपले डोळे उघडले. तेव्हां यमुनाबाईनें धरलेली लीनता पाहून

शामभट्टाच्या पोटांत तिजविषयीं दया उत्पन्न झाली. ज्यापेक्षां तिच्या नवऱ्यानें तिला गतापराधाची क्षमा केली आहे त्यापेक्षां आपणहि क्षमा करावी असें त्याच्या मनांत येऊन त्यानें तिला आशीर्वाद दिला. तो आपण ऐकलाच आहे. यमुनाबाईनें केलेली विनंति ऐकल्यावर त्यास असें वाटलें कीं तिला मायेनें घेरलें आहे; तेव्हां आत्मानात्मविचार सांगून तिला ज्ञानी करावें असें त्याच्या मनांत आलें. नंतर एक तपकिरीची चिमूट ओढून तो म्हणाला. " बाई, ज्या बायका आपल्या नवऱ्याचा मान ठेवितात व ऐन रागाच्या झपाट्यांत अविचाराप्रत पावल्या असतांहि मागून पश्चात्ताप पावून लीन होतात, त्या सर्वांना प्रिय होतात. तुमच्या नवऱ्याची शास्त्रावर भक्ति पाहून व क्षमाशील वर्तणूक पाहून मी आज खुष झालों, व तुमची सभ्य रीत पाहून मला आनंद झाला. तुमच्या मुलाला टाकून दिलें याबद्दल तुम्हाला दुःख होऊन व दुःखाअंतीं राग येऊन तुम्हीं हें अविचाराचें कर्म केलें. पण अहो बाई, तुमच्या मुलाचें रक्षण तुम्ही एकट्या करणार आहां असें तुम्ही समजतां काय ? "

असा प्रश्न केल्यावर त्यानें अंमळ दम खाऊन तपकिरीची दुसरी चिमूट आपल्या दुसऱ्या नाकपुडींत सोडून दिली. नंतर तो म्हणाला. " नाहीं बरें बाई. जो ह्या सर्व जगाचें रक्षण करतो तोच तुमच्या मुलाचें रक्षण करील. ज्यानें गर्भाशयांत मुलाचा प्रतिपाळ केला, ज्यानें मुलाकरितां आईच्या स्तनांत दूध उत्पन्न केलें, तोच एक समर्थ आहे. मी खाणार, मी ठेवणा-

र, मी राखणार, हें खोटें आहे. मी हा शब्द अहंकाररूप आहे. आयुष्यमर्यादा आहे तोंपर्यंत जीव कुडींत वास करतो. ती संपली म्हणजे तुम्हीं आपल्या मुलाला पेटींत बंद करून वरतीं कुलूप लाविलें तरी त्याचा जीव राहणार नाहीं. ही आयुष्यमर्यादा जन्मकाळच्या ग्रहांनीं आधींच बांधून ठेविलेली असते. तसें नसतें तर आपले वाडवडील व आपलीं आवडतीं माणसें आपणाला जिवंत ठेवितां आलीं असतीं."

आयुष्यमर्यादा ग्रहांनीं बांधलेली असते ही नवीन गोष्ट बटोला कळली तेव्हां त्यानें आपली आश्चर्ययुक्त मुद्रा केली. ती पाहून शामभट्ट म्हणाला—"हें अवाढव्य जग—पृथ्वी, आकाश, सूर्य, चंद्र, तारे,—निर्माण करून देवाला शीण आला तेव्हां विश्रांति घेण्याकरितां या पृथ्वीवरील माणसांचा व्यापार त्यानें ग्रहाधीन केला. जसे ज्याला जन्मकाळीं ग्रह पडतील तसा तो प्राणी उदय पावेल अशी ईश्वरानें आज्ञा केली, नंतर हें जगाचें गाडें सुरळीत चालूं लागलें. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, ही मृत्युलोकची वस्ती आहे. जसे रात्रीच्या समयीं कांहीं कावळे जमा होऊन एका झाडावर वस्ती करतात, तशीं मनुष्यें या जगांत वस्तीला आलीं आहेत. जग हें मनुष्याचें घर नाहीं. कांहीं काळाकरितां, सुखदुःखें भोगण्याकरितां, मनुष्य जन्माला आला आहे. तो मेला तरी त्याचा आत्मा मरत नाहीं. आत्मा अविनाशी आहे व तो ईश्वराचा अंश आहे, म्हणून मेलेल्या मनुष्याचा शोक करणें व्यर्थ आहे. तुमच्या मुलाची आयुष्यमर्यादा संपल्यावांचून तें मरणार नाहीं;

तें मेलें तरी त्याच्या शरीराचा मात्र नाश होईल. त्याचा आत्मा अविनाशी असल्यामुळें तो परंधाम, परतेज जें परब्रह्मस्वरूप त्याप्रत परत जाईल. यासाठीं तुमचें मूल आत्म्याच्या रूपानें नेहमीं जिवंत आहे असें तुम्ही समजा. यासाठीं त्याच्या जीवाचा खेद करणें उक्त नाहीं; कारण जो मरत नाहीं तो मेला असें म्हणून शोक करणें व्यर्थ आहे."

हें ऐकून शेतकऱ्यांच्या हातून मार खाल्लयावर शामभट्टानें आपणास सुखदुःखाविषयीं उपदेश केला होता[1] ह्या गोष्टीची बटोला आठवण झाली. तो म्हणाला. "गुरु महाराज, आत्मा अविनाशी आहे व ईश्वरांश आहे तर मग मनुष्याला कृतकर्माचें फळ कां भोगावें लागतें याविषयीं किंचित् ज्ञान मला करून द्यावें."

शामभट्ट म्हणाला—" मनुष्य जन्मास आल्यावर त्याजकडे जसा अधिकार येऊन पोहोंचला असेल तसें त्यास वागावें लागतें. हें जग देवाच्या घरचें नाटक आहे. नाटकांत कोणी मनुष्य राजा झालेला आपण पहातों; कोणी प्रधान, कोणी चोपदार, कोणी गुन्हेगार अशीं सोंगें घेतलेलीं आपण पहातों. नाटक संपलें म्हणजे राजा, प्रधान, चोपदार, गुन्हेगार इत्यादि सोंगें घेणारीं मनुष्यें, एका सूत्रधाराच्या ताब्यांतलीं आहेत असें आपणास दिसतें. त्याप्रमाणें जीवात्म्यांचा व्यापार संपला म्हणजे जगाचा सूत्रधार जो सर्वसत्ताधीश परमेश्वर त्याकडे ते जातात. जिवाचीं कवचकुंडलें म्हणजे हें नाटकी पंचमहाभूतात्मक शरीर येथेंच अचेतन

१ हा उपदेश दहाव्या प्रकरणांत सांपडेल.

पडतें. शरीर धारण करून घेतलेल्या सोंगाची झडती जीवात्म्याला देवापुढें द्यावी लागते. प्रेक्षकजनांनीं खुष होऊन सोंगाला दिलेले अलंकार ज्याप्रमाणें सोंगाडी आपल्याबरोबर घेऊन पडद्यांत जातो, त्याप्रमाणें जीवात्मा आपल्या पापपुण्याचा हिशोब देवाकडे नेतो. त्या हिशोबावरून देव त्याला बक्षीस देतो अगर शिक्षा करतो. रंगभूमीवर आपलें सोंग उत्तम वठावें अशाविषयीं जो सोंगाडी अविश्रांत श्रम करून सिद्धि पावतो तोच प्रेक्षकजनांच्या प्रशंसेस पात्र होऊन त्यांजपासून बक्षीस मिळवितो. या बक्षिसावरून व इतर सोंगाड्यांच्या साक्षीवरून त्याच्या कृत्याची परीक्षा होते. आपण असें बोलूं, तसें बोलूं, असा साक्षीदारांनीं कट केला तरी ईश्वर सर्वसाक्ष असल्यामुळें खरी गोष्ट तेव्हांच त्याला कळते. प्रस्तुत प्रसंगीं आपण सर्वांनीं आपापलीं कामें उत्तम रीतीनें बजाविलीं आहेत. मी जोशी आहें. मीं मुलाचें जातक केलें व ग्रंथांत लिहिल्याप्रमाणें जन्मनक्षत्राच्या व ग्रहांच्या गुणदोषाविषयीं शास्त्रार्थ सांगितला. गोविंदपंतानें गृहस्थाश्रमधर्माप्रमाणें शास्त्रावर विश्वास ठेवून मुलाला टाकून दिलें. बाई, तुम्हीहि आपल्या मातृधर्माप्रमाणें आपल्या मुलाचा कैवार घेऊन सूड उगवला. मी आपल्या जोशाच्या सोंगाची बतावणी केली, गोविंदपंतानें सद्धर्मशील पुरुषाची बतावणी केली, व आईचें आपल्या मुलाविषयीं किती प्रेम असावें हें तुम्हीं खरें करून दाखविलें. देवापुढें आपला न्याय होईल तेव्हां आपण सर्व निर्दोषी ठरूं. अहो बाई, तुम्हांला आपल्या मु-

लाविषयीं अगदीं वाईट वाटूं देऊं नका. त्याचे हाल व्हावेत असें ज्योतिषांत लिहून ठेविलें आहे. तुम्ही त्याचा समाचार घेत जा व सहा महिन्यांनंतर त्याला घरीं परत आणा. 'वर्जयेद्दर्शनंशावंतच्चषाण्मासिकंभवेत् ।' असें ग्रंथांत स्पष्ट लिहिलें आहे."

आपल्या मुलाला पुन्हा घरीं आणतां येईल असें ऐकून यमुनाबाईस समाधान वाटलें; मी शास्त्राप्रमाणें वागलों व आतां माझें अरिष्ट दूर होईल ह्याचा आनंद गोविंदपंतास झाला; आणि फाटलेलीं, चुरमुळा झालेलीं व शाईनें भरलेलीं पानें लिहून देण्याविषयीं नरसिंहभट्टानें कबूल केलें; परंतु बटोला शामभट्टाच्या भाषणाचा नुसता चमत्कार वाटला. तो मनांत म्हणाला—"हिकडचा संबंध तिकडे व तिकडचा संबंध हिकडे लावून देऊन लोकांचीं मनें वळविण्यापुरतें शहाणपण जोशाच्या अंगीं जरूर पाहिजे, व तें कसब माझ्या गुरूच्या अंगीं आहे. या गोष्टीवरून मी म्हणतों तेंच खरें आहे. दुनिया झुकती है; झुकानेवाला चाहिये."

शामभट्टाचें बोलणें संपल्यावर त्यास नमस्कार करून गोविंदपंत व यमुनाबाई हीं दोघीं आपल्या मुलाचा समाचार घेण्याकरितां देवळांत गेलीं. नंतर थोड्या वेळानें शामभट्टास कळलें कीं शिवाजी महाराज पुण्याहून सुप्यास जाण्याच्या इराद्यानें पुरंदरास येऊन उतरले आहेत. ही बातमी ऐकतांच मराठ्यानें सांगितलेल्या गोष्टीची व पंचांगाच्या खरेपणाविषयींची त्याला आठवण झाली, आणि शिवाजीच्या भेटीची त्यास अत्युत्कंठा झाली. तो शिवाजीकडे जावयास निघाला

तेव्हां वटोहि त्याच्यामागून चालत गेला, तें पाहून नरसिंहभट्ट शिवाजीचें बिऱ्हाड दाखविण्याकरितां त्या दोघांपुढें चालूं लागला. शिवाजीला पाहण्याविषयीं शामभट्टाचें मन इतकें अतुर झालें होतें कीं त्याला रस्त्यावरील दगड, खांचखळगे कांहींएक दिसेनासें झालें. जशी सीतेला पहाण्याविषयीं अयोध्याधीश रामचंद्राला उत्कंठा झाली होती तशी शिवाजीविषयीं शामभट्टाला झाली होती. वाटेनें चालतांना ठेंचा लागल्या तरी त्यानें त्यांची परवा केली नाहीं. शिवाजी उतरला होता त्या घराच्या दरवाज्याशीं तो पोहोंचला तेव्हां त्याच्या डोक्यावर हात ठेवून आशीर्वचन देण्याची शामभट्टाला इतकी घाई झाली होती कीं जोत्याच्या पायऱ्या चढतांना वरच्या पायरींत पाय अडखळून तो खालीं पडला. यापुढें शिवाजीची व त्याची भेट कोणत्या प्रकारें झाली व त्यांचीं काय भाषणें झालीं तीं येथेंच देतां येत नाहींत, सबब तीं पुढच्या प्रकरणांत देतों.

प्रकरण अठरावें.

पाय अडखळून शामभट्ट धाडकन् पडला असें पाहून शिवाजी जलदीनें उठून शामभट्टाजवळ आला, परंतु तो पोहोंचण्यापूर्वीच बटोनें व नरसिंहभट्टानें त्यास हातीं धरून उठविलें होतें. पागोट्याच्या पट्टचा गळ्यांत आल्या होत्या, आंगावरील दुहेरी धोतर जमिनीवर लोळत होतें, व गुडघ्यास जोत्याचा दगड लागून रक्त निघालें होतें, तरी त्यानें त्यांविषयीं काळजी केली नाहीं. आपणापुढें उभा असलेला मनुष्य शिवाजीच आहे असें त्याच्या तोंडावरून ओळखून, मोठ्या लगबगीनें त्यानें आपला उजवा हात त्याच्या डोक्यावर ठेविला आणि त्यास आशीर्वाद दिला. " हे महात्म्या, योद्धचा, वीरा, तुझा जयजयकार असो; तुला यशप्राप्ति होवो व तूं दीर्घायु हो. मी शामभट्ट चिचवडकर जोशी आहें. ज्योतिषविद्येच्या साहाय्यानें मीं तुझें भविष्य कथन केलें आहे. मजवर तूं आपला विश्वास ठव, म्हणजे देव तुला कमी पडूं देणार नाहीं." शामभट्टानें व शिवाजीनें परस्परांला आजपर्यंत पाहिलें नव्हतें, परंतु ते एकमेकांस नांवानें व कीर्तीनें मात्र ओळखीत होते. शामभट्टानें शिवाजीला दोन निरोप पाठविले होते ते त्यास पोहोंचले होते. एक निरोप मराठ्याबरोबर पाठविला होता व दुसरा चिट्कंभट स्वतः घेऊन गेला होता, हें आपणास स्मरत असेल. शिवाजी कोण, कोणाचा मुलगा, त्याचा स्वभाव व

पराक्रम कसा आहे, व त्यानें काय उद्योग चालविला आहे, यांविषयीं माहिती शामभट्टानें मिळविली होती; व शामभट्टाचे निरोप पोहोंचल्यापासून त्याजबद्दलच्या हकीकतीचा शोध शिवाजीनें केला होता. त्या दोघांनीं परस्परांस समक्ष पाहिलें मात्र नव्हतें, तथापि दोघांची साधारण माहिती दोघांनाहि विदित असल्यामुळें प्रत्यक्ष भेटीच्या वेळीं त्यांची ओळख तिऱ्हाइतास करून द्यावी लागली नाहीं. शिवाजी जात्या धर्मनिष्ठ व देवब्राह्मणांस पूज्य मानणारा होता. त्यानें शामभट्टाला आपल्या गादीवर लोडाशीं टेंकून बसविण्याचा प्रयत्न केला, परंतु शामभट्ट तेथें बसला नाहीं. तो म्हणाला—" शिवाजी, तूं राजचिन्हांनीं अलंकृत दिसतोस, त्या अर्थीं तूं राजा आहेस असें समजून मीं तुझा मान ठेविला पाहिजे. देवब्राह्मणांच्या आशीर्वादानें तूं या भरतभूमीचें राज्य करशील यांत संदेह नाहीं. आतां तूं म्हणशील कीं प्रस्तुत कालीं तूं राजा नाहींस, सामान्य वीर आहेस, तरी त्या अर्थानें देखील तूं मला श्रेष्ठ आहेसः कसें तें सांगतों ऐक." असें म्हणून शामभट्टानें शिवाजीला गादीवर बसविलें व त्याच्याजवळ आपणहि बसला. बसण्यापूर्वी "आप बैठो, आप बैठो" अशा मुसलमानी थाटाप्रमाणें दोघांनीं परस्परांचा मान ठेविला, नंतर दोघेहि बरोबर खालीं बसले. ते बसल्यानंतर इतर लोक आपापल्या दर्जाप्रमाणें कांहीं अंतरानें बसले. नंतर तपकिरीची चिमूट ओढून शामभट्ट म्हणाला—" विद्वानाला फक्त एकच गुण असतो परंतु वीराला दोन असतातः ते गुण बुद्धि

आणि शारीरशक्ति हे होत. दुसऱ्या रीतीनें पाहिलें तरी वीराला जास्त गुण येतात. मुख्य रस तीन आहेतः शृंगार, वीर आणि करुण. विद्वान् पुरुषापासून फक्त पहिला आणि शेवटला असे दोन रस उत्पन्न होतात, परंतु वीर तिन्ही रसांना जाणतो. वीर नेहमीं लोकांचे गळे कापतो असें नाहीं, किंवा शृंगार केलेली रूपवान् स्त्री अथवा उत्तम कविता ह्यांना तो मोहित होत नाहीं असेंहि नाहीं. आतां कोणाची शक्ति मोठी आहे हें पाहूं. विद्वानाला शास्त्रार्थ कळतो, विचार सुचतात, व कल्पनाशक्तिहि असते, परंतु त्याला आपल्या हातांनीं कोणतेंहि कर्म प्रत्यक्ष करून दाखवितां येत नाहीं. उल्हाटयंत्र, बाण, भाला, बंदूक, बरची, जंबिया, खंजीर, तरवार, इत्यादि हत्यारें कशीं असावींत, त्यांची लांबी रुंदी किती असावी, त्यांचा उपयोग काय, त्यांची क्रिया कशी घडते, इत्यादि गोष्टींची माहिती त्याला तोंडानें सांगतां येते. त्याची जीभ नुसती चरचर चालते, तसा वीराचा हातहि चालतो. आपलें हत्यार कसें असावें हें वीराला कळतें व त्याचा उपयोग तो आपल्या हातानें करून दाखवितो तसा विद्वानास दाखवितां येत नाहीं, म्हणून वीराची शक्ति विद्वानापेक्षां मोठी आहे असें म्हणावें लागतें. ज्याचें शरीर केवळ धष्टपुष्ट आहे तो केवळ हमाली करण्याच्याच उपयोगीं पडतो, म्हणून हमाली करणारीं सर्व मनुष्यें योद्धे नसतात व सर्व योद्धे वीर नसतात. वीरांच्या अंगीं विद्या—नुसतें लिहिणें व वाचणें यांचीच

* तोफ.

विद्या नव्हे—धैर्य, प्रसंगावधान व अक्कल हे सर्व गुण पाहिजेत. शत्रूंचे बेत कसे ओळखावे, शत्रूंचा भेद कसा करावा, व त्यांना जेरीस कसें आणावें, हें अकलेशिवाय व ऐतिहासिक ज्ञानाशिवाय समजत नाहीं. किल्लचाचा बुरूज शत्रु मुळापासून खोदीत आहेत व तो घटकेनें गडगडत खालीं पडणार अशी भीति उत्पन्न झाली असतांहि त्या बुरुजावर उभें राहून वीरांला शत्रूंवर हल्ला करावा लागतो. असलें धारिष्ट वीरांला करावें लागतें. किल्लचाला वेढा पडला आहे व आपले लोक आंतल्या आंत खास उपाशीं मरणार आहेत, अशा संकटसमयीं चोरवाटेनें निसटून जाण्याचें प्रसंगावधान वीरांना ठेवावें लागतें व बाहेर पडून शत्रूंशीं धैर्यानें झुंजावें लागतें. आपण एकटे सांपडलों आहों व आपले शिपाई दूर राहिले आहेत, अशा घोर प्रसंगांत वन्य पशूंसारखीं क्रूर कर्में करण्याचें धाडस वीराला अवश्य पाहिजे. शिवबा, तूं वीर आहेस व विद्वानापेक्षां श्रेष्ठ आहेस, म्हणून तुझी योग्यता मजपेक्षां मोठी आहे, यांत संशय नाहीं."

शिवाजीला लिहितां वाचतां येत नव्हतें तरी ह्या गोष्टी समजण्यापुरतें त्याला ज्ञान नव्हतें अशी गोष्ट नव्हती. ज्यानें वाघनखें घालून अफझुलखानाला युक्तीनें फाडला, ज्यानें सिद्धिजोहाराच्या हातांवर तुरी देऊन रांगण्याची वाट धरली, ज्यानें दिल्लीच्या बंदोबस्तास तुच्छ मानून आपली आपण सुटका करून घेतली, व ज्यानें बादशाहीस धाब्यावर बसवून मराठ्यांच्या गादीची स्थापना केली, तो शिवाजी मूर्ख

होता व त्याला कळत नव्हतें असें कोणी म्हणणार नाहीं. शामभट्टाचें बोलणें संपल्यावर शिवाजी म्हणाला—" जोशीबुवा, आपण वीर व विद्वान् यांच्या गुणांची व शक्तींची तुलना केली, परंतु दोघांतून जास्त श्रम कोणाला पडतात हें आपण सांगितलें नाहीं. मला असें वाटतें कीं योद्धा सहज तयार होतो व विद्वानाला परिश्रम करावे लागतात. जी वस्तु सहज मिळते तिची योग्यता कमी असते व जी कष्टसाध्य व दुर्मिळ असते तिला जास्त मोल येतें. शिपाई ठेवणें झाल्यास थोडा पगार द्यावा लागतो व विद्वानाला जास्त पगार द्यावा लागतो. अशा मानानें पाहिलें तर योद्धयापेक्षां विद्वानास मोल जास्त पडतें म्हणून विद्वान् मोठा आहे असें ठरतें." त्यावर शामभट्टानें उत्तर केलें—" श्रमाविषयीं विचार केला असतां मला वाटतें कीं वीरांचेच श्रम जास्त आहेत. विद्वान् आणि वीर हे दोघे पहिल्यानें गरीब स्थितींत होते असें घेऊन आपण चालूं. सर्व गरीबच असतात असें जरी नाहीं तरी निकृष्टावस्था घेऊन आपण दोघांच्या श्रमांचा विचार करूं. जो गरीब असतो त्याला चांगल्या वस्तूंची नेहमीं वाण असते. वाण असली म्हणजे मनुष्याला सर्व दुःखें सोसावीं लागतात. जेवणाखाणाचे, कपड्यालत्त्याचे किंवा दोन्ही हाल विद्यार्थ्याचे होतात, तथापि जाडीभरडी भाकर, जोंधळ्याच्या कण्या अगर नाचण्याची आंबील तरी त्याला खावयास मिळते. हातरायाला घोंगडी, मग ती फाटकीतुटकी कां असेना, व पांघरावयास एखादें जुनें रगटें त्याला सांपडतें. परंतु शि-

पायानें बजाविलेल्या कामगिरीस नाहीं म्हणतां येत नाहीं. धन्याकरितां त्याचे किती हाल झाले हें त्याला झालेल्या जखमांवरून शाबीत होतें. विद्वान् आत्मशुद्धि करण्यास शिकवितो व आपल्या मुलाबाळांना व आप्तवर्गांना सुखी ठेवितो; चोरांपासून, दरवडेखोरांपासून, बंडवाल्यांपासून शिपाई सर्व लोकांचें रक्षण करतो, व गांवाचें, संस्थानाचें व राज्याचें शत्रूंपासून रक्षण करतो. तूं शिपाई असल्यामुळें मजपेक्षां श्रेष्ठ आहेस यांत संशय नाहीं. "

बटोनें कारणावांचून बोलूं नये असा शामभट्ट व बटो या दोघांमध्यें झालेला करार मोडलेला आहे, असें बटो आपल्या मनांत समजत होता हें मागें सांगितलेंच आहे. शामभट्टानें आपणाकडे श्रेष्ठत्व घेतलें नाहीं हें बटोला मानवलें नव्हतें. विद्वान् श्रेष्ठ आहे अशाविषयीं आधार तो आठवूं लागला होता. शामभट्टाचें भाषण संपल्यावर तो म्हणाला—" विद्वान् आपल्या तोंडानें आपली प्रशंसा करीत नाहींत हें त्यांना योग्य आहे. त्याप्रमाणें माझ्या गुरूनें आपल्या स्वतःची प्रशंसा केली नाहीं हें योग्यच आहे, परंतु शस्त्रकलेपेक्षां विद्वत्ता श्रेष्ठ आहे अशाबद्दल पुष्कळ ग्रंथकारांचीं मतें आहेत, त्यांपैकीं मी एक सांगतों. विद्यात्शस्त्रंचशास्त्रंचद्वैविद्येप्रतिपत्तये । आद्याहास्यायवृद्धत्वेद्वितीयोद्दीयतेसदा ॥ शास्त्रविद्येचा उपयोग मनुष्यावस्थेमध्यें सदासर्वकाळ सारखा होतो, परंतु शस्त्रांचा उपयोग म्हातारपणीं हास्यास्पद होतो. मान डिगडिग हालते आहे, हात थरथर कांपताहेत व पाय लटलट करता-

हेत अशा वेळेस शस्त्रांचा काय उपयोग करतां येईल ? विद्वत्ता पुष्कळ प्रसंगीं मनुष्यांच्या उपयोगीं पडते व तिची उपयुक्तता कवींनीं वर्णन केली आहे. (कामधेनुगुणाविद्याअकालेफलदायिनी । प्रवासेमातृसदृशीविद्यागुप्तंधनंस्मृतम्) पुन्हा—(विद्यानामनरस्य रूपमधिकंप्रच्छन्नगुप्तंधनं। विद्याभोगकरीयशःसुखकरीविद्यागुरूणांगुरुः ॥ विद्याबंधुजनेविदेशगमनेविद्यापरंदैवतं । विद्याराजसुपूजितानतुधनं विद्याविहीनःपशुः ॥) असा हा विद्येचा प्रभाव आहे व तो लेखनपठनादि विद्येचा असावा असें मला वाटतें. सादीसाहेबहि असेंच म्हणतात. (कलम् गोयद् के मन्शाह जहान्नम् कलम् कुशरा के बदौलत् रसानम् ॥ अगर बद्बख्त बाशद मंचदानम् । वलेऽकबार बदौलत् रसानम् ॥) लेखणी म्हणते कीं मी जगाची बादशाहीण आहें. माझा जो कोणी स्वीकार करील त्याला मी धनदौलत देईन; तो फुटक्या नशीबाचा असला तरी त्याला मी एक वेळ दौलतीस पोहोंचवून देईन. यास्तव आपण

---

१ मुसलमानांत सादीसाहेब या नांवाचा एक प्रख्यात पुरुष होऊन गेला. सत्पुरुषांचीं वचनें आपण दाखल्यासाठीं घेतों त्याप्रमाणें सादीचीं वचनें मुसलमान लोक म्हणतात. पूर्वीच्या काळीं मुसलमान लोकांच्या वर्चस्वामुळें तीं हिंदुलोकांनाहि म्हणतां येत होतीं. जसें हल्लींचे लोक मिल्ल, शेक्सपीयर इत्यादि इंग्रजी सत्पुरुषांचीं वचनें दाखल्याकरितां घेतात त्याप्रमाणें त्यावेळेस बटोनें सादीसाहेबाचें वचन म्हणून दाखविलें; तें म्हणण्यास प्रत्यवाय नव्हता.

विद्वान् पुरुषाला मोठें ह्मणावें व माझ्या गुरूचा मान ठेवावा हें योग्य आहे. "

स्तुति सर्वांना प्रिय असते. आपली स्तुति केलेली पाहून शामभट्टाला बटोनें मध्यस्ती केल्याचा राग आला नाहीं. तो म्हणाला—" बटो, मी ज्या अर्थानें बोललों तो अर्थ तुला बरोबर कळला नाहीं. अरे, विद्या या शब्दांत धनुर्वेद, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, मीमांसा, व्याकरणादि सर्व शास्त्रांचा समावेश होतो. जो धनुर्वेद पाठ म्हणतो त्याला विद्वान् म्हणतात खरें, परंतु जो आपल्या हातांनीं धनुर्वेदाची क्रिया करतो त्याला वीर म्हणतात. अशा अर्थानें विद्वान् मोठा किंवा वीर मोठा या गोष्टीचा निर्णय चाललेला आहे. मला असें वाटतें कीं वीर विद्वानापेक्षां श्रेष्ठ आहे. ज्या वेळेस ज्या कामाची गरज फार असते त्यावेळेस तें काम अत्यंत उपयोगाचें असतें. हल्लीं आपल्या देशांत शांतता नाहीं. विजापूरसरकारामागें मोंगल हात धुऊन लागला आहे, त्यामुळें राज्यकारभार ढिला पडला आहे. गांवांत, घरांत, बाजारांत, देवळांत, झोटिंग बादशाही माजत चालली आहे. अशा समयास योद्ध्यांची फार गरज आहे व श्रेष्ठत्व त्यांजकडे आहे. शांतता असल्यावांचून लिहिण्यावाचण्याच्या विद्येची मातब्बरी कळत नाहीं. लेखनपठनविद्येचें हें काम आहे कीं लोकांना नीतीनें वर्तनकरण्याचे कित्ते घालून द्यावे व लोक सद्धर्मास लावावे; लोकांच्या सोईचे कायदे करून द्यावे व कायद्याप्रमाणें वागण्यास लोकांना लावावें; व्यापाराविषयीं नियम करावे व नि-

यमाप्रमाणें व्यापार चालतो कीं नाहीं तें पहावें; खरें व खोटें यांचा न्याय करावा. हे स्तुत्यमार्ग नाहींत असें कोण म्हणेल ? परंतु कायदेकानू चालू करण्यापूर्वी देशांत शांतता व स्वस्थता राखिली पाहिजे; लुटारू, बंडखोर व डाकू अशा लोकांना शासन केलें पाहिजे, जिवाचें व मालमत्तेचें संरक्षण केलें पाहिजे; धामधूम व पुंडाई मोडली पाहिजे. हीं कामें वीरांच्या हातून होतात. नांगरानें जमीन नांगरल्यावर जशी ती बीं पेरण्यास तयार होते त्याप्रमाणें लढाया करून देशांत स्वस्थता झाल्यावर कायदेकानू करण्याच्या कामास सुरुवात करतां येते. हल्लीं आपल्या देशांत बखेडा माजला आहे तो मोडण्याकरितां शिवाजीसारखे योद्धे तयार झाले पाहिजेत. याकरितां हल्लींच्या वेळेस विद्वानापेक्षां वीरांचा ज्यास्त उपयोग आहे व ते श्रेष्ठ आहेत. अरे बटो, तूं पहा कीं दिवाळीच्या दिवशीं गरीबगुरीब सुद्धां आपलें घरदार सोडीत नाहींत, अशा सोन्यासारख्या सणाचा त्याग करून जो गृहस्थ परपीडा निवारण करण्याकरितां व स्वधर्माचें रक्षण करण्याकरितां गांवोगांव हिंडण्यास निघाला आहे, त्याला जर श्रेष्ठ म्हणूं नये तर कोणाला म्हणावें बाबा ? सांग बरें. "

या भाषणावर उत्तर देण्याकरितां बटो तयार होता परंतु तो बोलूं लागण्यापूर्वी शिवाजी शामभट्टास म्हणाला. " जोशीबुवा, आपणहि मजसारखे दिवाळीच्या सणाचा त्याग करून गांवोगांव हिंडण्यास निघाला आहां. आपलें कारण मात्र वेगळें असेल तें

मला कळलें नाहीं." शामभट्टानें उत्तर केलें—"मी पंचांगावरून ग्रह वर्तवितों, कोणता ग्रह कोणत्या राशीला पीडा करणारा आहे तें लोकांना सांगतों, व तच्छमनार्थ ग्रहांचा जप करतों, दानें घेतों व ग्रहांचें बल हरण करतों. शनि, राहु, केतु, मंगळ इत्यादि क्रूर ग्रह क्रुद्ध होऊन लोकांना अतिशय पीडा करूं लागले आहेत. आकाशांत धूमकेतु, ज्यास शेंडेनक्षत्रहि म्हणतात तो, उगवला आहे. त्याचा गुण असा आहे कीं पृथ्वीवर राज्यक्रांति होईल. एक राजा जाऊन दुसरा राजा होईल. दंगेधोपे होतील. हा आलेला प्रसंग सर्व लोकांना कळवावा, क्रूर ग्रहांची व अनर्थकारक धूमकेतूची शांति करावी व अरिष्ट घालवावें या हेतूनें मी घरून निघालों आहें. लोकांचा ज्योतिषावर भरंवसा आहे. मी मुहूर्त देईन त्या दिवशीं ते लग्नकार्य करतात, घर बांधतात, मौंजीबंधन करतात, गर्भाधान करतात, ग्रामांतरास जातात, अश्व, गज इत्यादि जनावरें विकत घेतात, उसांचे घाणे चालवितात, कृषिकर्म करतात, आणखी काय काय म्हणून सांगावें? ज्योतिःशास्त्र खरें आहे अशाविषयीं चमत्कार दाखवून लोकांची खातरी करून द्यावी अशाबद्दल मीं विडा उचलला आहे व मी सर्वांना जिंकून त्यांजपासून मानपत्र मिळवणार आहें. तुला मुहूर्त पहाणें असेल व दिग्विजय करणें असेल तर तूं मला विचार. तुझें हटकून काम होईल असा मुहूर्त मी काढून देईन. तुला अनिष्ट ग्रह आले असतील त्यांची मी शांति करीन व प्रत्येक कामांत तूं यशस्वी होऊन घरीं जाशील."

ग्रंथ संग्रहालय

शामभट्टाच्या एकंदर भाषणांवरून तो विद्वान्, विचारी व ज्ञानसंपन्न ब्राह्मण आहे अशी सर्वांची समजूत झाली. ज्योतिःशास्त्राचें त्याला अत्यंत वेड नव्हे–नाद आहे–ही गोष्ट कोणासच कळली नव्हती. शिवाजी म्हणाला—" मुहूर्त पाहण्याची संवय काम करणाऱ्या मनुष्याच्या अगदीं उपयोगाची नाहीं अशी माझी समजूत आहे. ज्याला आजचें काम उद्यांवर टाकण्याचें आहे त्याला मात्र मुहूर्त पहाणें सोईचें आहे. तोरणा किल्ला घेतांना किंवा त्यांत पुरलेलें द्रव्य काढतांना, किंवा राजगड किल्ला बांधतांना मी मुहूर्त पहात बसलों असतों तर तीं कामें माझ्या हातून कदाचित् झालीं नसतीं असें मला वाटतें." यावर शामभट्टानें झटदिशीं उत्तर दिलें. " मुहूर्तावर काम केल्यानें तें होणार नाहीं ही अगदीं वेडी समजूत आहे, तिजवर तूं मुदली भरंवसा ठेवूं नको. ही असली वेडी समजूत एखादे वेळेस तुझा कार्यघात करील. आतां तूं म्हणशील कीं तूं मुहूर्त पाहिले नव्हतेस तरी तुझीं कामें झालीं कीं नाहीं ? तर त्यास एक उत्तर आहे. अंगिरा ऋषीचें असें मत आहे कीं मनाच्या उत्साहकालीं कार्यासाठीं गमन करावें म्हणजे काम होतें. त्याप्रमाणें तूं मनाच्या उत्साहकालीं काम करण्यास निघालास म्हणून तुझीं कामें झालीं, याकरितां तीं तूं सुमुहूर्तावर केलींस असेंच म्हटलें पाहिजे. सुमुहूर्त असल्यावांचून कोणतेंहि काम होणें नाहीं."

१ श्लोक—उषःप्रशंसतेगर्गःशकुनंचबृहस्पतिः । अंगिरामनउत्साहंविप्रवाक्यंजनार्दनः ॥

असें बोलतांना नरसिंहभट्टाच्या बायकोला दिलेल्या मुहूर्ताची शामभट्टास आठवण झाली, तेव्हां तो म्हणाला—" आज रात्रौ पुष्यनक्षत्रयोग आला आहे, त्या योगावर कोणी हातांत माती घेतली तर देखील तिचें सोनें होईल. शामभट्टजोशाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून पाहिजे तर तूं तसें करून पहा. "

ज्योतिःशास्त्रावर शिवाजीचा मुदलीच भरंवसा नव्हता असें जरी नव्हतें तरी शामभट्टाच्या बोलण्याचें त्यास हंसूं आलें. माती हातांत घेऊन तिचें सोनें होईल अशा गोष्टीवर विश्वास ठेवण्याइतका मूर्ख शिवाजी असता तर त्याला मराठ्यांची गादी स्थापन करतां आली नसती. संभाव्य आणि असंभाव्य ह्या दोन गोष्टींतील अंतर ज्यास कळत नाहीं तो केव्हां व कसा फसेल याचा नेम लागणार नाहीं. ज्याला सर्व गोष्टी खऱ्या वाटतील त्याच्या हातून खऱ्याची व खोट्याची निवडानिवड होणार नाहीं हें उघड आहे. शिवाजीला पुष्यनक्षत्रयोगाचें फल सांगितल्यावर शामभट्ट, बटो व नरसिंहभट्ट हे तिघे परत गेले व शिवाजीला शामभट्टाच्या भेटीचा, बहुभाषणाचा व ज्योतिषफलकथनाचा अचंबा वाटला. धूर्त व शहाणे लोक एका शब्दावरून मनुष्याची परीक्षा करतात. शिवाजीनें शामभट्टाची कोणती पारख केली ती त्याच्या पुढील वर्तनावरून कळून येणार आहे.

शामभट्ट नरसिंहभट्टाच्या घरीं परत आल्यावर त्यानें सायंसंध्या व स्तोत्रपठनादि कर्में सारिलीं तों रात्रीचे नऊ वाजण्याचा सुमार येऊन पोहोंचला. नर-

सिंहभट्टाच्या बायकोनें स्वयंपाकाची चूल सारवून स्वच्छ ठेविली होती, चुलीभोंवतीं रांगोळी काढलेली होती, गंधादि पूजेचें साहित्य तबक भरून ठेवलेलें होतें, आम्रपल्लव, दुर्वा व पिंपळाचीं पानें यांचा लहानसा ढीग जवळच रचलेला होता, कल्हई लाविलेलें व घांसून लखलखित व स्वच्छ केलेलें एक पितळेचें तपेलें स्थंडिलावर मांडलेलें होतें; पांढऱ्या तुरी, पांढरे वाटाणे, करडी व जोंधळे यांनीं भरलेलीं लहान लहान चार टोपलीं तेथें ठेवलेलीं होतीं. ही तयारी कशाची होती व त्या पदार्थांचा काय उपयोग होता, व नरसिंहभट्टाच्या बायकोचें दरिद्र घालविण्याकरितां शामभट्टानें केलेला प्रयत्न कितपत तडीस गेला, ह्या गोष्टींचें विवेचन पुढील प्रकरणांत केलें आहे.

प्रकरण एकोणिसावें.

नरसिंहभट्टाची बायको गोपिकाबाई आज फारच लगबगींत होती. तिच्या पोटांत आनंद मावत नव्हता. शामभट्टानें पूजेचें साहित्य पाहिलें तेव्हां त्यांत ऊदबत्ती नाहीं असें त्यानें म्हटल्याबरोबर ती फुटाण्यासारखी उड्या मारीत ऊदबत्ती आणावयास गेली. जोंपर्यंत आशा आहे तोंपर्यंतच कायती कामें करण्याची मजा आहे; निराशा झाल्यावर आपलें एक पाऊलहि पुढें पडत नाहीं. गोपिकाबाईला अशी कोणती आशा लागली होती? पूर्व दिवशींच्या संभाषणावरून आपणांस कळलेंच आहे कीं तिला श्रीमंत व्हावयाची इच्छा होती व तिची इच्छा साठ घटकांनंतर पूर्ण होईल असें शामभट्टानें आपल्या फलज्योतिषविद्येच्या जोरावर तिला सांगितलें होतें. शामभट्टानें जें सामान तयार करून ठेवण्यास सांगितलें होतें तें तिनें आपलीं डोकींतलीं विकून आणलें होतें. मुलगा होण्याकरितां ज्या बायका आपल्या हातांतील सोन्याची पाटली पंचाक्षऱ्यास देऊन त्याजवळून चिमुटभर अंगारा घेतात, किंवा आपला नवरा आपल्या मुठींत येण्याकरितां ज्या बायका घरांतलें धड लुगडें, पायली दोन पायली दाणे, अगर भाऊबिजेच्या ओंवाळणीस मिळालेला रुपया, किंवा आठ आणे, सरोदी जोशास दान करून त्याच्या हातचा दोरा बांधून घेतात, त्या बायकांपेक्षां गोपिकाबाई शहाणी नव्हती हें उघड आहे. गर्भाशयांत दोष अ-

सल्यामुळें अगर शरीररचनेंत व्यंगता झाल्यामुळें गर्भ-धारणा होत नाहीं, हें शारीरशास्त्राचें ज्ञान ज्यांना होत नाहीं, त्या बायका पंचाक्षऱ्याच्या थापांस भुलून फसतात. जशी देवानें एकास अक्कल कमी व दुसऱ्यास जास्त दिलेली असते, तशी ही आपली शरीररचना ईश्वरनिर्मित असते. जो जन्मांध उपजला आहे त्यानें डोळे येण्याविषयीं खटपट करणें व्यर्थ आहे. जो थोटा किंवा पांगळा उपजला आहे, त्यानें हातपाय फुट-ण्याविषयीं प्रयत्न करणें व्यर्थ आहे, आणि जो बाळ-पणापासून बहिरा व मुका आहे त्यानें ऐकण्याची व बोलण्याची आशा करणें व्यर्थ आहे. कोणा मनुष्याचें व आपलें सख्य होणें ही गोष्ट त्याच्या व आपल्या देहस्वभावावर, आचरणावर व प्रकृतीवर अवलंबून आहे. जो शक्तीनें, बुद्धीनें, विद्येनें, द्रव्यानें किंवा अधिकारानें कमी आहे त्याला आपल्याहून वरिष्ठ व श्रेष्ठ पुरुषांशीं सख्य करणें झाल्यास त्यांच्या अनुरो-धानें त्याला आपलें वर्तन ठेवावें लागतें. खुशामत ही लहान मुलापासून तों म्हाताऱ्या मनुष्यापर्यंत सगळ्यां-ना सारखी प्रिय असते. ज्या मुलास आपण कौतुका-नें कडेवर, खांद्यावर फुलासारखें वागवितों त्यानें आप-ल्या गळ्याला घट्ट मिठी मारून आपले मुके घ्यावे यांत नवल नाहीं. हातांत किंवा गळ्यांत गंडा किंवा दोरा बांधिल्यानें जर दुसऱ्याचें चित्त आपणाकडे वळ-विलें जाईल, असें निर्भ्रांत व अचुक घडविण्याचें साम-र्थ्य आपल्या अंगीं येईल, तर सरोद्याला, जोशाला व इतर भोंदूंना दारोदार भीक मागत फिरावें लागणार

नाहीं. कारल्याची वी पेरून उगवलेल्या वेलाला गोड सिताफळें येतील असें समजणाराला वेडा न म्हणावें तर काय म्हणावें हें मला समजत नाहीं. शामभट्टाच्या शिकविण्यावरून गोपिकाबाईनें मांडलेलें कृत्य अशाच प्रकारचें होतें.

पूजेची सिद्धता झाल्यावर गोपिकाबाईनें नरसिंहभट्टाच्या उजव्या हातास आपलें बोट लावून तपेल्याची यथासांग पूजा केली! पिंपळाच्या[1] व वेडाच्या[2] झाडांची, घुसळ[3]खांबांची, कोयत्यांची, मातीच्या मडक्यांची[4], कुऱ्ह्यांची, गाईची, बैलांची[5], किंवा शमीच्या[6] झाडांची पूजा करण्याची चाल जर बेधडक आपणामध्यें चालत आहे तर तपेल्याची पूजा केल्याबद्दल नरसिंहभट्टास किंवा गोपिकाबाईस किंवा पूजा करविणाऱ्या शामभट्टास हंसण्याची आपणास गरज नाहीं. तपेल्याची पूजा संपूर्ण झाल्यावर नरसिंहभट्टानें आपल्या पत्नीसह अग्नीची पूजा केली; व पूजासांगतासिध्यर्थ शामभट्टाची पूजा केल्यावर गोपिकाबाईनें चुलींत जाळ केला, पूजा केलेलें तपेलें चुलीवर ठेविलें, व जोंधळे, तुरी, वाटाणे व करडी हीं सर्व धान्यें पायलीभर मोजून घेऊन धुऊन ठेवलीं. इतकें झाल्यावर शामभट्ट आंगणांत गेला व मुहूर्तास किती अवकाश आहे तें

---

१ सोमवतीला पिंपळाची पूजा करतात. २ ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेला वडाची करतात. ३ वाढदिवशीं घुसळखांबाची व षष्ठीपूजनाचे दिवशीं कोयत्याची पूजा करतात. ४ अक्षतृतीयेला. ५ सटेच्या दिवशीं. ६ वसूबारसाचे दिवशीं. ७ पोळ्याचे दिवशीं. ८ दसऱ्याचे दिवशीं.

ग्रंथ संग्रहालय नं.

पाहण्याकरितां त्यांकडे टक लावून उभा राहिला. पुढें काय प्रकार घडतो तो पाहण्याकरितां नरसिंहभट्ट व बटो ओसरीवर येऊन पांघरूण घेऊन स्वस्थ बसले. बटोनें मधून मधून एक एक झोपेचा गुटका पण घेतला. आतांचे कृत्यांत त्या दोघांचें कांहींच काम नव्हतें, म्हणून त्यांस कांहीं वेळपर्यंत विश्रांति मिळाली.

कांहीं वेळ चांदण्याकडे पाहिल्यावर शामभट्ट पुन्हा चुलीजवळ गेला. तपेल्यांतील पाण्याला आधण आलें नव्हतें म्हणून चुलींत आणखी कोळसे टाकण्याकरितां त्यानें गोपिकाबाईस सांगितलें, पूर्वेकडे तोंड करून हातांत धान्याची रोवळी घेऊन कसें उभें राहावें तें त्यानें तिला शिकविलें,व आपल्या समक्ष त्यानें तिला तशी उभी केली. नंतर तो तिला म्हणाला—" गोपिकाबाई, आपल्या श्रमाचें सार्थक मुहूर्त साधण्यावर आहे. जर का एक पळ अलीकडे किंवा पलीकडे तुम्हीं हीं धान्यें तपेल्यांत ओतलीं तर सगळी मेहनत वायां जाईल व तुम्ही भिकारी ते भिकारीच जन्मपर्यंत राहाल. याकरितां स्वस्थ चित्तानें, सावधगिरीनें व हुषारीनें तुम्ही हें काम करा. मी आतां आंगणांत जाऊन तंतोतंत मुहूर्त साधण्याकरितां वेळ पाहात बसतों. तशी वेळ आली म्हणजे मी हूं म्हणेन. मी हूं म्हटल्याबरोबर देवाचें नांव घेऊन तुम्ही हीं धान्यें या तपेल्यांत वैरा आणि झांकण ठेवा. पुढें काय करावयाचें तें मग मी तुम्हाला सांगेन, तथापि हल्लीं इतकेंच सांगून ठेवितों कीं या धान्यांची उसळ न

होतां त्यांच्या दाण्यांचीं मोत्यें होतील, तीं तुमच्या हातीं लागलीं म्हणजे तुम्हीं पायलीभर मोत्यांची धनीण व्हाल." असें म्हणून शामभट्ट वेळ पाहण्याकरितां आंगणांत गेला. हें शामभट्टाचें बोलणें ऐकून गोपिकाबाई काळजींत पडली. काल रोजीं तिचा असा समज झाला होता कीं मी पायलीभर मोत्यांची धनीण होईन एवढी मोठी श्रीमंती मला येणार आहे. आतां नुसतीं मोत्येंच आपणास मिळणार आहेत असें तिला कळलें, तरी तिची अगदीं निराशा झाली नाहीं. पायलीभर मोत्यें आपणास मिळणार आहेत त्यांवर काय काय घेतां येईल याचा ती आतां विचार करूं लागली. ती आपल्याशीं म्हणाली—"शामदेवानें लहानमोठ्या आकारांचीं धान्यें ध्यावयास मला सांगितलें त्याचें कारण आतां मला कळलें. त्याचें कारण असें असावें कीं धान्याच्या आकाराप्रमाणें लहान मोठीं मोत्यें व्हावीं. कुडुकांस, बाळ्यांस व बुगड्यांस जोंधळ्याएवढालीं मोत्यें वाईट दिसणार नाहींत. बाळ्याला एक कंठी आणि त्यांच्या व माझ्याकरितां अशीं दोन पेंडी वाटाण्याएवढ्या मोत्यांचीं चांगलीं शोभतील. कांहीं मोत्यें विकून मला सोनें, धान्य, कापड व किरकोळ सर्व सामान घेतां येईल; आणि म्हणण्यासारखी जरी मी श्रीमंत होणार नाहीं, तरी मला केवळ भिकाऱ्याची बायको लोक म्हणणार नाहींत."

आपल्या पुढच्या स्थितीचा ती याप्रमाणें विचार करीत आहे तों शामभट्ट आणखी एकदां घरांत आला.

आपण आल्याचें गोपिकाबाईस कळलें सुद्धां नाहीं असें पाहून तो म्हणाला—"अहो गोपिकाबाई, मी येथें आलों हें जर तुम्हांला कळलें नाहीं तर मी आंगणांतून "हूं" शब्द करीन तो तुम्हांला कसा ऐकूं येईल? मला वाटतें कीं हा मुहूर्त तुम्ही दवडविणार व ही सोन्यासारखी संधि घालविणार आहां! परंतु कांहीं चिंता नाहीं. ज्या जोशाला मुहूर्त पाहतां येतो त्याला तो साधण्याविषयीं पक्की युक्ति पण माहित असते." असें म्हणून त्यानें नरसिंहभट्टास बोलावून आणिलें आणि झालेली हकीकत त्याला कळविली. आपली मान खालीं घालून गोपिकाबाई तशीच उभी राहिली. काय करते बिचारी! चूक झाली खरी. तिलाहि आपल्या स्थितीचें वाईट वाटलें. ती आपल्याशीं म्हणाली—"खरेंच. मी जर बुगड्या, बाळ्या व मोत्यांच्या पेंड्यांची अशी कल्पना करीत उभी राहिलें असतें तर मला "हूं" म्हटलेलें ऐकूं आलें नसतें, आणि मीं आपल्या पायांवर धोंडा पाडून घेतला असता." नंतर ती शामभट्टाच्या चांगुलपणाविषयीं विचार करूं लागली—"तो देव आहे बिचारा. केवळ भोळा सांब आहे. माझें दरिद्र दूर व्हावें म्हणून मनापासून मेहनत करीत आहे. मी देहभानावर नाहीं व मला आंगणांतला शब्द ऐकूं येणार नाहीं येथपर्यंत तो माझी काळजी घेतो आहे! गरिबाची एवढी काळजी कोण घेतो? मीं त्याला पैसाअडका दिला नाहीं, किंवा तो पण मजजवळ कांहीं मागत नाहीं, तेव्हां देवाच्याच मनांत मीं श्रीमंत व्हावें असें आलें

असावें." तपेल्याच्या पूजेला पंधरा रुपये दक्षणा ठेवावी लागली ती शामदेवाची मिळकत आहे असें तिला वाटलें नाहीं. नशीब तिचें!! इतक्यांत शामभट्टाच्या सांगण्यावरून नरसिंहभट्ट एक दोरी घेऊन आला. दोरीचें एक टोंक त्यानें आपल्या बायकोच्या उजव्या हाताच्या मनगटास बांधलें व दुसरें टोंक शामभट्ट आपल्या हातीं धरून आंगणांत गेला व तेथें नक्षत्रांकडे सुवेळ होण्याची वाट पाहत उभा राहिला. नरसिंहभट्टानें गोपिकाबाईस सांगून ठेविलें कीं मुहूर्ताच्या वेळीं शामभट्ट दोरीला हिसका मारील, तो तिच्या हाताला कळल्याबरोबर त्याच क्षणीं तिनें रोवळींतील धान्य तपेल्यांत ओतावें आणि तपेल्यावर झांकण ठेवावें. ही युक्ति गोपिकाबाईस मानवली. मनगटाला करकचून गांठ दिल्याचें तिला वाईट वाटलें नाहीं!

धान्य आधणांत ओतते वेळीं तेथें दुसरें मनुष्य असूं नये असें शामभट्टानें कळविलें होतें, म्हणून नरसिंहभट्टास चुलीजवळ राहतां आलें नाहीं व गोपिकाबाई वेळेवर काम करते कीं नाहीं हें पाहतां आलें नाहीं. धान्याच्या दाण्यांचीं मोत्यें होण्याचा प्रकार दैविक सामर्थ्यानें होणार आहे व त्या वेळीं पुण्यनक्षत्राच्या देवता प्राप्त होणार आहेत, दुसरें मनुष्य तेथें असल्यास त्या येणार नाहींत, असें नरसिंहभट्टानें शामभट्टाच्या तोंडून ऐकिलेंहि होतें. दाण्यांचीं मोत्यें होतील ही गोष्ट ज्याला खरी वाटली त्याला देवता मनुष्यासमक्ष येणार नाहींत हेंहि खरें वाटलेंच पाहिजे. मांगिणीच्या आंगांत देवी येते व तिच्या पवित्र तोंडा-

नें भूत भविष्य वर्तमान बोलविते, हें खरें आहे असें मानणारे लोक जर हल्लींहि सांपडत आहेत तर दोनशें वर्षांपूर्वी नरसिंहभट्टासारखे श्रद्धावान् पुरुष नव्हते असें म्हणणें व्यर्थ आहे. गोपिकाबाईच्या मनगटास दोरीची गांठ दिल्यावर नरसिंहभट्ट मुकाट्यानें बाहेर आला आणि पडवीच्या खांबाशीं टेंकून उभा राहिला. शामभट्ट शिवाजीस म्हणाला होता कीं या मुहूर्तावर "हातीं माती घेतली तर सोनें होईल" या गोष्टीची त्याला अकस्मात् आठवण झाली. लागलींच तो माती आणावयास गेला व आंगणांतून ओंजळभर माती आणून त्यानें पडवीच्या खांबाशीं तिचा ढीग करून ठेविला. शामभट्टानें दोरी ओढली कीं लागलींच आपणहि मातीची मूठ भरावी असा त्यानें निश्चय केला व डोळ्यांत तेल टाकून पहात असल्याप्रमाणें डोळ्यांची पापणी न लावतां तो शामभट्टाकडे एकसारखा टक लावून पाहूं लागला. मुहूर्तकाळ प्राप्त होतांच शामभट्टानें दोरीला हिसका दिला व तोंडानें "हूं" असा शब्द केला. गोपिकाबाईच्या हाताला दोरीचा झटका बसल्याबरोबर तिनें रोवळींतील धान्य तपेल्यांत ओतलें आणि तपेल्याच्या तोंडावर झांकण ठेविलें. नरसिंहभट्टानें 'हूं' असा शब्द ऐकतांच मूठभर माती हातांत घेऊन आपली मूठ गच्च मिटून धरली!

मनुष्य उद्योग करीत असतां त्याचा वेळ तेव्हांच निघून जातो व घटकेचें पळ गेल्यासारखें त्याला भासतें; परंतु कांहीं काम होणार आहे अशा आशेवर निरुद्योगी होऊन वाट पाहण्याची वेळ आली म्हणजे

उलट अवस्था होते. पळाची घटका वाटूं लागते. तपेल्यावरचें झांकण केव्हां मी काढीन व मोत्यांनीं भरलेलें तपेलें केव्हां पाहीन असें गोपिकाबाईला झालें. दुसऱ्या कोणत्याहि कामाकडे तिला बघवत नव्हतें किंवा तिचें चित्त जात नव्हतें. नरसिंहभट्टाची तीच मनोवस्था झाली होती. त्याला दुहेरी आशा लागली होती. तपेल्यांतील मोत्यें केव्हां पाहीन अशी घाई त्याला झाली होती, आणखी मातीचें सोनें कसें दिसेल याविषयीं तो घाबरा झाला होता. हाताची मूठ गच्च भरल्यामुळें कांहीं वेळपर्यंत बारीक मातीचे कण मुठींतून खालीं गळत होते, तो ते आपल्या डाव्या हाताच्या तळहातावर घेऊन लकाकतात कीं काय म्हणून पहात होता. ते मातीचेच कण आहेत असें दिव्याच्या उजेडांत त्यानें पाहिलें तेव्हां तरी ते त्याला एकदम फेंकून देववले नाहींत; कारण तितक्यांत उजव्या हातांतील पदार्थ जड झाल्याचा त्याला भास झाला! नंतर घट्ट मिटलेली मूठ त्यानें आपल्या डाव्या हाताच्या तळहातावर पुन्हा झाडली. पुन्हा कांहीं कण त्याच्या हातावर पडले ते त्यानें पुन्हा दिव्याच्या उजेडानें निरखून पाहिले, तरी माती ती मातीच! तींत कांहीं फरक झाला नाहीं. तपेल्यावरचें झांकण शामभट्ट काढीतोंपर्यंत सगळी मूठ उघडावयाची नाहीं असा त्यानें निश्चय केला. 'आशायाःपरमंदुःखंनिराशाःपरमंसुखं' असें एका कवीनें म्हटलें आहे, परंतु निराशा करून घेण्याचा हिय्या नरसिंहभट्टास झाला नाहीं. आशेमध्यें काळ घालविण्याचा त्यानें निश्चय

केला व कांहीं वेळानें त्याच्या बोटाला कळ लागली तरी उक्त काळ येईतोपर्यंत त्यानें आपली मूठ उघडली नाहीं!

उक्तकाळ एकदांचा येऊन ठेपला. शामभट्टानें बटोला जागें केलें; कारण तो आतां गाढ झोंपेंत होता. नंतर शामभट्ट आणि बटो हे दोघे कांहीं मंत्र म्हणत तपेल्याजवळ बसले. नरसिंहभट्ट आपल्या मुठीकडून तपेल्याकडे व तपेल्याकडून मुठीकडे मधून मधून दृष्टि फिरवीत होता व गोपिकाबाईचें चित्त तपेल्याकडे लागलें होतें. शामभट्टाचें मंत्र म्हणणें संपलें. तो उठला व तपेल्याची पुन्हा पूजा करूं लागला. या वेळेस ती त्यानें एकट्यानेंच केली; घराच्या मालकांकडून करविली नाहीं. पूजा करावी लागते असें नरसिंहभट्टानें पाहिलें तेव्हां त्यानें चोरून लपून आपल्या डाव्या हातानें गंधाक्षता घेऊन आपल्या उजव्या हाताच्या मुठीची पूजा केली! पूजा समाप्त झाल्यावर शामभट्टानें एक सूप आणविलें व त्यांत तपेलें हळूच ओतण्यास सांगितलें. इकडे गोपिकाबाई तपेल्यांतील पदार्थ ओतीत आहे तों नरसिंहभट्टानें एक्या बाजूला होऊन एक सुपली घेऊन तींत आपल्या हाताची मूठ रिकामी केली. सुपलींत मातीच पडलीसें पाहून तो चिंतातूर होऊन लगबगीनें सुपाजवळ आला. त्या वेळेस गोपिकाबाईनें तपेल्यांतील सर्व पदार्थ सुपांत ओतलेला होता. सुपांत घुगऱ्या पडलेल्या पाहून एकच कहर झाला. निराशेनें नरसिंहभट्टाची कंबर बसली व आपली मान गुडघ्यांत घालून तो उकिडवा बसला, व गोपिकाबाई

मोठ्यानें आक्रोश करूं लागली. ती म्हणाली—"बुडाल्यें हो बुडाल्यें, मी सफई बुडाल्यें. दैवयोगानें कोठें मला दोन डोकींतलीं मिळालीं होतीं, तीं मीं घाईनें मातीच्या मोलानें देऊन टाकलीं. आतां माझ्याजवळ विष खायला पैसा राहिला नाहीं. जोशीबोवा, मी या घुगऱ्या घेऊन काय करूं? आपण या गरिबिणीचा अंत पाहूं नका. मी आपले उपकार जन्मभर विसणार नाहीं. कांहीं मजकडून चुकलें असेल तर माझ्या अपराधाची क्षमा करा. मी हा आपणाला पदर पसरतें." परंतु सुपांतील घुगऱ्या शामभट्टाला मोत्याप्रमाणें दिसत होत्या व आपण केलेलें मुहूर्ताचें विधान बरोबर उतरलें असें समजून तो आनंदसमुद्रांत पोहत होता!

इतक्यांत गोपिकाबाईची स्थिति पाहून बटोला एक म्हण आठवली. तो म्हणाला. "तूप गेलें तेल गेलें धुपाटणें हातीं आलें." शामभट्ट आनंदाच्या भरांत असतां गोपिकाबाईचें बोलणें त्यास विषासारखें लाग-

---

* ही म्हण पडण्यास काय कारण झालें तें पुष्कळांस माहीत नसेल असें समजून ही पुढील गोष्ट दिली आहे. एक गडी आपल्या यजमानाकरितां पैशाचें तूप व तेल आणण्याकारतां बरोबर भांडें न घेतां बाजारांत गेला. वाटेंत एक मारुतीचें देऊळ लागलें. मारुतीपुढें मातीचें धुपाटणें पाहून त्यास असें वाटलें कीं तें तप व तेल आणण्याच्या उपयोगी पडेल. नंतर तें हातांत घेऊन तो वाण्याच्या दुकानीं गेला. धुपाटणें पुढें करून धुपाट-ण्याच्या एका अंगांत पहिल्यानें त्यानें एक पैशाचें तूप घेतलें. नंतर खालचें अंग वरतीं करून त्यानें तेल घेतलें आणि तो बिऱ्हाडीं आला. त्याचा यजमान प्रवासी असून स्वयंपाक करीत

लें होतें, व त्याला अत्यंत तिरस्कार व क्रोध आला होता. त्याच वेळेस आगीवर तेल ओतल्याप्रमाणें बटोनें म्हटलेली म्हण त्याच्या कानावर येऊन पडली. तेव्हां त्यानें आपला राग बटोवर काढला. संतप्त होऊन बटोचा कान आपल्या हाताच्या चिमटींत धरून तो त्यास म्हणाला. "अरे शतमूर्खा, अंधा, अभद्रमुख्या, तें सर्व सूप मोत्यानें भरलेलें असून तूं धुपाटणें हातीं आलें म्हणून म्हणतोस हें काय?" इतक्यांत बटोनें आपला कान सोडविण्याची खटपट केली तेव्हां शामभट्टानें तो जोरानें पिळला, आणि तो म्हणाला. "राहूनें तुझ्या डोळ्यांतील बुबुळांत प्रवेश केला आहे, म्हणून तुला मोत्यांच्या ऐवजीं बुगऱ्या दिसत आहेत. तुझ्या डोळ्यांतला राहु काढतों थांब." आतां शामभट्ट आपले डोळे खचित फोडतो असें बटोला वाटलें व त्याच्या सर्वांगास घाम सुटला. तेव्हां तो घाबरून म्हणाला "गुरु महाराज, मी केवळ गोपिकाबाईच्या म्हणण्यावर विश्वास ठेवून बोललों. महाराज, माझ्या कानाची आग डोळ्याकडे

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

होता. गड्याच्या हातांत नुसतें तेल पाहून तो म्हणाला. "अरे, तेल आणलेंस पण तूप कोठें आहे?" असा यजमानाचा प्रश्न ऐकतांच "हें तूप आहे" असें म्हणून गड्यानें आपल्या हातांतील धुपाटणें पुन्हा उलटें केलें. तूप आधींच गळून गेलें होतें, व धुपाटणें उलटें केल्यावर तेलहि सांडून गेलें, तेव्हां आश्चर्यानें तो गडी म्हणाला. "तूप गेलें तेल गेलें, हें धुपाटणें हातीं आलें?"

जाऊन त्यांतील अंधेररूप राहु पाण्याच्या रूपानें आतां गळून पडला आहे व माझी आपल्यासारखी दिव्य दृष्टि झाली आहे. त्या सुपांत मोत्यें आहेत, घुगऱ्या नाहींत, हें मी आतां शपथेवर सांगण्याला तयार आहें."

बटो आपल्याप्रमाणें बोलत आहे असें ऐकून शामभट्टानें बटोचा कान सोडला आणि तो म्हणाला— "बाबारे, असा विचारपूर्वक बोलत जा, मूर्खासारखा बडबड करीत जाऊं नकोस. राहु, केतु इत्यादि दुष्ट ग्रहांची बाधा होऊं देऊं नकोस. अरे, जोशी म्हणविणारे लोक जर ग्रहांच्या तावडींत सांपडतील, तर या अज्ञ जनांची काय कथा? आतां तुझी दिव्य दृष्टि झाली आहे. तूं त्या सुपांतील दोन तीन मोत्यें उचलून घे आणि तीं पाण्यांत घाल. त्या पाण्यानें गोपिकाबाईचें व नरसिंहभट्टाचें आपण मंत्रोक्त मार्जन करूं म्हणजे त्यांना दिव्य दृष्टि प्राप्त होऊन सुपांतील मोत्यांचें खरें स्वरूप त्यांसहि दिसूं लागेल. शामभट्टाच्या हातून आपला कान सुटला व आपले डोळे फुटण्यापूर्वीच आपण मोकळे झालों, असें बटोला समजतांच तो शामभट्टापासून दूर पळाला. मार्जन झाल्यावर नरसिंहभट्टानें व गोपिकाबाईनें सुपांत घुगऱ्या आहेत असेंच सांगितलें तर आपली पूर्ववत् स्थिति होईल अशी त्यास भीति वाटली. सचिंत होऊन त्यानें शामभट्टाकडे पाहिलें, परंतु त्याच्या पाहण्याचा अर्थ शामभट्टास कळला नाहीं. "अरे जा, पाणी आण व सुपांतील दोन तीन मोत्यें त्यांत घाल; पाहतोस

काय ? " असें शामभट्टानें त्यास दरडावून सांगितलें. तेव्हां बटोनें या बोलण्याचा दुसराच तर्क केला. पाणी आणण्यापूर्वी तो आपल्या पडशीजवळ गेला; पडशींतील एक गांठोडें सोडून कांहीं वस्तु त्यानें आपल्याजवळ घेतली; पडशी पहिल्यासारखीच भरून ठेविली; नंतर एका ताम्हनांत पाणी घेऊन तो सुपाजवळ आला. सुपांतील दाणे उचलून घेतल्यासारखें करून आपल्या हातांतील कांहीं वस्तु त्यानें सुपांत टाकली व कांहीं ताम्हनांत टाकली. नंतर पूजेच्या तबकांतील कांहीं दूर्वा हातांत घेऊन तो लगबगीनें शामभट्टाजवळ आला. बटोनें ह्या इतक्या गोष्टी फार शिताफीनें केल्या, त्यामुळें शामभट्टास, नरसिंहभट्टास किंवा गोपिकाबाईस त्यानें केलेलें कसब कळलें नाहीं.

सुपांत घुगऱ्या नाहींत, मोत्येंच आहेत, असें ज्यावेळेस शामभट्ट बटोकडून कबूल करून घेत होता व ज्यावेळेस सुपांत मोत्येंच आहेत, घुगऱ्या नाहींत, असें बटोनें कबूल केलें, त्यावेळेस गोपिकाबाईला सुपांतील दाणेच मोत्यांप्रमाणें चमकल्यासारखा भास झाला. परंतु तिनें सुपाजवळ ओणवून जाऊन पाहिलें तेव्हां ते शिजलेले दाणेच आहेत असें तिला पुन्हा दिसलें. असें झाल्यावर राहूची बाधा आपणासहि झाली आहे असा तिचा समज झाला ! ती मनांत म्हणाली—" काय मेला चमत्कार ! इतक्यांत मला मोत्यें दिसलीं आणि तीं नाहींशीं झालीं. तीं माझ्या लाभीं नाहींत असेंच म्हणणें आतां प्राप्त आहे. " ज्याच्या लाभीं द्रव्य नसतें त्याला द्रव्याचे कोळसे होऊन पडलेले दिसतात,

असें पायाळ, इलमी व द्रव्य काढून देणारे लोक सांगत असतात. ही गोष्ट गोपिकाबाईला माहित होती असें दिसतें. श्रद्धाळू व भोळ्या मनुष्यास फसविण्यासाठीं फारसा उशीर व श्रम हे लागत नाहींत हें येथें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. सुपांत मोत्यें आहेत असें बटोनें कबूल केल्यावर नरसिंहभट्टानें सुपलींतील मातीकडे वळून पाहिलें तेव्हां तींत मातीच आहे, सोन्याचा चुरा नाहीं, असें पाहून त्यानें आपली मान पुन्हा गुडघ्यांत घातली. पूर्व दिवशीं शामभट्टानें बटोला मार दिला होता व आतां त्याचा कान पिळला. या दोन कृत्यांवरून नरसिंहभट्टाला शामभट्टाकडे पाहवलें सुद्धां नाहीं. तो आपल्या मनांत म्हणाला कीं—" शामभट्ट विद्वान् ब्राह्मण आहे, मी आपला गरीब भिक्षेकरी आहें, तर त्याच्या ज्ञानापुढें माझा काय उजेड पडेल ? विद्वानाचें म्हणणें अविद्वानाला कबूल करणें भाग आहे. ज्योतिषी काय करतील काय नाहीं याचा नेम नाहीं. " त्या वेळेस ज्योतिष, जादू, इंद्रजाल, भुतें यांवर लोकांचा फार विश्वास होता, त्यामुळें त्या प्रकारची विद्या शिकलेल्या लोकांचा धाक सामान्य लोकांवर होता. अलीकडे असले भोळे लोक कमी असल्यामुळें आपणास ही वर दिलेली गोष्ट खोटी वाटण्याचा संभव आहे, परंतु अजूनहि ज्यांचा फलज्योतिषावर पूर्ण भरंवसा आहे, ते ही गोष्ट नाकबूल करींहि करणार नाहींत. पुष्यनक्षत्रयोगावर राजा रामचंद्र रावणास मारण्याकरितां निघाला आणि विजयी झाला अशी आनंदरामायणांत कथा असल्याचें ज्यां-

च्या ऐकिवांत आहे व ज्यांचा त्या गोष्टीवर भरंवसा आहे, त्यांनाच पुष्यनक्षत्रयोगाचा महिमा कळणार आहे. पुष्यार्क नक्षत्रावर सोनें विकत घेऊन जोडवें किंवा सळे करणारीं माणसें हल्लींच्या काळांतहि आहेत, अगदींच नाहींत असें अजून झालें नाहीं. तसें केल्यापासून त्यांचा कोणता फायदा झाला तो ते आपणाला सांगतील. या कारणावरून पुष्यनक्षत्राशीं व सोन्याशीं हल्लीं कांहींच संबंध राहिला नाहीं असें म्हणतां येणार नाहीं.

बटोनें शामभट्टापुढें ताम्हन केल्यावर त्यांतील दूर्वा घेऊन अभिषेक करण्याचें काम शामभट्टानें सुरू केलें. बटोहि ताम्हनांतील पाणी नरसिंहभट्टाच्या व गोपिकाबाईच्या अंगावर उडवूं लागला. " ओम्शांतिः शांतिः शांतिः " असें म्हटल्यावर शामभट्टानें बटोला आज्ञा केली कीं, " ताम्हन नरसिंहभट्टाकडे घेऊन जा व त्यांतील पाणी आपल्या डोळ्यांना लावण्यास त्याला सांग." आज्ञेप्रमाणें बटो ताम्हन घेऊन गेला असतां ताम्हनांत बोटें बुडवितांना त्यांत मोत्यें आहेत किंवा घुगऱ्यांचे दाणेच आहेत हें पाहण्याची इच्छा नरसिंहभट्टास झाली व त्यानें पाहिलें तों ताम्हनांत खरोखरीचीं मोत्यें त्यास दिसलीं ! इतक्या वेळपर्यंत प्रत्यक्ष घुगऱ्यांचा ढीग तो पहात होता म्हणून ताम्हनांत मोत्यें आहेत ही गोष्ट त्याला एकाएकीं खरी वाटली नाहीं. डोळ्यांना पाणी लावण्यापूर्वी त्यानें आपलीं बोटें ताम्हनांतील दाण्यांपर्यंत नेऊन पोंहचविलीं तेव्हां त्याच्या बोटाला नरम पदार्थ न लागतां कठीण पदार्थ

लागला, परंतु तो हातांत घेऊन पाहण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं. नंतर बटोनें तेंच ताम्हन गोपिकाबाईपुढें धरलें. त्यांतील पाणी तिनें आपल्या डोळ्यांला लाविलें, पण तिनें त्या पाण्यांत काय आहे तें पाहिलें सुद्धां नाहीं; कारण तिला सूप भरून मोत्यें पाहण्याची घाई झाली होती. डोळ्यांला पाणी लाविल्याबरोबर तिनें सुपाकडे आधीं पाहिलें तों तिला पूर्वीप्रमाणेंच घुगऱ्यांनीं भरलेलें सूप दिसलें!

नरसिंहभट्ट व गोपिकाबाई ह्यांनीं आपल्या डोळ्यांना पाणी लावल्यावर शामभट्टानें "सुपांत काय आहे?" असा प्रश्न प्रत्येकास वेगवेगळा केला. त्यांत घुगऱ्याच आहेत असें प्रत्येकानें सांगितल्यावर शामभट्टास पुन्हा संताप चढला. नंतर त्यानें तोच प्रश्न बटोला केला, तेव्हां बटो आपल्या मनांत म्हणाला—"सासूचा राग सुनेवर, नवऱ्याचा बायकोबर व मालकाचा चाकरावर; कारण तीं तिन्ही मनुष्यें पराधीन व परांकित असतात. त्याप्रमाणें शामभट्टाचा राग माझ्यावर निघतो आहे!" मग तो मोठ्यानें म्हणाला. "महाराज, मला सुपांत मोत्येंहि दिसत आहेत." बटोनें आपल्या उत्तरांत मोतीं या शब्दापुढें 'हि' अव्यय लाविलें त्याचा हेतु शामभट्टाला कळण्यासारखा नव्हता. कोणत्याहि कामाविषयीं आतुर झालेला मनुष्य त्या कामासंबंधीं चिंतातुर असतो व त्याला अनुकूल होईल अशा अर्थाकडे त्याची नजर असते. सुपामध्यें मोत्येंच दिसत आहेत असा बटोच्या बोलण्याचा अर्थ शामभट्टानें केल्यावर

त्यानें बटोला आज्ञा केली. "अरे, तुला जो पदार्थ मोत्यांप्रमाणें दिसतो तोच पदार्थ नरसिंहभट्टास व गोपिकाबाईस घुगऱ्यांप्रमाणें दिसतो. तूं म्हणतोस तेंच खरें आहे असें तूं सिद्ध करून दाखीव. जर का तूं तें शाबीत केलें नाहींस तर राहूनें ग्रस्त झालेल्या तुम्हां सर्वांस मी कडक शासन करीन. सूर्य आपल्या तेजानें राहूच्या मुखांतून बाहेर पडतो. सूर्याप्रमाणें तुम्हांला स्वतःचें तेज नाहीं म्हणून अग्नीच्या तेजानें तुमची शुद्धि करावी लागेल; म्हणजे राहूच्या सपाट्यांतून मुक्त होऊन तुम्ही आपल्या दिव्य दृष्टीप्रत पावाल." या भाषणापासून सर्वांना भय वाटलें.

हल्लीं खालच्या दर्जाच्या न्यायाधिशानें दिलेल्या निवाड्यावर अपील चालतें व तो निवाडा चुकीचा किंवा वेडावांकडा असला तर वरिष्ठ न्यायाधिशाकडून तो रद्द करविला जातो, परंतु शामभट्टानें दिलेल्या शिक्षेवर अपीलच नव्हतें. डाक्टरानें दिलेलें सर्टिफिकीट, एंजिनियरनें केलेलें एस्टिमेट किंवा न्यायाधिशानें प्रतिपादन केलेलें मत जसें हल्लीं निर्विवाद ग्राह्य ठरतें, त्याप्रमाणें पूर्वीहि जोशानें दिलेला मुहूर्त किंवा भटजीनें सांगितलेलें प्रायश्चित्त निमुटपणें कबूल करावें लागत होतें. शामभट्टाच्या धाकानें नरसिंहभट्ट व गोपिकाबाई हीं दोघीं गर्भगलित व घाबरीं झालीं व त्यांची बोबडी वळली. बटो स्वतः जोशीपणाचा धंदा करीत असल्यामुळें घाबरला नाहीं. तो म्हणाला—"गुरु महाराज, वड्याचें तेल वांग्यावर, किंवा संन्याशाला शूळ आणि वांझेला कातबोळ; अशाप्रमाणें मला आप-

ण या दोघांच्या अपराधाबद्दल दोषी ठरवीत आहां, परंतु या कृत्यांत 'मांजराचा खेळ होतो पण उंदिराचा जीव जातो' या म्हणीप्रमाणें माझे विनाकारण हाल होणार आहेत. मोत्यें करण्याविषयीं मीं आपणास प्रार्थना केली नाहीं किंवा मला त्यांपैकीं कांहीं वांटा ध्यावयाचा नाहीं, किंवा मीं त्यांचें दरिद्र दूर करण्याविषयींचा विडा उचललेला नाहीं, असें असून आपण सर्व भार मजवर टाकला आहे हा अन्याय आहे. मीं आपलें शिष्यत्व पतकरिलें व फलज्योतिषविद्या शिकण्याकरितां आपल्याबरोबर गांवोगांव, रानांतून, उन्हांतून, थंडींतून फिरण्यास निघालों म्हणून मीं आपली चोरी केली नाहीं, किंवा घोडें मारलें नाहीं. आपणास माझें ओझें झालें असेल तर मला आतांच रजा द्या आणि मी आपल्या घरीं जातों."

बटोला उद्वेग झालेला पाहून शामभट्ट काळजींत पडला. मतभिन्नत्वामुळें जरी शामभट्टाला पुष्कळदां बटोचा राग येत होता व तो त्याला शासनहि करीत होता तरी तो त्यावर ममता करीत होता. बायकोवांचून नवऱ्याला किंवा नवऱ्यावांचून बायकोला जसें संसारी होतां येत नाहीं तसें बटोवांचून शामभट्टाला जोशीपणाचा धंदा चालवितां येत नव्हता किंवा देशपर्यटन करतां येत नव्हतें. बटो आपणास सोडून गेला तर आपल्यालाहि परत घरीं जावें लागेल व फलज्योतिषाविषयींचे चमत्कार गांवोगांव करतां येणार नाहींत व लोकांची मनप्रवृत्ति ज्योतिषमार्गाकडे लाविता येणार नाहीं, ह्या गोष्टींचें शामभ-

ट्टाला कार वाईट वाटलें. ज्योतिषशास्त्रांत गढून रुतलेलें शामभट्टाचें मन बटोच्या भीतीमुळें निवृत्तिमार्गाकडे वळूं लागलें, तेव्हां तो म्हणाला—"बेटा बटो, संपूर्ण विद्या शिकण्यापूर्वी तूं अध्ययन सोडशील तर तुझें फार नुकसान होईल. तथापि तुझ्या मनांत जाण्याचें आलें तर मला गुरुदक्षिणा दिल्याशिवाय तुला जातां येणार नाहीं. मी आपल्या इच्छेनें तुला जाण्याची परवानगी देईन तर तुला मी गुरुदक्षिणा कदाचित् माफ करीन. हल्लीं तूं मला सोडून गेलास तर तुझे दोन तोटे होतील. तूं अविद्वान् राहशील व तुला गुरुदक्षिणाहि द्यावी लागेल. माझी परवानगी मिळाल्यावर तूं गेलास तर तुझें हें नुकसान होणार नाहीं. तुला लवकरच मी आपला पट्टशिष्य करणार आहें; व बटवाचार्य ही पदवीहि मीं तुला देऊन ठेवली आहे. अरे, आपल्या उजव्या हाताचें ओझें आपणाला कधीं झालें नाहीं व पुढें होणारहि नाहीं. बटो, तूं माझ्या उजव्या हाताप्रमाणें मला आवडता आहेस, तुझें मला ओझें होईल असें कधींहि तूं समजूं नकोस. आतां तूं या नरसिंहभट्टाचा व गोपिकाबाईचा संशय दूर केलास म्हणजे मी तुला आपला पट्टशिष्य करतों."

बटो म्हणाला. "महाराज, रेडा म्हणत असतो कीं मी दसऱ्यांतून वांचेन तर दिवाळीचा दिवा पाहीन, तसें मलाहि आतां म्हणतां येईल. मी आपणाबरोबर फिरण्यास निघाल्यापासून नदींत बुडतां बुडतां वांचलों, शेतकऱ्यांच्या सोडग्यांखालीं माझ्या डोक्या-

चा चुराडा होण्याचा मात्र राहिला, आपल्या चपराका मीं आपल्या तोंडावर सहन केल्या, व माझा या घटकेला डोळा जरी फुटलेला नाहीं, तरी कान सुजलेला आहे. आतां आपण हें नवें संकट मजवर घातलें आहे, यांतून जर मी पार पडलों तरच मला पट्टशिष्यत्व घेतां येणार आहे. सूप मोत्यानें भरलेलें असून जर नरसिंहभट्ट व गोपिकाबाई, सुपांत मोत्यें नाहींत, घुगऱ्याच आहेत, असें हट्टानें म्हणूं लागलीं तर त्यांच्या खोटेपणाबद्दल मला विनाकारण शिक्षा कां बरें व्हावी? गुरूनें आपल्या आवडत्या शिष्याला अशा प्रकारें दुसऱ्यांच्या लहरीचा दास करावा, हें खरोखरी क्रूर कर्म आहे. सुपांत मोत्यें आहेत ही जशी आपली खातरी आहे तशी माझीहि आहे. बस आहे. पाहिजे तर मी आपली आणखी खातरी करून देतों, परंतु ह्या राहूनें ग्रस्त केलेल्या लोकांची खातरी मला करतां येणार नाहीं."

ही बटोनें केलेली मागणी शामभट्टास रास्त वाटली व त्यानें त्याप्रमाणें बटोला अभयवचन दिलें. या हातांतील रुपया त्या हातांत, किंवा या डबड्याखालच्या गोळ्या त्या डबड्याखालीं, अशा प्रकारचा खेळ गारुडी लोक करीत असतांना प्रेक्षक लोक जसे त्याकडे पहात स्तब्ध उभे राहतात त्याप्रमाणें नरसिंहभट्ट व त्याची बायको गुरुशिष्यांच्या भाषणाचा चमत्कार पाहात होतीं. सुपांत मोत्यें आहेत असें बटो दाखविण्यास तयार झालेला पाहून नरसिंहभट्ट आपल्या गुडघ्यांतील मान काढून उभा राहिला. नंतर बटोनें सर्वांस मोत्यें दाखविलीं तो प्रकार पुढच्या प्रकरणावर ठेवावा लागत आहे.

प्रकरण विसावें.

वटोला शामभट्टाकडून अभयवचन मिळाल्यावर त्याचें मन स्थिर झालें. पायांत खुपत असलेला कांटा उपटून काढल्यावर जसें मनाला समाधान होतें तसें त्यास झालें. सूप मोत्यांनीं भरलेलें आहे परंतु त्या मोत्यांचा उपभोग घेणें नरसिंहभट्टाच्या नशीबीं नाहीं, हें शाबीत करून दाखविण्याची योजना त्यानें आधींच करून ठेविली होती हें चाणाक्ष वाचकांच्या लक्ष्यांत मागेंच येऊन चुकलें असेल, तथापि सर्वांच्या माहितीकरितां मी ती पुढें सांगणार आहे. शामभट्टाचें अभयवचन मिळाल्यावर वटोनें अभिषेकाच्या पाण्यांतून एक मोती घेऊन तें शामभट्टाच्या हातावर ठेविलें. तें शामभट्टानें निरखून, व बोटानें दाबून पाहिलें, नंतर तें त्यानें नरसिंहभट्टाजवळ दिलें. नरसिंहभट्टानें त्याची परीक्षा करून तें गोपिकाबाईच्या हातावर टाकलें. त्यावेळेस गोपिकाबाईला व नरसिंहभट्टाला अत्यानंद झाला. लागलींच तीं दोघीं लगबगीनें सुपापाशीं गेलीं आणि त्यांतील एकेक दाणा हातानें दाबून पाहूं लागलीं, तों त्यांना त्यांत आणखी कांहीं मोत्यें सांपडलीं. असें पाहून शामभट्टहि तेथें जाऊन पोहोंचला आणि आपण विजयी झालों याचा त्यास हर्ष झाला. नरसिंहभट्टास किंवा गोपिकाबाईस शामभट्टाइतका आनंद झाला नव्हता, तथापि 'द-

गडापेक्षां ईट मऊ ' या म्हणीप्रमाणें थोड्याशा मोत्यांच्या दाण्यानेंच तीं खुष झालीं.

सुपांत व अभिषेकपात्रांत ऊर्फ ताम्हनांत हीं मोत्यें कशीं आलीं तें येथें सांगितलें पाहिजे. ज्या वेळेस शामभट्टानें बटोला पाणी आणण्याकरितां पाठविलें त्या वेळेस बटो आपल्या पडशीजवळ गेला होता व तेथून कांहीं जिन्नस त्यानें आपल्याबरोबर आणिला होता, ही गोष्ट जर वाचकांस स्मरत असेल तर त्यांना मोत्यें कोठून आलीं याचा शोध लागण्यास अडचण पडणार नाहीं. ग्रहांची पीडा दूर होण्यासाठीं किल्लेदाराचा मुलगा संकाजी यानें सोनें, रुपें व मोत्यें यांचें दान शामभट्टाकडे पाठविलें होतें व तें बटोनें आपल्या पडशींत नेऊन सांठविलें होतें. त्यांपैकीं कांहीं मोत्यें काढून बटोनें आपल्याजवळ घेतलीं होतीं. ज्या वेळेस सुपांतील तीन दाणे ताम्हनांत टाकण्याची कृति त्यानें केली, त्याच वेळेस आपल्या जवळच्या मोत्यांपैकीं तीन मोत्यें त्यानें ताम्हनांत टाकिलीं, व जसें कांहीं सुपांतील तीन दाण्यांपैकीं जास्त दाणे हातांत आले होते ते सुपांत परत टाकीत आहे असें दाखवून, ताम्हनांत टाकल्यावर जीं मोत्यें त्याच्याजवळ उरलीं होतीं तीं त्यानें सुपांतील घुगऱ्यांवर फेकून दिलीं. जीं मोत्यें आतां नरसिंहभट्टास व गोपिकाबाईस सुपांतील घुगऱ्यांत सांपडलीं तीं बटोनें टाकलेलीं होतीं हें उघड आहे. बुद्धिवान् व चाणाक्ष सोबती जवळ असला म्हणजे तो आपली बाजू कशी राखतो याचें प्रत्यक्ष उदाहरण बटोनें शामभट्टास करून दाखविलें, तरी शा-

मभट्टानें बटोचें कसब ओळखिलें नाहीं. तो आपल्या स्वतः-ची, मुहूर्ताची व तंतोतंत वेळ साधण्याची फुशारकी मारूं लागला ! तो म्हणाला. " त्या मुहूर्ताचा गुण असा होता कीं तपेल्यांतील सर्व दाण्यांचीं एकुणएक मोत्यें व्हावीं, परंतु या घरधन्याचें व त्याच्या कुटुंबाचें नशीब अनुकूल नव्हतें म्हणून म्हणा, किंवा मीं दोरी-ला हिसका दिल्यावर उशिरानें धान्य ओतलें गेलें म्हणून म्हणा, त्यांना त्या मुहूर्ताचा सर्व फायदा मि-ळाला नाहीं. जितके दाणे ऐन मुहूर्तावर भांड्यांत प-डले तेवढ्यांचींच मोत्यें झालीं. नरसिंहभट्टाला मंगळा-ची पीडा आहे; त्यानें जप व दान आधीं केलें असतें तर असें घडलें नसतें. मला असुक एक ग्रह वाईट आहे असें लोक जोशाला कळवीत नाहींत, व जोशी असावध राहतो. याकरितां आम्हा जोशांना नेहमीं हुशार रहावें लागतें. कोणता ग्रह कोणत्या राशीला आहे, व तो बदलणार कधीं याविषयीं आम्हाला ने-हमीं विचार करावा लागतो. ग्रहांची गति, त्यांची दशा, महद्दशा, अंतर्दशा, बलाबल, वैमनस्य इत्यादि गोष्टींचें मनन करावें लागतें. ही आमची विद्या आ-युष्य, धन व संतति देणारी आहे पण दीर्घ प्रयासानें साधणारी आहे. नरसिंहभट्टजी ! तुम्ही आपले ग्रह मजकडून आधीं पाहून घेतले असते व अनिष्ट ग्रहांचें तुम्हीं दान केलें असतें, म्हणजे सर्व दाण्यांचीं मो-त्येंच झालीं असतीं. ज्या मानानें तुम्हाला ग्रह अनु-कूल राहिले त्या मानानें मोत्यांचे दाणे तुम्हाला मि-ळाले. आतां स्नानसंध्यादि कर्में आटोपल्यावर उद्यां

सकाळीं तुम्ही आपली पत्रिका मला दाखवा म्हणजे मी तुम्हाला ग्रह वश करून घेण्याचा उपाय सांगेन."

असें म्हणून एकदांचा हा मोत्यें करण्याचा कारखाना आटोपला. चुकून आणखी एखादें मोतीं घुगऱ्यांत राहिलें असल्यास तें सांपडावें म्हणून दिव्याच्या उजेडांत पाट मांडून गोपिकाबाई घुगऱ्यांचे दाणे निवडीत बसली. हें कृत्य होतें आहे तों तीन प्रहर रात्र होऊन गेली. अहोरात्र सर्वांना जागरण झालें होतें, तथापि आतां झोंप घेण्यास फारसा अवकाश नव्हता. कार्तिकस्नान करण्याचा व कांकड आरतीला जाण्याचा समय येऊन पोहोंचला होता. त्या चौघांपैकीं बटोनें मात्र तास अर्धा तास झोंप घेतली होती, परंतु शामभट्ट, नरसिंहभट्ट व गोपिकाबाई यांना जागरण झालें होतें.

कांकड आरती करून परत घरीं आल्यावर नरसिंहभट्ट आपल्या खांद्यावर पडशी टाकून व हातांत ताम्हन घेऊन "यज्ञपुरुषायनमः" करण्याकरितां बाहेर पडला. घुगऱ्यांत सांपडलेल्या मोत्यांच्या दाण्यांपैकीं चारपांच दाणे त्यानें आपल्या धोतराच्या पदरास बांधून बरोबर घेतले होते. धान्यांचीं मोत्यें करण्याचा प्रयत्न संपूर्ण सिद्धीस गेला नव्हता तरी शामभट्ट अडाणी किंवा अज्ञानी आहे असें नरसिंहभट्ट समजला नाहीं. आपणास ग्रहांची अनुकूलता नव्हती व आपणास दैवाची साहाय्यता नव्हती, ह्या दोन कारणांवरून सर्व धान्यांचीं मोत्यें न होण्याचें अपयश तो आपणावर ओढून घेत होता. तो मनांत म्ह-

णाला. "ज्याप्रमाणें धान्याच्या कांहीं दाण्यांचीं मोत्यें झालीं त्याप्रमाणें मीं मुठींत घेतलेल्या मातीचें सोनें झालें नाहीं; ह्यावरून माझें दैव फिरलें आहे व केवळ तिच्या भाग्योदयानें हा लाभ झाला आहे, असें मानण्यास हरकत नाहीं." असे विचार त्याच्या मनांत आल्यानंतर त्याला सरोद्याच्या बोलण्याची आठवण झाली. सरोदी म्हणाला होता कीं "या घराची मालकीन मोठी पुन्यवान् हाय, हिच्या पुन्याईन या घराला भाग्य येईल; आन् इच्या भाग्यान या घरांत लक्षुमी येईल." हें भाकित त्यास अगदीं खरें वाटलें. एखाद्या गोष्टीविषयीं एखादे प्रसंगीं आपलें मन इतकें वेडें होऊन जातें कीं ती गोष्ट आपणास मनापासून आवडल्यावर तिजविषयीं उलट विचार आपणास क्वचित् सुचतात. अमुक गोष्ट अमुक तऱ्हेनें खरी आहे असें आपल्या मनानें एकदां घेतल्यावर, ती तशी नाहीं अशा विषयींचे विचार त्याच मनास त्याच घटकेस बहुधा सुचत नाहींत. ज्या वेळेस शामभट्टानें नरसिंहभट्टास सांगितलें होतें कीं ज्या मनुष्यास बेबे चार आणि अठराचोक बहात्तर इतकें सोपें गणित कळत नाहीं, त्या मनुष्याच्या बडबडण्यावर तुम्ही बिलकूल विश्वास ठेवूं नका, त्या वेळेस नरसिंहभट्टास असें वाटलें होतें कीं त्या सरोद्यास खरोखरच कांहीं येत नाहीं, पण ह्या गोष्टीची त्याला आतां आठवण सुद्धां झाली नाहीं! आपलें दैव फिरलें असें त्यास भासूं लागल्यावर शामभट्टाच्या दुसऱ्या एका बोलण्याची मात्र त्याला आठवण झाली. आपली पत्रिका पाहिल्या-

वर ग्रह वश करून घेण्याचा उपाय शामभट्ट आपणास सांगणार आहे ह्या गोष्टीची आठवण झाल्याबरोबर तो आपलीं पावलें झराझर टाकूं लागला व भिक्षा मागणें झाल्यावर लवकरच घरीं जाण्याचा विचार तो करूं लागला.

ज्याला स्वतःची अक्कल नसते त्याला दुसऱ्याच्या नांवावर आपली फुशारकी मारण्याची इच्छा सहजीं उत्पन्न होते. मी असा आहें, मीं तसा आहें, मला अमुक येत आहे, मी तमुक कृत्यें केलीं असें सांगण्याचें ज्यास कारण पडत नाहीं, त्यास तो तसा आहे, त्याला अमुक येतें व त्यानें तमुक कृत्यें केलीं असें सांगून त्याचा व माझा अमुक संबंध आहे असें सांगण्यांतच पुरुषार्थ वाटतो. ह्या गोष्टीप्रमाणें नरसिंहभट्टासहि झालें होतें. "माझ्या घरीं शामभट्ट जोशी उतरला आहे, त्यानें काल रात्रीं सुमुहूर्तावर आधणाच्या पाण्यांत धान्य वैरून मोत्यें केलीं, तीं हीं आहेत." असें घरोघर जाऊन जाहीर करण्याची इच्छा त्यास झाली होती, तीप्रमाणें तो प्रत्येक घरच्या बायाबापड्यांस व पुरुषांस आपली गोष्ट सांगून व धोतराच्या पदराची गांठ सोडून तींतील मोत्यें त्यांस दाखवूं लागला. असें करण्यांत त्यास एक तर आपल्या घरीं असा पुण्यपुरुष येऊन उतरला आहे अशी बढाई मारतां येत होती व दुसरें त्या पुण्यपुरुषाच्या नांवानें पाहिजे तो जिन्नस त्याला मागतां येत होता. ही अमोल्य संधि त्यानें जाऊं दिली नाहीं. बहुतेक भाविक बायका त्याची हकीगत आनंदानें

ऐकून घेत होत्या व नरसिंहभट्टाच्या ताम्हनांत ओतलेल्या धान्याचा भाग शामभट्टाच्या मुखीं पडणार आहे असें समजून नेहमींपेक्षां जास्त भिक्षा त्यास घालीत होत्या. लवकरच त्याची पडशी इतकी तुडुंब भरली कीं भिक्षा घेणें त्याला बंद करावें लागलें. परत घरीं जाऊन आपली पत्रिका शामभट्टास दाखविण्याची त्यास घाई होती तरी त्यानें चालविलेल्या उपक्रमामुळें त्यास लवकर घरीं जातां आलें नाहीं. पूर्व रात्रीस झालेला चमत्कार सांगण्याकरितां बहुतेक घरीं त्याला बराच अवकाश लागला. प्रत्येक वेळेस धोतराची गांठ सोडून तींतील मोत्यें दाखविण्यास व पुन्हा तीं बांधून ठेवण्यास त्याला बरेच श्रम पडत होते, तरी तसें करण्यांत त्यानें बिलकूल आळस केला नाहीं. ह्या कारणामुळें घरीं परत येण्यास ते दिवशीं त्याला बराच वेळ लागला.

पुरंदर या गांवीं ह्या वेळेस एक गृहस्थ रहात होता त्याचें सर्वांग कोडानें व्याप्त झालेलें होतें. त्याच्या घरची स्थिति साधारण बरी होती, परंतु ह्या रोगामुळें तो अगदीं त्रासून गेलेला होता. आपल्या कुष्ठांगाची त्यास अतिशय लाज वाटत होती. त्याच्या शरीराची कांति पूर्ववत् कोणी करून देता तर त्याला त्यानें पुष्कळ द्रव्य दिलें असतें. जो गरजवंत असतो त्यास अक्कल कमी असते असें म्हणतात. हा गृहस्थ गरजवंत होता तर मग त्याला अक्कल कोठची ? मंत्र, तंत्र, अंगाराधुपारा, नाडी, गंडा, अशा प्रकारच्या कोणत्याहि उपायानें बरा होण्यास तो

तयार होता. कित्येक उपाय त्यानें करूनहि पाहिले होते. शामभट्टाची स्वारी अपूर्व थाटानें व मुलांच्या गजरानें गांवांतून मिरवीत गेल्यामुळें, शामभट्ट आल्याची व नरसिंहभट्टाच्या घरीं उतरल्याची वातमी तेव्हांच पसरली. तो विद्वान् जोशी आहे असेंहि नंतर लवकरच सर्वांना कळलें. अशा विद्वान् जोशाचा उपयोग आपणास होईल तर तो करून घ्यावा असें या गृहस्थाच्या मनांत आलें. लोकांनीं ठेविलेल्या अपवादामुळें व जनलज्जेमुळें तो घराबाहेर बहुतकरून जात नव्हता व चारचौघांत कधींच मिसळत नव्हता. आपल्या वैद्यशास्त्रांत ' कर्मविपाक ' म्हणून एक प्रकरण आहे, त्यांत असें साफ लिहिलें आहे कीं गाईस मारलें असलें तर कुष्ठ रोग उत्पन्न होतो. त्यावेळच्या लोकांची कर्मविपाकावर श्रद्धा असल्यामुळें ते असें म्हणत कीं त्या गृहस्थानें गाईचा वध केला होता म्हणूनच त्यास तो रोग झाला. लोकांनीं केलेलीं अशीं भाषणें आपल्या कानांवर पडूं नयेत व लोकांना आपला तिरस्कार करतां येऊं नये म्हणून तो गृहस्थ नेहमीं घरांत बसून रहात असे. शामभट्टाच्या ज्ञानाचा आपल्यास उपयोग व्हावा असा त्याच्या मनांत विचार येऊन त्यानें आपली जन्मपत्रिका शामभट्टाकडे एके मनुष्याबरोबर पाठविली.

धान्याचीं मोत्यें करून देण्याचें काम संपल्यावर शामभट्टानें लवकरच स्नान करून संध्या ब्रह्मयज्ञ आणि तर्पण हीं कर्में आटोपलीं. नंतर तो नरसिंहभट्टाच्या ओसरीवर पोथ्यांचीं पानें चाळीत

बसला. जीं पानें यमुनाबाईनें फाडलीं होतीं, त्यांऐवजीं आतां नवीन पानें लिहून तयार झालीं होतीं, तीं शुद्ध लिहिलेलीं आहेत अशाबद्दल तो आपली खातरी करून घेत होता. शुद्धाशुद्ध विवेचनाच्या कामांत शामभट्ट गुंतला असतां, बटो आपली आवृत्ति म्हणत जवळच बसलेला होता. अशा समयास तो मनुष्य तेथें आला. त्यानें शामभट्टापुढें एक होन व सुपारी ठेवून त्यास नमस्कार केला, तें पाहून शामभट्टानें आपलें डोकें वर केलें, तेव्हां त्यानें एक जन्मपत्रिका शामभट्टापुढें ठेविली व ती पाहून तींतील गुणदोष सांगावे अशाबद्दल प्रार्थना केली. त्यावरून शामभट्ट पत्रिका पाहूं लागला. बटोची नजर होनाकडे गेल्याबरोबर तो उठून त्या मनुष्याजवळ आला व होन उचलून त्यानें आपल्या कनवटीस लावला. कांहीं वेळ पत्रिका पाहिल्यावर आणि विचार केल्यावर शामभट्टानें चमत्कारचिंतामणीची पोथी काढली व जन्मलग्नीं बुध पडला असतां काय फळ होतें याविषयीं तो आधार पाहूं लागला. तो सांपडल्यावर व आणखी थोडासा विचार केल्यावर तो त्या मनुष्यास म्हणाला. " ही ज्या गृहस्थाची पत्रिका आहे तो मोठा बुद्धिमान् असावा. त्याच्या शरीराची कांति दिव्य आहे अशाविषयीं कीर्ति असावी व रोगाची चिकित्सा करण्यांत तो प्रवीण असावा. "

हें शामभट्टाचें भाषण ऐकून पत्रिका दाखविणारे मनुष्यास महदाश्चर्य वाटलें. हा मनुष्य कोणाची पत्रिका घेऊन आला होता हें वाचकांस बहुतकरून

कळलेंच असेलः ज्या गृहस्थाचें सर्वांग कुष्ठानें भरलेलें होतें असें नुकतेंच सांगितलें त्यानेंच आपली पत्रिका ह्या मनुष्याबरोबर शामभट्टाकडे पाठविली होती व तीच तो घेऊन आला आहे. अंमळसा विचार केल्यावर त्यास असें वाटलें कीं शामभट्ट कदाचित् विनोदयुक्त भाषण करीत असेल. म्हणून त्यानें उत्तर केलें. " जोशीबोवा, आपण म्हणतां त्याप्रमाणें तो गृहस्थ बुद्धिमान् आहे खरा, परंतु त्याच्या शरीराची कांति दिव्य नसून, त्याचें शरीर रोगग्रस्त आहे. आपली शरीरपीडा निवारण व्हावी ह्या हेतूनें त्यानें मला आपणाकडेस पाठविलें आहे, तरी आपण त्याची पत्रिका काळजीनें पहावी आणि विनोदरहित भाषण करावें अशी आपणास माझी विनंति आहे. "

त्या मनुष्याचें बोलणें चाललें असतां शामभट्ट पत्रिकेंतील दुसरे ग्रह पहात होता. त्यानें तें बोलणें समग्र ऐकिलें नाहीं किंवा तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. पत्रिकेच्या पहिल्या स्थानापासून एकादश स्थानापर्यंत कोणकोणते ग्रह आहेत ते त्यानें पाहिले. आपल्या हाताचीं बोटें मोजून व तोंडानें कांहीं शब्द उच्चारून त्यानें पुन्हा चमत्कारचिंतामणि ग्रंथ पाहिला. नंतर तो म्हणाला—" काय हो, या गृहस्थाच्या लाभस्थानीं शुक्र आहे; त्याचें फल फार चांगलें आहे असें वर्णन या ग्रंथांत केलें आहे. (भृगुर्लाभगोलाभदोयस्यलग्नात्सुरूपंमहीपंचकुर्याच्चसम्यक् । लसत्कीर्तिसत्यानुरागंगुणाढ्यंमहाभाग्यमैश्वर्ययुक्तंसुशीलं ॥) ज्याच्या अकराव्या स्थानांत शुक्र आहे तो सुरूप होईल, तो

राजा होईल, सत्कृत्याविषयीं त्याला प्रीति राहील, तो गुणांनीं व शीलानीं युक्त असून त्याचें भाग्य आणि ऐश्वर्य हीं मोठीं होतील. अशा गृहस्थाची मी अवश्य भेट व्यावी असें मला वाटतें."

यावर तो मनुष्य म्हणाला—"इतर लोकांप्रमाणें आपण त्याची थट्टा करीत नसाल, तर आपण त्याची भेट घेतल्यान त्यास आनंद होईल."

हें ऐकून शामभट्टानें गंभीरपणानें उत्तर केलें—"हा कालपर्यंत मीं कोणाचीच थट्टा केली नाहीं व पुढेंहि करणार नाहीं. कोणी कोणाला हसूं नये असें शास्त्रांत स्पष्ट सांगितलें आहे व मला ग्रंथाचा आधार मिळाल्या-ंचून मीं कोणतीही गोष्ट आजपर्यंत केलेली नाहीं, करीत नाहीं व करणार पण नाहीं. आपल्या उन्नतीचें मूळ कारण विश्वास आहे. नास्तिक-बुद्धि, कुतर्क व पाखांड टाकून देऊन मनुष्यानें शास्त्राज्ञेवर विश्वास ठेविला म्हणजे त्याचें अर्धे अधिक काम झालें असें समजावें. याकरितां मीं तुम्हास पहिल्यानेंच असें विचारतों कीं तुमचा मजवर व माझ्या बोलण्यावर विश्वास आहे कीं नाहीं?"

हा पत्रिका दाखविण्याकरितां आलेला मनुष्य भिडस्त व भोळा होता. अशा प्रकारच्या मनुष्यांची संख्या त्यावेळेस फार मोठी होती असें अनुमान शामभट्टाच्या एकंदर चरित्रावरून काढतां येतें व तें अगदींच खोटें ठरेल असें मला वाटत नाहीं. "तुमचा मजवर व माझ्या बोलण्यावर विश्वास आहे कीं नाहीं;" ह्या प्रश्नाचें निषेधार्थी उत्तर देण्याचें धारिष्ट

त्या मनुष्यास झालें नाहीं. पत्रिका पाहूं लागल्यापासून शामभट्टानें जीं भाषणें केलीं त्यावरून "माझा तुमच्या भाषणावर विश्वास आहे" असेंहि म्हणण्याचा धीर त्याला होईना. अशा घोटाळ्यांत तो पडला असतां त्यानें उत्तर केलें. "पत्रिका दाखविणाराचा विश्वास आपल्या ठिकाणीं जडला नसता तर त्यानें मला आपणाकडे पाठविलें नसतें. विश्वासानें पुष्कळ कामें होतात ही गोष्ट मला कबूल आहे."

हें बोलणें ऐकून शामभट्टास बरें वाटलें. तो म्हणाला. "विश्वासानें पुष्कळ कामें होतात ही मुख्य गोष्ट तुम्हीं कबूल केली, पुरे आहे. ज्याप्रमाणें मी ग्रंथावर विश्वास ठेवून चालतों आहें, त्याप्रमाणें तुम्हीं—तुम्हास ग्रंथ समजत नसल्या कारणानें—मजवर विश्वास ठेवून चालावें हें यथान्याय आहे. हें पहा, ग्रहांचीं फलें सांगणें हें काम भलत्याचेंच नाहीं. तसें करण्यास मनुष्याच्या अंगांत शक्ति आली पाहिजे; ही शक्ति ग्रंथपठनेंकरून प्राप्त होते. जोशाच्या विद्वत्तेविषयीं मला एक श्लोक आठवतो आहे, तो मी तुम्हास म्हणून दाखवितों. ऐका—'अपारहोरागमपारगामीपाद्धांचबीजेनितरांप्रगल्भः । सद्गोलविद्याकुशलःसएवभवेत्फलादेशविधौसमर्थः ॥' बाबांनो, (हे शब्द त्यानें बटोकडे आपलें तोंड करून उच्चारले) ग्रहांचें फल सांगण्याची विद्या ही थट्टा आहे असें तुम्ही समजूं नका. ज्योतिःशास्त्राचा प्रभाव फार मोठा आहे. शास्त्रावर विश्वास ठेवल्यावांचून तो समजणार नाहीं

व भावावींचून कार्यसिद्धि होणार नाहीं असें ग्रंथांत सांगितलें आहे."

शामभट्टानें म्हटलेला श्लोक ऐकून तेथें बसलेल्या मनुष्याची मति अगदीं कुंठित झाली. विद्वानाशीं वादविवाद करूं नये अशी पूर्वी एक वहिवाट होती, हें पूर्वीच्या एका प्रकरणांत व्यक्त करून दाखविलेलें आहे, तेव्हां त्याविषयीं जास्त ऊहापोह करण्याची आतां अवश्यकता दिसत नाहीं. या वहिवाटीमुळें त्या मनुष्यास ज्यास्त बोलतां आलें नाहीं. शामभट्ट पुढें काय सांगतो ही आशा करून तो मनुष्य स्वस्थ बसला व बटो त्या दोघांकडे टकमका पाहात बसला. ज्योतिषशास्त्रसंबंधीं शामभट्टाचें बोलणें चाललें असतां बटो मध्यें तोंड घालीत नव्हता असें आपणांस मागें पुष्कळ वेळां कळून आलें आहे. शामभट्टानें 'बाबांनो' हा शब्द उच्चारतांना बटोकडे पाहिलें होतें तेव्हां बटोनें आपलें तोंड किंचित हसरें दिसेल असें केलें होतें, नंतर लागलींच त्यानें आपले ओंठ गच्च मिटून ठेविले. शामभट्टानें पुन्हा एकवार पद्धिकेचें अवलोकन केल्यावर तो एकाएकीं उठून उभा राहिला, तें पाहून तो आलेला मनुष्य व बटो हे दोघेहि उभे राहिले. नंतर शामभट्ट म्हणाला—"चला, आपण त्या गृहस्थाच्या भेटीस जाऊं. ज्या गृहस्थाच्या जन्मकाळीं अकरावा शुक्र आहे, त्याची मला अवश्य भेट घेतली पाहिजे."

असें म्हणून त्यानें आपल्या आंगांत आंगरखा घा-

१ नभावेनविनासिद्धिस्तस्माद्भावोहिकारणं—वृद्धचाणाक्य.

तला व डोक्यावर पागोटें ठेविलें. शामभट्ट निघण्याच्या तयारीस लागला असें पाहून तो आलेला मनुष्य आंगणांत जाऊन त्याची वाट पहात उभा राहिला. शामभट्ट आंगणांत आल्यावर तो मनुष्य पुढें चालूं लागला व शामभट्टाच्या मागून बटोहि वाट चालूं लागला. कांहीं वेळानें ते तिघे त्या गृहस्थाच्या दरवाजाशीं येऊन पोहोंचले, तेव्हां त्या मनुष्यानें चटकन् पुढें जाऊन ओसरीवर बसावयास टाकलें व घराच्या मालकास शामभट्ट आल्याची वर्दी दिली. ज्या ओसरीवर बसावयास सतरंजी आंथरली होती त्याच ओसरीच्या एका कोंपऱ्यांत देवघर होतें. देवघरांतून ओसरीवर येण्यास एक दरवाजा होता, त्यांतून त्या घराचा मालक—रघुनाथराव हा तुपाच्या दोन समया लावून एकादशणी करीत बसलेला आहे असें दिसत होतें. तो या वेळेस लहानसा पंचा नेसलेला होता व त्यानें आपल्या आंगावर घेण्याचें धोतर भिंतीशीं उभा करून टेंकलेल्या पाटावर ठेविलेलें होतें. देवाला अभिषेक करतांना रघुनाथराव कोणाशीं बोलत नसे. जोशीबुवा आले असें ऐकल्यावर त्यानें 'हुं' असा शब्द करून कांहीं खूण केली, त्यावरून तो शामभट्टाबरोबर आलेला मनुष्य विड्याचीं पानें आणण्याकरितां बाजारांत गेला.

रघुनाथरावाची एकादशणी संपेतोंपर्यंत शामभट्ट व बटो यांस रिकामें बसावें लागलें. मनुष्य स्वस्थ बसलें असलें तरी त्याच्या मनाचे व्यापार सुरूच असतात. ते व्यापार अधिक जोरानें चालतात असें झटलें

असतां मोठीशी चुकी होणार नाहीं. रघुनाथरावाची पत्रिका पाहिल्यावरून त्याची कांति दिव्य असावी असें शामभट्टानें सांगितलें होतें. तें खरें किंवा खोटें हें निश्चित करण्याकरितां त्यानें रघुनाथरावाकडे लक्ष्य लावून व निरखून पाहिलें. रघुनाथराव उघडाबोडका असल्यामुळें त्याच्या शरीराचा कुष्ठवर्ण बटोला स्पष्ट दिसला, तसा तो शामभट्टालाहि दिसला असेल, परंतु त्याच्या डोक्यांत ग्रहाचें फल "दिव्य कांति आहे" असें वेड शिरलेलें असल्यामुळें त्याला तो पांढरा वर्ण दिव्याच्या तेजानें झळकून 'दिव्य' दिसूं लागला. त्याचा त्याला आनंद होऊन तो बटोला म्हणाला--- "बेटा बटो, फलज्योतिषशास्त्र खोटें नाहीं असें जें मीं म्हणत असतों तें अगदीं खरें ठरलें. आतां तूं कोणताहि पाखांडवादी, मतिभ्रष्ट, पापी असा मनुष्य घेऊन ये. फलज्योतिष खरें आहे अशाविषयीं मी त्याची अगदीं बालंबाल खातरी करून देईन."

फलज्योतिष खरें कसें ठरलें ह्याविषयीं बटोची समज पडली नव्हती. तो म्हणाला. "गुरु महाराज, माझें अध्ययन अगदीं थोडें आहे हें आपणास माहीत आहे, तेव्हां मीच पाखांडवादी, मतिभ्रष्ट व पापी आहें असें समजून आपण माझी खातरी करून द्या म्हणजे दुसरा असा एक मनुष्य हुडकून काढून आणण्याचे माझे श्रम वांचतील."

एकादशणी म्हणत असतां बोलायाचें नाहीं असा नेम रघुनाथरावांनीं केला होता खरा, परंतु कानांनीं ऐकावयाचें नाहीं, मनानें विचार करावयाचा नाहीं,

पोटांत क्रोध आणावयाचा नाहीं, किंवा हातपाय हालवायचा नाहीं, असा नेम त्यानें केला नव्हता. तसा त्यानें केला असता तरी त्यास तो कितपत पाळतां आला असता हें प्रत्येकास मीं लिहून दाखविण्यापेक्षां विचार करूनच चांगलें समजेल. जरी तो तोंडानें एकसारखी बडबड करीत होता तरी तो आपल्या कानांनीं शामभट्ट व बटो यांचें बोलणें ऐकत होता व त्या भाषणाचा परिणाम त्याच्या मनावर ताबडतोब होत होता.

बटो बोलत असतां शामभट्टानें आपल्या कनवटीची तपकिरीची डबी काढली व तींतील चिमूटभर तपकीर काढून त्यानें ती फुर्र करून ओढली. बटोचें बोलणें संपल्यावर त्यानें ताबडतोब बोलण्यास आरंभ केला. तो म्हणाला. " अरे, ह्या गृहस्थाच्या शरीराचा वर्ण सुवर्णासारखा चकाकतो आहे हें तुला दिसत नाहीं काय ? " या प्रश्नाचें बटोनें उत्तर दिलें. " नाहीं. " तें ऐकिल्याबरोबर शामभट्ट क्रोधाविष्ट होऊन बोलला. " अरे मूढा, पाप्या, तुझ्या पापदृष्टीनें तुला काय दिसत आहे तें सांग. मी आतांच तुझें भ्रांतिपटल काढून टाकतों."

आपणामध्यें शिष्टसांप्रदायाचा असा एक आचार आहे कीं, तोतरा, लबाड, दुर्गंधीयुक्त असा एखादा उणेपणा कोणाच्या अंगांत स्वभावतः असला तरी तो त्याच्या तोंडावर स्पष्टपणें बोलून दाखविण्याची वहिवाट नाहीं. हें व्यवहारज्ञान बटोला होतें असें त्याच्या वर्तणुकीवरून आपणांस कळलेलेंच आहे. रघुनाथरावाचें

आंग कोडानें व्यापलेलें असून त्याच्या शरीराचा रंग पांढरा आहे, परंतु दिव्याच्या उजेडानें रक्ताची लाली पांढऱ्या रंगाच्या त्वचेंतून लकाकते आहे, असें बटोला स्पष्ट बोलून दाखवितां आलें नाहीं. याकरितां तो कांहींच बोलला नाहीं. ह्याचा शामभट्टास राग येऊन तो आणखी म्हणाला- " अरे, बोल. बोलतोस कीं नाहीं ? तुला बोलण्याचें सुचत नसेल तर मी तुला ग्रंथांतील श्लोक म्हणून आठवण करून देतों." नंतर त्यानें पुढील श्लोक म्हटला. बुधोमूर्तिगोमार्जयेदत्यरिष्टंवरिष्ठाधियोवैखरीवृत्तिभाजः । जनादिव्यचामीकरीभूतदेहाश्चिकित्साविदोदुश्चिकित्साभवंति ॥ असें म्हणून त्यानें पुन्हा भाषणास सुरुवात केली—" अरे ' जनादिव्यचामीकरीभूतदेहा, ' हें वचन खोटें होणार नाहीं. तूं नीट डोळे उघडून पहा. भ्रमांत पडूं नकोस. शास्त्रावर विश्वास ठेवून त्याप्रमाणें बोलत जा. "

बटोनें आपल्या मनांत विचार केला कीं " मी जर आतां बोललों नाहीं तर हा जास्त हट्टास पेटून आपली फजिती मात्र करून घेईल." याकरितां त्यानें विनवणी केली. " गुरुमहाराज, राग शांत करा. आपण घरीं जाऊन खऱ्याखोट्याचा निर्णय करूं. दुसऱ्याच्या घरीं वाद करण्यांत कांहीं हाशील नाहीं. " हें ऐकून शामभट्ट म्हणाला- " हं ! मी समजलों. घरीं जाऊन तूं मला खोटें पाडशील आणि तसें करण्याकरितां त्याच्या शरीराचा रंग कोळशासारखा काळा होता असें तूं लटिकें प्रतिपादन करशील, तें मी ऐकणार नाहीं. तूं तें आतां येथेंच कबूल केलें पाहिजेस.

तुला स्पष्ट दिसत नसेल तर चल आपण दोघेहि देवघराशीं जाऊन पाहूं."

रघुनाथराव आपल्या तोंडानें रुद्राचें आवर्तन म्हणत होता तरी त्याचे कान शामभट्ट व बटो यांच्या भाषणाकडे होते असें मागें सांगितलेंच आहे. लोकांच्या उपहासास आपण पात्र होऊं नये म्हणून तो घराच्या बाहेर जात नव्हता. म्हणूनच त्यानें आपली पत्रिका एका मनुष्याबरोबर शामभट्टाकडे पाठविली होती हेंहि आपणांस कळलेंच आहे. शामभट्टाचें भाषण ऐकून रघुनाथरावास असें खास वाटलें कीं त्यानें आपला उपहास करण्याचें काम मांडलें आहे. ह्या गोष्टीचा त्यास अत्यंत राग आला. "माझ्या ओसरीवर बसून माझ्यासमक्ष माझा उपहास करणारा हा मनुष्य कोण आहे, त्याची खोड काढली पाहिजे" असें तो आपल्या मनांत म्हणाला. यावेळेस देवास कोरडें करून, त्यास गंध लावून व फुलें वाहून तो धूपदीप करण्याच्या तयारीस लागला होता. नैवेद्य समर्पण केल्यावर त्या दोघांसहि तो घराबाहेर घालवून देणार होता. देवापुढें तो नीराजन ओंवाळूं लागला इतक्यांत शामभट्टानें बटोला फरफरा ओढीत देवघराच्या दाराजवळ आणिलें. ह्या उद्धटपणामुळें रघुनाथरावास अधिक संताप चढला. क्रोधानें चवताळून नीराजन खालीं ठेवून व डाव्या हातांतील घंटा उजव्या हातांत घेऊन त्यानें ती शामभट्टाच्या कपाळावर जोरानें फेंकून मारली. लागलीच तो मोठ्यानें ओरडून म्हणाला. "मी बोलावल्यावांचून तुम्ही मा-

ह्या घरीं कां आलांत ? चला, चालते व्हा, नाहींतर दरवाजा लावून घेऊन मी तुमचा चांगलाच समाचार घेईन. "

रघुनाथरावानें फेंकून मारलेली घंटा शामभट्टाच्या सुदैवानें त्याच्या दंडावर जाऊन आपटली. ती त्याच्या कपाळावर लागली असती तर त्यास बरीच इजा झाली असती. त्यास घंटा फेंकून मारल्यामुळें, किंवा चांगला समाचार घेण्याच्या दरडावण्यामुळें तो म्याला नाहीं. ' बोलावल्यावांचून तुम्ही माझ्या घरीं कां आलांत? ' या भाषणाचें मात्र त्याला खरोखर भय वाटलें. तें त्याच्या कानीं पडतांच बटोचा हात धरून व त्याला फरफरा ओढून तो तेथून पळत सुटला आणि दरवाजा ओलांडून रस्त्यावर जाऊन उभा राहिला. नंतर तो मोठ्या ममतेनें म्हणाला—" बेटा बटो, तुझ्या संशयाची निवृत्ति न करतां मी घाईघाईनें येथें तुला घेऊन आलों, या अन्यायाची तूं मला क्षमा कर. असें करण्याचें कारण तुला मीं सांगितलें म्हणजे तूं मला क्षमा करशील अशी माझी खातरी आहे. " ही शामभट्टानें धरलेली लीनता पाहून बटोला आश्चर्य वाटलें. तो म्हणाला—" गुरु महाराज, दाता दान करण्यास व सत्पुरुष आपल्या स्त्रीचें हित करण्यास नेहमीं तत्पर असतो, त्याप्रमाणें गुरूहि शिष्याचें समाधान करण्यास तयार असतो, हें आपण खरें करून दाखवीत आहां. " हें बटोचें बोलणें ऐकून शामभट्टास बरें वाटलें आणि तो म्हणाला—" बटो, आमंत्रणावांचून विद्वानांनीं गृहस्थाच्या घरीं जाऊं नये; कारण

आगंतुकाचा अपमान होण्याचा नेहमीं संभव असतो, असें एका ग्रंथांत वाचलेलें मला आठवतें आहे. बोलावल्यावांचून आपण या गृहस्थाच्या घरीं गेलों ही मोठी चुकी झाली. यापुढें मी असली चुकी होऊं देणार नाहीं. परंतु मला आठवण न राहिली तर तूं मला जागें करीत जा. आतां बोलावणें आल्यावांचून मी कोणाच्या घरीं कधीं जाणार नाहीं, मग तो राजा कां असेना. "

असें म्हणून ते दोघे आपल्या बिऱ्हाडीं परत गेले. शामभट्ट गेलासें पाहून रघुनाथरावानें देवाला नैवेद्य दाखविला. नंतर आपले हात जोडून त्यानें देवाची प्रार्थना केली कीं, " हे परमेश्वरा, शामभट्टासारख्या थट्टेखोर जोशाची व माझी पुन्हा भेट होऊं देऊं नकोस. मी बरा झालों नाहीं तरी हरकत नाहीं, परंतु अशा मनुष्याशीं प्रसंग पडूं नये व मला त्याचीं कुत्सित बोलणीं ऐकायला लावूं नये, एवढें माझें तुला हात जोडून मागणें आहे. " हें मागणें देवानें कबूल केलें असावें असें वाटतें; कारण नंतर लवकरच शामभट्ट पुरंदराहून रवाना झाला व त्याची व रघुनाथरावाची पुन्हा गांठ पडली नाहीं, याविषयींची हकीकत पुढें लिहिलेली सांपडेल.

शामभट्ट आणि बटो नरसिंहभट्टाच्या घरीं येऊन पोहोंचल्यावर शामभट्टानें पुन्हा आपल्या पोथ्या काढल्या व नव्यानें लिहिलेल्या पानांवरील श्लोकांतील शुद्धाशुद्ध तो पाहूं लागला; बटो आपली आवृत्ति म्हणत बसला. नरसिंहभट्ट अजून घरीं आला नव्हता व जे-

वणाची तयारी झाली नव्हती, म्हणून ते दोघेजण आपापल्या कामास लागले. परंतु त्यांस तीं कामें संपवितां आलीं नाहींत; कारण शिवाजीकडून एक स्वार येऊन त्यानें शामभट्टास असें सांगितलें कीं "महाराजांनीं आतांच आपणास बोलाविलें आहे." ही महाराजांची आज्ञा ऐकून शामभट्टास आपल्या पोथ्या पुन्हा गुंडाळून ठेवाव्या लागल्या व बटोलाहि शामभट्टाबरोबर जावयाचें होतें म्हणून आपली पोथी बांधून ठेवावी लागली. नंतर लवकरच ते दोघे शिवाजीकडे गेले. वाटेंत शामभट्टास अशी बातमी कळली कीं पुरंदर किल्ला शिवाजीच्या हस्तगत झाला आहे[1] व शिवाजी किल्ल्यावर आहे.

शिवाजीनें शामभट्टास कशाकरितां बोलाविलें हें आतां येथें आधीं सांगितलें पाहिजे. प्रातःकाळीं उठून कार्तिक स्नान केल्यावर शिवाजीचे कांहीं लोक महादेवाच्या दर्शनास गेले, तेथें देवळाच्या एका कोपऱ्यांत हांतरुणावर निजविलेलें एक मूल त्यांना दिसलें. मुलाजवळ कोणी नव्हतें, किंवा देवळांत कोणी वाटसरू येऊन उतरले आहेत असेंहि चिन्ह दिसत नव्हतें. ह्या गोष्टीचा त्यांना अचंबा वाटला. "आपणास काय कर्तव्य आहे ? हें पाहण्याचें काम गांवच्या पाटलाचें आहे" असें म्हणून ते लोक तेथून चालते झाले असते, परंतु कर्मधर्मसंयोगानें त्याच वेळेस तें मूल जागें झालें व हळुहळु रडतां रडतां मोठ्या-

१. शके १५६९ या सालीं दिवाळीच्या दिवशीं शिवाजीनें पुरंदर किल्ला घेतला ही गोष्ट इतिहास प्रसिद्ध आहे.

नें टाहो फोडून रडूं लागलें. मुलाचें रडणें ऐकून त्याची आई अगर पालक कोणी तरी धांवून येईल असें समजून ते लोक कांहीं वेळ देवळाच्या पायरीवर बसले. घटका झाली, कोणी आलें नाहीं असें पाहून त्यांस त्या मुलाची दया आली. तेव्हां एका शिपायानें देवळांत जाऊन तें मूल उचलून बाहेर आणिलें, तसें तें गोरें-गोमटें, नीटनेटकें चांगल्या आईबापाचें मूल असावें असें सर्वांस वाटलें. इतक्यांत अशी मजा झाली कीं आपल्याला कोणी घेतलें आहे व उचलून हवेंत धरलें आहे असें त्या मुलास कळलें कीं काय कोण जाणे, तत्काळ रडणें बंद करून तें हसूं लागलें व आपले हातपाय आनंदानें हालवूं लागलें. ही मजा पाहून त्या लोकांना त्या मुलाचें मोठें कौतुक वाटलें. तें मूल खालीं ठेविल्याबरोबर पुन्हा रडावयास लागलें, तेव्हां दुसऱ्या एका शिपायानें त्यास पुन्हा उचलून घेतलें, तसें तें पुन्हा पूर्ववत् हंसावयास व कोडेनें हातपाय हालवायास लागलें. असें त्यांनीं पुष्कळ वेळां केलें तरी तीच मजा! ही मजा पाहून त्या लोकांस तें मूल तसेंच रडत टाकून जावयलें नाहीं. त्यांनीं तें आपल्याबरोबर नेलें. ते लोक किल्ल्यावर परत गेले तेव्हां शिवाजी कचेरींत बसून चारचौघांशीं मुष्यास जाण्याच्या गोष्टी बोलत बसला होता. त्याजपुढें तें मूल त्यांनीं आणून ठेविलें व त्याविषयींची सर्व हकीकत त्याला कळविली. ती ऐकून शिवाजीलाहि आश्चर्य वाटून त्या मुलाची करुणा आली. नंतर तें कोणाचें आहे व देवळांत कां टाकलें याबद्दल त्यानें चौकशी केली. त्या मुलाबद्दलची

सर्व हकीकत गांवांत पसरली होती व बहुतेकांस कळली होती. तें गोविंदपंताचें मूल आहे आणि शामभट्टानें केलेल्या भविष्यावरून तें त्यानें टाकलें आहे, ही गोष्ट शिवाजीला लागलींच कळली. नंतर त्यानें गोविंदपंत आणि शामभट्ट या दोघांस बोलावून आणण्याकरितां ताबडतोब हुकूम केला. ते आल्यानंतर काय चमत्कार घडला त्याचें वर्णन पुढच्या प्रकरणांत केलें आहे.

यमुनाबाई आपल्या मुलाचें पाळण करण्यास दक्ष असतां ती मुलास टाकून कोठें गेली होती हें येथें सांगितलें असतां अप्रासंगिक होणार नाहीं. पहांटच्या प्रहरीं मुलास गाढ झोंप लागलेली पाहून ती क्षणभर कामधंदा करण्याकरितां आपल्या घरीं गेली होती. त्या अवकाशांत हें कृत्य घडलें. त्याचें वर्णन लिहिण्यास बराच वेळ लागला, परंतु तें घडण्यास तितका काळ लागला नाहीं. शिवाजीचे लोक मुलाला घेऊन गेले नाहींत तों यमुनाबाई देवळांत परत आली. मूल नाहीं असें पाहून तिनें फार आक्रोश केला. तो ऐकून तेथें कांहीं गांवकरी लोक धांवून आले. मुलास शिवाजीचे लोक घेऊन जातांना त्यांपैकीं एकानें पाहिलें होतें, त्यानें यमुनाबाईचें शांतवन केलें. ती पुन्हा घरीं परत गेली तेव्हां शिवाजीचा स्वार तिच्या दरवाजाशीं गोविंदपंतास नेण्याकरितां उभाच होता. त्यास विचारून तिनें आपली खातरीहि करून घेतली. गोविंदपंत शिवाजीकडे गेल्यावर ती देवासमोर जाऊन मुलाच्या सुरक्षितपणाविषयीं काळजी करीत बसली.

प्रकरण एकविसावें.

शामभट्ट, बट्टो आणि गोविंदपंत हे तिघे हजर झाल्यावर शिवाजीनें गोविंदपंताला प्रश्न केला. "तुम्हीं आपला एकुलता एक मुलगा नेऊन महादेवाच्या देवळांत टाकून दिला याचें कारण काय आहे?" नंतर गोविंदपंतानें मुलाच्या जन्मावद्दलची सर्व हकीगत शिवाजीला सांगितली व शामभट्टानें दिलेल्या शास्त्राधारावरून मीं तें कृत्य केलें असें कबूल केलें. गोविंदपंताचें बोलणें ऐकून घेऊन शिवाजी म्हणाला— "चौकांत पडून तुम्हाला लागावें, तुम्हाला दुखणें यावें व घराला आग लागून तुमचें नुकसान व्हावें अशी ईश्वराची योजना असल्यावर मुलाचा त्याग करून तुम्ही त्या योजनेंत अंतर पाडाल असें तुम्हाला वाटतें काय?" यावर गोविंदपंतानें उत्तर केलें—"आपणांस कथा कीर्तन व पुराणें ऐकण्याचा छंद आहे, तशी शास्त्राची पण आवड आहे. या जोशीबुवांनीं आपलीं पोथीपुस्तकें धुंडाळून मला शास्त्रार्थ दिला त्याप्रमाणें मी वागलों म्हणून मीं वाईट काम केलें असें आपण समजत नसाल. शास्त्रांत लिहिल्याप्रमाणें वागावें हा आपला व माझा धर्म आहे." हें ऐकून शिवाजी म्हणाला—"ज्या वेळेस पुराणें व शास्त्रें निर्माण झालीं त्या वेळचा काळ, आचार, रीति व उद्योग हे निराळ्या प्रकारचे होते. द्रौपदी पांच पांडवांची बायको होती. बाप मेल्यावर धृतराष्ट्र, पांडु

आणि विदुर हे व्यासापासून उत्पन्न झाले व व्यास सत्यवतीच्या पोटीं जन्म पावले. असले प्रकार आतां घडले तर लोक त्यांस दूषणें ठेवतील कीं नाहीं ? याकरितां पुराणांत किंवा शास्त्रांत जें लिहिलें आहे, तोच आपला अधिकार आहे असें समजून कोणी वर्तन केलें तर त्याचें हसें होईल व तो निंदेला पात्र होईल. हल्लींच्या स्थितीस अनुसरूनच आपणांस वागलें पाहिजे. केवळ शास्त्रार्थावर नजर ठेवून उपयोग होणार नाहीं. "

हें शिवाजीचें बोलणें शामभट्टाच्या पसंतीस अगदीं उतरलें नाहीं. फलज्योतिषशास्त्राप्रमाणें मनुष्यांनीं वागावें असा त्याचा पूर्ण भरंवसा होता. शास्त्राप्रमाणें वागण्याविषयींचा निषेध शिवाजीनें केला तो त्याला अगदीं आवडला नाहीं. तो म्हणाला " मी शामभट्ट-जोशी चिंचवडकर आहें; ज्योतिषशास्त्रसंपन्न आहें. गांवढळ जोशासारखा पौर्णिमा, अमावास्या, वैधृति, व्यतिपात वगैरे गोष्टी सांगून दाणे मागणारा जोशी मी नाहीं. मी नूतन वस्त्रपरिधानास मुहूर्त सांगतों; घर सारविणें, कान टोंचणें, गमन करणें, गो, वृष, अश्व, गजादि पशु विकत घेणें, घर बांधणें, स्मश्रू करणें, गर्भाधान करणें, नांगर चालविणें, इत्यादि कामांविषयीं मी शुभ वेळा पाहून देतों. ग्रंथ पढल्याशिवाय मला ह्या गोष्टी करतां येत असतील असें संभवत नाहीं. शास्त्रांत लिहिलेलें प्रमाण हरिहरांस टळणार नाहीं. फलज्योतिःशास्त्र खरें आहे; अगदीं खरें आहे. इतर शास्त्रांविषयीं मी निश्चयानें सांगूं शकत नाहीं,

परंतु ज्योतिषावर माझा पूर्ण भरंवसा आहे. पुष्यनक्षत्र-योगावर काल रात्रीं तुला हा पुरंदर किल्ला मिळाला. अशी प्रत्यक्ष प्रतीति तुला स्वतः आली असून ' केवळ शास्त्रार्थावर नजर ठेवून उपयोग होणार नाहीं ' असें तूंच म्हणतोस हें यथार्थ नाहीं. मीं मुहूर्त पाहून दिले त्यांवर पुष्कळांचीं कार्यें झालीं. मला तें शास्त्र समजत नाहीं असें तूं कसें म्हणतोस ? " ही शामभट्टानें केलेली बडबड ऐकून शिवाजीला आश्चर्य वाटलें, तथापि त्यानें शांतपणानें उत्तर केलें. " तुम्हाला ज्योतिःशास्त्र येत नाहीं असें मी म्हणत नाहीं, परंतु ज्योतिषानें केलेलें भाकित, सरोद्यानें केलेली बडबड, पेचाक्षऱ्यानें मंतरलेले उडीद, जाणत्यानें बांधिलेला गंडा, भुत्यानें लाविलेलें कुंकूं, वाघ्यानें लाविलेला भंडारा, कानफाट्यानें दिलेला अंगारा व भाटानें दिलेला आशीर्वाद, ह्यांपासून नेहमीं गुण येत नाहीं हें मला पक्कें ठाऊक आहे. ह्या लोकांवर कोणी फार-सा भरंवसा ठेवूं नये "

जोशानें केलेल्या भाकिताचा गुण येत नाहीं, व ज्योतिषांची व इतर पाखांड्यांची बरोबरी आहे, अशा अर्थाचें भाषण ऐकून शामभट्टाचें पित्त खवळलें आणि तळपायाची आग मस्तकाला गेली. तो रागानें म्हणाला " हा दिवस नाहीं रात्र आहे, पुरंदर डोंगरी किल्ला नाहीं तळघर आहे, असें तूं म्हटलें असतेंस, तरी मीं तें एकवेळ कबूल केलें असतें, परंतु ज्योतिःशास्त्र खोटें आहे किंवा त्याचा उपयोग नाहीं हें मी कधींहि कबूल करणार नाहीं. तूं नास्तिक आहेस हें मला

अगोदर कळलें असतें तर काल रात्रीची पुण्यनक्षत्राची वेळा मीं तुला कळविली नसती व तुला हा किल्ला घेतां आला नसता. (शिवाजीनें किल्ला घेतल्याची बातमी शामभट्टाला वाटेंत कळली असें पूर्व प्रकरणांत सांगितलेंच आहे.) मला असें वाटतें कीं तूं खरा शिव नसून शनि होऊन मला छळण्याला आला आहेस. " शिवाजीच्या अंगांत शनि शिरला आहे अशी कल्पना होतांच शामभट्टाला ' गोसासीसूशतभिषक्सेसोदादीतुपूर्वभाक् ' या श्लोकाची आठवण झाली. नंतर तो मोठ्यानें ओरडून म्हणाला. " पहा हो पहा. शिव व शनि या दोन्ही नांवांची एक राशी कुंभ आहे आणि ' शनिर्नैकस्यकुंभस्य ' ह्या वचनाप्रमाणें त्या राशीचा स्वामि शनि आहे. या शिवाच्या अंगांत शनीनें प्रवेश केला आहे. मी शामभट्टजोशी चिंचवडकर ग्रहांचीं दानें घेतों, जप करतों व अनिष्ट ग्रहांचें निवारण करतों, म्हणून शनि मला पीडा करीत आहे व शिवाच्या मुखानें माझी मानहानि करीत आहे. त्याच्या भाषणावर तुम्ही विश्वास ठेवूं नका. ज्याच्या नवमस्थानीं रवि, मंगळ, किंवा शनि पडला आहे तो धर्महीन होईल असें शास्त्रवचन आहे. ऐका. ' धर्मस्थितारविशनैश्चरभूमिपुत्राः । कुर्वंतिधर्मरहितांविमतिंकुशीलं ॥ ' अशा धर्महीनाला उपदेश करूं नये असें शास्त्र सांगतें. " असें म्हणून शामभट्ट रागानें उठला व आपले पाय आपटीत तेथून जाऊं लागला. हें पाहून व त्यानें केलेला उपमर्द सहन न होऊन शिवाजीनें आपल्या शिपायास हुकूम केला कीं शामभट्टाला देवडीवर बस-

वून ठेवावें. त्याचा राग शांत झाल्यावर त्याच्याशीं आणखी बोलावें असें शिवाजीच्या मनांत कदाचित् आलें असावें.

शामभट्टास देवडीवर बसवून ठेवण्याचा हुकूम ऐकून बटो त्याजबरोबर गेला नाहीं. शिवाजीच्या आज्ञेवरून देवडीवरच्या शिपायांनीं शामभट्टास 'मत् जाव' केलें तेव्हां तो अधीक संतापून गेला. नंतर कोणाला मंगळ, कोणाला राहु, कोणाला शनि, या नांवानें शिव्या देऊन तो दरवाजाबाहेर दांडगाईनें जाऊं लागला, परंतु शिपायांनीं त्यास जाऊं दिलें नाहीं म्हणून त्यानें अधीकच तोंड सोडलें. लढाऊ लोकांच्यानें शिवी किंवा कोणतीहि हलकी गोष्ट सहन करवत नाहीं. त्यांस धक्काबुक्की करून व शिव्या देऊन शामभट्ट जाऊं लागला तेव्हां एका शिपायानें त्याला गच्च धरून ठेविलें. त्याच्या हातांतून सुटण्याकरितां शामभट्टानें प्रयत्न केला परंतु तो निष्फळ होत आहे असें पाहून तो त्या शिपायास लाथा मारूं लागला व त्याच्या हातांस डसूं लागला. तेव्हां दुसऱ्या एका शिपायानें शामभट्टाचे हात दोरीनें बांधून टाकले व त्याला देवडीवर आणून बसविलें. देवडीवर शिपायांची व शामभट्टाची झालेली झोंबाझोंबी शिवाजीला कळली नाहीं व तिजबद्दलची हकीकत धन्याच्या कानावर घालावी असें पहारेकऱ्यांस वाटलें पण नाहीं.

ज्यावेळेस शिपायांनीं शामभट्टाचे हात बांधून देवडीवर आणून बसविलें त्याच वेळेस नरसिंहभट्ट तेथें

येऊन पोहोंचला. तो तेथें कां आला हें आपणांस पाहिलें पाहिजे. शामभट्टाला व बटोला शिवाजीचें बोलावणें आलें तेव्हां नरसिंहभट्ट घरीं नव्हता; खांद्यावर भिक्षेची झोळी टाकून व घांसलेलें स्वच्छ ताम्हन हातांत घेऊन तो ' यज्ञपुरुषायनमः ' मागण्याकरितां बाहेर गेला होता. घरीं परत आल्यावर पूर्वसंकेताप्रमाणें त्याला आपली जन्मपत्रिका शामभट्टास दाखवावयाची होती. घरीं येऊन पोहोंचल्यावर त्यास असें कळलें कीं शिवाजीचें बोलावणें आल्यावरून शामभट्ट आणि बटो किल्लचावर गेले आहेत. शिवाजीनें पुरंदर किल्ला घेतला त्या आनंदाप्रीत्यर्थ शिवाजी दक्षिणा वांटीत असेल अशी कल्पना करून तोहि लगबगीनें घरून निघाला. देवडीवर येऊन पोहोंचतांच त्यानें शामभट्टाची अवस्था पाहिली. त्यास सोडवावें या हेतूनें तो थेट शिवाजीकडे गेला व त्यास हात जोडून म्हणाला—" महाराज, ज्या गृहस्थाला आपल्या शिपायांनें देवडीवर बसवून ठेविलें आहे तो विद्वान् ज्योतिषि आहे. त्यानें काल रात्रीं सुमुहूर्त वेळा पाहून जोंधळ्यांचीं मोत्यें केलीं तीं माझ्या धोतराच्या पदराला बांधलेलीं आहेत. तीं आपण प्रत्यक्ष पाहून असा अलौकिक चमत्कार करणाऱ्या जोशाचा बहुमान करावा अशी माझी प्रार्थना आहे. "

धान्यांत सांपडलेलीं मोत्यें नरसिंहभट्टानें आपल्या धोतराच्या पदरास बांधून लोकांना चमत्कार दाखविण्यासाठीं बरोबर नेलीं होतीं, हें मागें सांगितलेंच आहे म्हणून तीं त्याच्याजवळ होतीं. नरसिंहभट्टाची

विनंति ऐकून शिवाजीला आश्चर्य वाटलें व त्यानें आपला हात पुढें केला. नरसिंहभट्टानें मोत्यें काढून शिवाजीच्या हातावर ठेविलीं. तीं खरोखरीचीं मोत्यें आहेत असें पाहून त्यानें तीं पिलाजी, संकाजी वगैरे लोक जवळ बसले होते त्यांस दाखविलीं. सर्वांनीं परीक्षा केली कीं तीं खरोखरीचींच मोत्यें आहेत. जोंधळ्याच्या दाण्यांचीं मोत्यें कशीं झालीं अशाविषयीं हकीकत ऐकण्याची इच्छा सर्वांना झाली व त्या गोष्टीचें सर्वांनीं नवल केलें. नंतर शिवाजीनें नरसिंहभट्टाला आज्ञा केली व नरसिंहभट्टानें अथपासून इतिपर्यंत सर्व वृत्त निवेदन केलें. जेथें जेथें शिवाजीला संशय आला तेथें तेथें त्यानें नरसिंहभट्टाला प्रश्न केले. त्यानें दिलेल्या उत्तरांवरून शिवाजीनें ताडलें कीं ज्या अर्थीं ताम्हनाच्या पाण्यांत पहिल्यानें मोत्यें निघालीं त्याअर्थीं तीं मोत्यें बटोनें आणून टाकलीं असावीं.

रत्नपारख्यापुढें हिरा, कांच, वैडूर्य, स्फटिक, अथवा गार या पदार्थांची जशी परीक्षा होते तशी उत्तम न्यायाधिशापुढें खऱ्याखोट्याची तेव्हांच पारख होते. शिवाजीला संशय येतांच त्यानें बटोकडे रागावून पाहिलें आणि चिंचेचे फोक आणण्याविषयीं शिपायास आज्ञा केली. चौदावें रत्न पाहिल्याबरोबर मनुष्याला उपरति होते व आंगांत आलेलें भूत बोलूं लागतें. गुन्हेगारास कबूल करण्याकरितां चौदाव्या रत्नाचा उपयोग हल्लींच्या पोलिसांना देखील करावा लागतो. अमुक मनुष्यानें गुन्हा केल्याचा खात्रीलायक पुरावा झाल्यानंतर तो कबूल होत नसेल व चोरी-

चा माल दाखवीत नसेल तर त्याच्या उपयोगापासून फायदा होतो. परंतु कोणत्या प्रसंगीं, कोणत्या मनुष्याला, कोणत्या प्रकारें चौदावे रत्नाचा उपयोग करावा हें जाणण्याचें शहाणपण प्रत्येक मनुष्याच्या अंगीं नसल्यामुळें तसें करण्यापासून केव्हां केव्हां अपाय घडतात. अशा अपायामुळें त्याचा उपयोग करूं नये अशाविषयीं हल्लींच्या सरकारानें सक्त हुकूम केला असावा. शिवाजीसारख्या धूर्त मनुष्यानें नुसती धमकी दिल्याबरोबर काम कसें झालें हें पुढच्या हकीकतीवरून कळून येईल.

चिंचेचे फोंक आणण्याविषयीं हुकूम केल्यावर शिवाजी बटोला म्हणाला—" धान्याच्या बुगऱ्यांत व ताम्हनांत मोत्यें कशीं आलीं व तीं कोणीं आणून टाकलीं याविषयींची खरी हकीकत तूं मला सांगणार नाहींस तर मी तुला शासन केल्यावांचून राहणार नाहीं. तुला जें माहीत असेल तें तूं लवकर सांग. " अशी आज्ञा होतांच बटोनें आपले हात जोडून सकल वृत्त निवेदन केलें. नरसिंहभट्टाला व गोपिकाबाईला मोत्यें दिसणार नाहींत तर आपणाला पुन्हा मार खावा लागेल या भीतीनें त्यानें आपल्या पडशींतील मोत्यें काढून व कांहीं सुपांत व कांहीं ताम्हनांत टाकून दिलीं, ही गोष्ट ऐकल्यावर शिवाजीची खातरी झाली व त्याचा संशय फिटला. मुलाच्या जन्मपत्रिकेवरून त्याचा त्याग करण्याविषयीं शामभट्टानें गोविंदपंताला भरीस पाडलें व पुष्यनक्षत्राच्या फळावरून गोपि-

कावाईला मोत्यें करून देण्याच्या नादीं लावलें, ह्या दोन गोष्टी ऐकल्यावर, शामभट्ट घरून निघाल्यापासून ज्या ज्या गोष्टी घडल्या त्या सर्व ऐकण्याची उत्कंठा शिवाजीला झाली, तेव्हां त्या सांगण्याविषयीं त्यानें बटोला आज्ञा केली. बटोनें ज्या गोष्टी सांगितल्या त्या शिवाजीला इतक्या मनोहर वाटल्या कीं त्या त्यानें लिहून ठेवल्या. नंतर तो सर्व लोकांस म्हणाला—" शामभट्ट घरून निघाल्यापासून तो आणि बटो या दोघांमध्यें जीं भाषणें झालीं तीं लोकांच्या उपयोगाचीं आहेतः कित्येक गोष्टींतील सार प्रत्येक मनुष्यानें विचार करण्यासारखें आहे; मुहूर्तावर, शकुनावर व ग्रहांच्या इष्टानिष्ट बलावर किती विश्वास ठेवावा हें या शामभट्टाच्या चरित्रावरून चांगलें कळणार आहे. "

असें म्हणून गोविंदपंताकडे पाहून शिवाजी त्यास म्हणाला—" तुम्ही आपल्या मुलाला घरीं घेऊन जा व त्याचा प्रतिपाळ करा. त्यापासून तुमचें नुकसान निघालें तर त्याबद्दल मी जबाबदार आहें. " शामभट्टाची झालेली अवस्था पाहून शिवाजीची आज्ञा गोविंदपंतास मान्य करावी लागली. नंतर शिवाजी उठला तेव्हां सर्व लोक उठून उभे राहिले, त्यावेळेस बटोनें शिवाजीला विनंति केली. " महाराज, माझा गुरु शामभट्ट यास आपल्या शिपायांनीं देवडीवर बसवून ठेविलें आहे, त्याला घरीं घेऊन जाण्याची मला परवानगी मिळावी. " शिवाजी म्हणाला—" तुझा गुरु

विद्वान आहे परंतु पुस्तकांतून विशेषेंकरून ज्योतिष ग्रंथांतून जें जें लिहिलेलें आहे तें तें सर्व खरेंच आहे अशी त्याची समजूत झाली आहे व त्यामुळें तो वेडा झाला आहे. लोकांवर उपकार करण्याच्या हेतूनें तो स्तुत्य उद्योग करीत आहे असें तो समजतो, परंतु त्याच्या संगतीनें अपकार घडून माझे लोक वेडे होण्याचा संभव मात्र विशेष आहे. ग्रहांच्या व मुहूर्ताच्या नादीं माझे लोक लागले तर मी बोलाविल्याबरोबर ते संग्रामास निघणार नाहींत; मुहूर्त पाहत बसतील. एखाद्या प्रसंगीं अपजय आला तर मला ग्रह अनुकूल नाहींत असें समजून ते मला सोडून पळूं लागतील. अशा छांदिष्ट व नादी जोशाच्या संगतीनें ते वेडे होतील अशी मला भीति वाटत आहे." बटो हात जोडून म्हणाला--" महाराज, ज्याला जोशाच्या कुळांत जन्म प्राप्त झाला आहे, त्याला ज्योतिषावांचून पोट भरण्याचें दुसरें साधन नाहीं. आपण त्याला आपल्या शिपायांच्या ताब्यांत ठेवाल तर तो त्यांनाहि ज्योतिषी करून सोडील." हें बटोचें म्हणणें शिवाजीला अगदीं खरें वाटलें. तो म्हणाला--" मी आपल्या गोटांत शामभट्टाला घटकाभर सुद्धां ठेवूं इच्छीत नाहीं. रामदास स्वामि या नांवाचे सत्पुरुष आहेत ते त्याचें वेड घालविण्यास समर्थ आहेत, त्यांजकडे मी त्याला पाठविणार आहें. तूं त्याला स्वामींकडे घेऊन जाण्याचें कबूल करीत असलास तर मी त्याला तुझ्या स्वाधीन करतों." हें ऐकून बटोनें विनंति केली कीं, " एखाद्या वेळेस शामभट्टाचा स्वभाव

अगदीं अनावर होतो. यास्तव मला मदत मिळाल्यास मात्र मी त्याला स्वामीकडे घेऊन जाईन." तेव्हां शिवाजीनें आपला एक कारकून व शिपाई शामभट्टास पोहोंचविण्याकरितां देण्याचें कबूल केलें, आणि शामभट्टास घरीं घेऊन जाण्याविषयीं बटोला परवानगी दिली. कारकुनाबरोबर शिवाजीनें स्वामीला एक पत्र दिलें व शामभट्टाचें चरित्र लिहून घेतलें होतें तें स्वामीला विदित होण्याकरितां एका स्वाराबरोबर मुद्दाम पाठवून दिलें. त्या पत्रांत खालीं लिहिल्याप्रमाणें मजकूर होता.

"श्री जगद्गुरु समर्थ रामदास्वामी गोसावी, चरणाचे सेवेसीं तत्पर आज्ञांकित शिवाजी शाहाजी भोंसला याचा कृतानेक साष्टांग प्रणिपात विनंति विज्ञापना ऐशीजे स्वामीच्या आशीर्वादेंकरून मुक्काम पुरंदर येथें सुखरूप असों विशेष. समर्थांच्या चरणांचें दर्शन घेण्याची इच्छा करून हा दास राहिला आहे, ज्या दिवशीं स्वामि दर्शनाचा लाभ देतील तो सुदिन खरा. हल्लीं पुरंदर मुक्कामीं असतां कांहीं अद्भुत गोष्टी ऐकण्यांत आल्या व त्या घडवून आणणारा शामभट्टजोशी चिंचवडकर ह्याची समक्ष भेटहि झाली. त्याच्या गोष्टी संक्षिप्त रीतीनें लिहून समर्थांच्या सेवेसीं सादर केल्या आहेत व मूढ जनाला सुमार्गाला लावण्याविषयींची स्वामींची ख्याति ऐकून मशारानिल्हे शामभट्ट यांस स्वामींच्या चरणांपाशीं पाठविलें आहे, त्याजवर स्वामींची कृपादृष्टि व्हावी. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना. मित्ति

कार्तिक शुद्ध द्वितीया, शके १९६९ दस्तूर राघोपंत चितळे मुक्काम किल्ला पुरंदर."

शिवाजीची आज्ञा घेऊन शामभट्टाला बिऱ्हाडीं घेऊन जाण्याकरितां बटो त्याजजवळ आला तेव्हां नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें तो विचारांत गुंग झालेला त्यास दिसला. त्याचें मन स्थिर दिसलें. बटोनें त्याचे हात सोडले तेव्हां तो देहावर आला व बटोला पाहून त्यास आनंद झाला. तो म्हणाला—" बटो, माझी अवस्था अशी कां झाली होती तिचें कारण मी आतां ओळखिलें. सौम्याश्विति्प्यश्रवणश्रविष्ठाहस्तधृवत्वाष्ट्रसुपूषभानि । मैत्रेणयुक्तानिनरेश्वराणांविलोकनेभानिशुभप्रदानि ॥ आतां मी समजलों. शिवाजीची भेट घेण्यास आपण घरून निघालों तेव्हां मृग, अश्विनी, पुष्य, श्रवण, धनिष्ठा, हस्त, चित्रा, रेवती किंवा अनुराधा ह्यांपैकीं कोणतेंच नक्षत्र नव्हतें. राजदर्शन घेण्याला हीं नक्षत्रें शुभप्रद सांगितलीं आहेत. ज्योतिःशास्त्राचें फल येत नाहीं असें म्हणणाऱ्या लोकांना केवढा भ्रम झाला आहे पहा ! अरे, काल मी शिवाजीची भेट घेतली तेव्हां त्यानें माझा आदरसत्कार केला, आणि आज त्यानें माझे हे हाल केले; हा नक्षत्राचा दोष आहे, माझा नाहीं. मी जसा काल होतों तसाच आजहि आहें. माझ्या रूपांत, रंगांत, चेहऱ्यांत किंवा आचरणांत काडीमात्र फरक पडला नाहीं हें मी शपथ घेऊन सांगेन. तेव्हां एका भेटींत शिवाजीनें मला बहुमान द्यावा व दुसऱ्या भेटींत त्यानें माझा अपमान करावा, हें फल कशाचें आहे बाबा ? शिवाजी तोच

व मीहि तोच, आम्हां दोघांत फेरबदल झाला नाहीं; परंतु तीथ, वार, नक्षत्र व वेळा हीं मात्र बदललेलीं होतीं. हा वेळेचा गुण आहे. आतां ज्योतिष खरें किंवा खोटें ? बाबारे, ज्योतिष निर्भ्रांत खरें आहे. बटो, तूं जाऊन शिवाजीला ही गोष्ट सांग व त्याजपासून अर्जिक्यपत्र मागून घे. ही गोष्ट ऐकल्यावर ज्योतिषाच्या खरेपणाविषयीं शंका घेण्यास त्याला कारण राहणार नाहीं. विद्वानानें चमत्कार केले व राजाला निरुत्तर केलें ह्मणजे विद्वानाला अर्जिक्यपत्र मिळत असतें. मी शिवाजीला जिंकिलें ह्मणून तूं त्याजपासून अर्जिक्यपत्र मागून घे.अशी उत्तम संधि घालवूं नकोस." शिवाजीपासून अर्जिक्यपत्र घेण्याकरितां बटोनें जावें असें शामभट्टानें म्हटलें, परंतु तें घेण्याकरितां तो स्वतः गेला नाहीं, ह्याचें काय कारण असेल तें असो. शिवाजीच्या अंगांत शनि शिरल्याची त्यास आठवण होऊन त्याजसमोर पुन्हा जाण्याची कदाचित् त्यास भीति वाटली असावी !

शामभट्टाचें भाषण ऐकून बटोला हंसूं आलें. तो म्हणाला—" गुरु महाराज, आपलें ज्ञान, आपली कीर्ति व आपले हातून घडलेले चमत्कार मीं शिवाजीला सांगितले. माझें बोलणें ऐकून शिवाजी इतका खुष झाला कीं त्यानें आपलें चरित्र घराहून निघाल्यापासून तों अखेरपर्यंत लिहून ठेविलें. शिवाजीनें आज्ञा केली आहे कीं दोन मनुष्यांनीं आपल्या तैनातीस रहावें व आपल्यास रामदास स्वामींकडे पोहोंचतें करावें, स्वामींला आपण जिंकिलें तर आपणास अर्जि-

क्यपत्र मिळण्यास बिलकुल विलंब लागणार नाहीं. " या वेळेस शामभट्टाला अजिंक्यपत्र मिळविण्याचा नाद लागल्यामुळें तो आपलें दुःख व झालेला अपमान विसरला, आणि बटोला म्हणाला—" अरे, मी सर्वांना अजिंक्य आहें, मग तो स्वामि असो किंवा संन्यासी असो. चल तर आपण आतांच स्वामींकडे जाऊं व अजिंक्यपत्र घेऊन येऊं. "

हा गुरुशिष्याचा संवाद ऐकून देवडीवरच्या शिपायांस शामभट्टाचें भय वाटलें. त्यांनीं येऊन शामभट्टाच्या पायांवर आपलीं डोकीं टेंकलीं व झालेल्या अपराधाबद्दल शामभट्टाची क्षमा मागून घेतली. जोशाची सर्वांना गरज होती. कोणाला आपले ग्रह पाहण्याचे होते, कोणाला बढती कधीं मिळेल तें ऐकण्याची उत्कंठा होती, कोणाला मुलगा कधीं होईल हें विचारण्याचें होतें !

शामभट्टाची अशा प्रकारें समजूत घातल्यावर व अजिंक्यपत्र मिळविण्याच्या ईर्षेला त्याला चढविल्यावर, त्यास बरोबर घेऊन बटो नरसिंहभट्टाच्या घरीं आला. स्वामींकडे जाण्याची व अजिंक्यपत्र घेण्याची शामभट्टाला इतकी घाई झाली होती कीं, त्यानें लागलींच आपलीं घोडीं तयार करण्यास बटोला सांगितलें. शामभट्टाची आज्ञा ऐकणें बटोला प्राप्त होतें, त्यानें तत्क्षणीं नरसिंहभट्टाला पाठवून शिवाजीकडून कारकून व शिपाई यांस आणविलें व घोड्यांवर सामान ठेवून निघण्याची तयारी केली. आपल्या पडशींतून मोत्यें काढून बटोनें ताम्हनांत व सुपांतील घुगऱ्यांत टाकिलीं

होतीं ही गोष्ट ऐकल्यापासून नरसिंहभट्टाची भक्ति कमी झाली होती, परंतु गोपिकाबाईनें शामभट्टाच्या पायांवर लोळण घेतली व 'माझें दरिद्र दूर करा' म्हणून त्यास एकदां अखेरची विनंति केली !

शिवाजीचा कारकून व शिपाई आल्यावर शामभट्ट नरसिंहभट्टाचें घर सोडून निघाला. वाट चालूं लागल्यावर दुष्ट शकुन झाल्याची व शेतकऱ्यांच्या हातून मार खाल्लाची बटोला आठवण झाली. तसा प्रसंग पुन्हा येऊं नये असा विचार करून तो शामभट्टाला ह्मणाला—" गुरु महाराज, शिवाजीनें आणखी असें सांगितलें आहे कीं आपण अजिक्यपत्र मिळविल्यावांचून कोणाशीं ज्योतिःशास्त्रफलाविषयीं भाषण करूं नये, कोणाला मुहूर्त देऊं नये अगर नवरानवरीच्या पत्रिका जुळवूं नयेत. " शिवाजीच्या अधिकाराची शामभट्टाला पक्की आठवण राहिली होती असें दिसतें. तो नम्रतेनें ह्मणाला—" बाबारे, राजाज्ञा मान्य करावी असें ग्रंथांत लिहिलें आहे, परंतु ज्योतिष सांगण्याचा अवरोध करावा असें कोठेंच सांगितलें नाहीं. अमुक प्रसंगीं मुहूर्त पाहूं नये, पत्रिका जुळवूं नये किंवा प्रश्न सांगूं नये असें कोठें लिहिलेलें मला आढळलें नाहीं. तिथी, वार, नक्षत्र आणि योग, हीं सांगण्याचें काम बंद पाडलें तर या जगांतील माणसांच्या हजामती डुकरांच्या केंसांप्रमाणें लठ्ठ वाढतील, त्यांच्या आंगावर जुनीं व फाटलेलीं वस्त्रें राहतील, मुलें अविंध राहतील, नवीन घरें होणार नाहींत,व जुन्या घरांच्या भिंती कोणी सारविणार

नाहींत, कोणी गांवाला जाणार नाहीं, कृषिकर्म बंद राहील व धान्योत्पत्ति होणार नाहीं, उंसांचे व तेलाचे घाणे चालणार नाहींत, नावाडी लोक गलबतें समुद्रांत हांकणार नाहींत, मुलांना मिशा फुटतील तरी त्यांच्या मुंजी लागणार नाहींत, लग्न झाल्यावांचून मुलगे व मुली ह्याताऱ्या होतील, गर्भाधान झाल्यावांचून वधुवरें रहातील व प्रजोत्पत्तीचें काम बंद पडेल! हिंदूंना, विशेषेंकरून ब्राह्मणांना, मुहूर्त पाहिल्यावांचून ह्यांपैकीं कोणतेंच काम करतां येणार नाहीं. असें झालें ह्मणजे हें जग बुडेल कीं राहील, तूंच सांग?"

शिवाजीनें आपला कारकून शामभट्टाबरोबर दिला होता व जो शामभट्टाच्या मागोमाग वाट चालत होता त्याचें नांव रंगोपंत होतें. शामभट्टाच्या भाषणाचें त्यास अत्यंत नवल वाटून त्यानें केलेल्या प्रश्नाचें उत्तर बटोनें देण्यापूर्वी तो ह्मणाला—" आपल्यापुढें तर्क घेण्याची माझी योग्यता नाहीं हें मी जाणून आहें, परंतु आपल्यापासून शंकेचें समाधान करून घ्यावें असें वाटल्यावरून मला बोलण्याची इच्छा झाली आहे. जन्म, लग्न, फलशोभन, गमन, इत्यादि गोष्टींविषयीं इष्टानिष्ट ग्रह पाहण्याची चाल फक्त ब्राह्मणांत आहे. त्या चालीपासून त्यांचा विशेष फायदा झाला आहे असें मला दिसत नाहीं. जीं मनुष्यें ग्रहांचें बल पहात नाहींत त्यांपेक्षां ते मूठभर उंच, अधिक सुखी, बलवान्, धनवान् किंवा पराक्रमी झाल्याचें मला दिसत नाहीं. उदाहरणार्थ, नवरानवरीचे छत्तीस गुण पाहिल्यावांचून लग्नें करणारांची संख्या ब्राह्मणांपेक्षां दस-

पट मोठीं आहे, परंतु त्या लोकांत कमीपणा आला आहे असें मला दिसत नाहीं. तीं नवराबायको आनंदानें राहतात, त्यांना मुलें होतात, त्यांना धनप्राप्ति होते, ते अधिकारास चढतात व सुख पावतात. त्यांच्याशीं ब्राह्मणांचें सुखदुःख ताडून पाहतां ब्राह्मण जास्त सुखी आहेत असें वाटत नाहीं. "

यावर शामभट्टानें उत्तर केलें—" कलीच्या प्रादुर्भावामुळें तुझ्यासारखे कुतर्क लोकांना सुचतील व लोक शास्त्रावर विश्वास ठेवणार नाहींत असें भविष्योत्तरपुराणांत लख्ख सांगितलें आहे. बाबारे, ज्या विद्वानांनीं शास्त्र केलें ते सर्वच शतमूर्ख नव्हते. पुढें काय होणार आहे हें त्यांना कळत होतें. केवळ लोकांवर उपकार करावा अशासाठीं विद्वानांनीं फलज्योतिषग्रंथ लिहून ठेविले, त्या ग्रंथांप्रमाणें जो चालेल त्याला उत्तम फल मिळेल याविषयीं मला शंका राहिली नाहीं. मी ज्योतिषाप्रमाणें वागलों म्हणून मला हें घोडें मिळालें, वस्त्रें मिळालीं व धन मिळालें. मी इतका उत्तम पुरुष ठरलों आहें कीं माझें संपूर्ण चरित्र शिवाजीनें लिहून घेतलें! ती पहा, बटोच्या घोड्यावर टाकलेली पडशी मला मिळालेल्या वस्त्रांच्या, पैशाच्या, व इतर वस्तूंच्या भारानें भरलेली आहे. मी घरून निघालों तेव्हां ती कांसवाच्या पाठीसारखी सपाट होती, आतां ती बैलाच्या पोटाप्रमाणें लठ्ठ फुगलेली आहे! हें प्रत्यक्ष प्रमाण आपल्या डोळ्यांपुढें असून ज्योतिष खोटें कसें म्हणावें? बाबारे, तुम्हा गृहस्थांना पैसा खर्च करण्याची व तो जो-

शाला देण्याची बुद्धि होत नाहीं. गोपिकाबाईनें मीं सांगितलें तसें केलें तेव्हां तिला मोत्यें मिळालीं. पूष्यनक्षत्रयोगावर शिवाजीनें किल्ला घेतला. असे प्रत्यक्ष अनुभव आलेले असून ज्योतिष खोटें आहे असें निंदक म्हणतील तर ते नरकांत जाऊन पडतील." ह्या बोलण्यापासून रंगोपंताला किंचित् हंसूं आलेलें पाहून शामभट्ट पुन्हा म्हणाला—" शास्त्राचा उच्छेद करणारे लोक नरकांत पडतील असें ग्रंथांत साफ सांगितलें आहे. ग्रंथाधार असल्यावांचून मी बोलत नाहीं असें तूं पक्कें समज." नरकांत पडण्याची भीति सर्वांना वाटते. ज्योतिषापासून जोशांना फायदा होतो तितका लोकांना होत नाहीं अशा प्रकारचे विचार त्याच्या मनांत घोळत होते, परंतु ते आले तसे माघारे गेले. लहानपणीं मिळालेल्या शिक्षणाचें प्राबल्य इतकें बळकट असतें कीं त्यापुढें आपलें मन अन्य विचार करण्यास असमर्थ होतें. ज्योतिषावर भरंवसा ठेवावा असल्या प्रकारचें शिक्षण रंगोपंतास मिळालें होतें, व त्या शिक्षणाचें प्राबल्य त्याच्या मनावर झालें होतें. जरी पहिल्यानें तो बोलून चुकला तरी त्याच्यानें तसें पुन्हा बोलवेना. कुतर्क घेऊन विद्वानाशीं बोलूं नये असें त्यास वाटून त्यानें शामभट्टास उत्तर दिलें नाहीं. नंतर निमुटपणें ते वाट चालूं लागले. रंगोपंतास आपण निरुत्तर केलें याचें शामभट्टास भूषण वाटून तोहि चुप्प राहिला.

पुरंदरापासून बरेंच दूर गेल्यावर समोरून एक मनुष्य येत आहे असें त्यांस दिसलें. तो मनुष्य भगवीं

वस्त्रें नेसलेला होता व त्याच्या तोंडावर मुद्रा वठविलेल्या होत्या. स्वामि कोठें आहेत हें त्यास माहित असेल असें समजून रंगोपंत पुढें होऊन त्यास ह्मणाला— "बोवा, स्वामीचें ठिकाण आह्मास सांगाल तर मेहरबानी होईल." त्यावर त्या मनुष्यानें उत्तर केलें. "येथून जवळच एक मोठा खोरा आहे,त्यांत स्वामि वसले आहेत. त्यांनीं मला शामभट्ट जोशी चिंचवडकर यास घेऊन येण्याकरितां पाठविलें आहे. तो तुला वाटेंतच भेटेल असें स्वामि मला ह्मणाले. आपणांपैकीं कोणी शामभट्ट असेल तर मी त्यास स्वामींकडे घेऊन जाईन." त्या मनुष्याचें हें बोलणें ऐकून शामभट्ट, बटो, रंगोपंत व शिपाई या सर्वांस आनंदाश्चर्य झालें, आणि स्वामींच्या भुतभविष्यवर्तमान जाणण्याचे ज्ञानाबद्दल ते प्रशंसा करूं लागले. नंतर रंगोपंतानें शामभट्टाची व त्या मनुष्याची ओळख करून दिली, तेव्हां तो मनुष्य ह्मणाला " जोशीबुवा, तुमच्या नांवाचा स्वामींनीं निदिध्यास केला आहे. सकाळपासून मला दोन तीन वेळां विचारिलें कीं ' शामभट्ट आला काय ? ' शेवटीं कंटाळून त्यांनीं मला तुमचा शोध करण्यास पाठविलें. ते म्हणाले. ' कल्याणा, तूं पुरंदरच्या वाटेनें नीट जा. वाटेंत तुला तो भेटेल, त्यास मजकडे घेऊन ये. हा मी तुझी वाट पहात येथेंच बसतों. "

शामभट्ट आपणाकडे येत आहे हें स्वामींनीं कसें ओळखिलें याबद्दल चतुर वाचकांनीं कल्पना केलीच असेल, तथापि सर्वांच्या माहितीसाठीं ती गोष्ट येथें स्पष्ट केली असतां वावगें होणार नाहीं. शामभट्टाचें

चरित्र मुद्दाम एका स्वाराबरोबर स्वामींकडे शिवाजीनें पाठविलें असें मागें सांगितलें आहे. तो स्वार तावडतोब स्वामींकडे जाऊन पोहोंचला होता व शामभट्टाचा सकळ वृत्तांत त्यांस कळला होता. त्यांनीं त्या स्वारास लागलींच परत पाठविलें व आपण एका निर्जन अरण्यांत सुंदर छायेखालीं एका झऱ्याच्या कांठीं जाऊन बसले. शामभट्टाचें चरित्र वाचल्यापासून तो आपणास केव्हां भेटेल अशी उत्कंठा स्वामींला झाली होती, म्हणून त्यांनीं 'शामभट्ट आला काय ?' असें विचारिलें होतें. अरण्यभर आपला शोध करीत शामभट्टास व त्याजबरोबरच्या मनुष्यांस फिरावयास लागूं नये म्हणून स्वामींनीं कल्याणास पाठविलें होतें.

आपणास नेण्याकरितां आलेला मनुष्य स्वामींचा पट्टशिष्य कल्याण आहे असें समजल्यावर शामभट्ट चकित झाला व मुकाट्यानें वाट चालूं लागला. ज्यांना रामदासस्वामींची थोडीबहुत माहिती आहे, त्यांना कल्याण कोण व त्याचा स्वभाव कसा होता ह्या गोष्टी ऐकून ठाऊक आहेत. आपण स्वामींकडे जात आहों हें स्वामींला आधींच कळलें या विचारांत शामभट्ट दंग झाला. तो आपल्या मनांत म्हणाला—" हें भविष्य स्वामींनीं बिनचूक केलें त्या अर्थी स्वामि मजपेक्षां ज्योतिषांत विशेष निष्णात असले पाहिजेत. त्यांजपासून आर्जिक्यपत्र मिळविण्याकरितां मला आपल्या पाठांतराची पुन्हा उजळणी केली पाहिजे." असें म्हणून तो आपल्या तोंडातल्यातोंडांत मुहूर्त मार्तंड,मुहूर्त चिंतामणि,ग्रहलाघव, चमत्कार चिंतामणि, केशवि, कालामृत,

बृहज्जातक इत्यादि अनेक ग्रंथांची आवृत्ति झणूं लागला. कल्याण सर्वांच्यापुढें चालला होता, त्याच्यामागून शामभट्ट, रंगोपंत, बटो व शिपाई हे अनुक्रमानें वाट चालत होते. कांहीं वेळानें ते किर्र अरण्यांत जाऊन पोहोंचले व डोंगर उतरून खोरींत जाऊं लागले, तेव्हां शामभट्ट खेरीज करून सर्व आपापल्या घोड्यांवरून खालीं उतरून पायीं चालूं लागले. दगडांतून, घसरणींतून आणि कड्यावरून चालतांना पाठ झणण्याच्या नादांत शामभट्टाला आपल्या घोड्याचा लगाम आवरून धरतां येणार नाहीं असें समजून शिपायानें तो धरून तें हळूहळू चालविलें. आसनावर बसल्याप्रमाणें खुशाल घोड्यावर बसून शामभट्ट आपल्या तोंडानें भराभर उजळणी करीत होता. वाटेकडे त्याचें लक्ष्य अगदीं नव्हतें. असे कांहीं दूर गेल्यावर त्यांस पुन्हा सपाट जमीन लागली. तेथें फार दाट झाडी होती, तिजकडे शामभट्टानें पाहिलें सुद्धां नाहीं. त्या झाडींत एका ओहोळाच्या कांठीं निर्मळ व शुद्ध झऱ्याजवळ एका विस्तीर्ण दगडावर रामदास स्वामि बसले होते. ते एकटेच होते. कल्याण आला असें पाहून " शामभट्ट आला काय ? " असा स्वामींनीं प्रश्न केल्यावर त्यास " होय " म्हणून कल्याणानें उत्तर दिलें. ह्यापैकीं कांहींच शामभट्टास ऐकूं आलें नाहीं. तो ग्रंथाची आवृत्ति करण्याच्या नादांत गुंग होता. शिपायानें शामभट्टाचें घोडें उभें केलें तरी तें त्यास कळलें नाहीं ! रंगोपंत, बटो आणि शिपाई ह्यांनीं आपलीं डोकीं स्वामींच्या पायांवर ठेविलीं,

नंतर शिवाजीनें दिलेलें पत्र रंगोपंतानें स्वामींजवळ ठेविलें. तें वाचल्यावर स्वामी ह्मणाले. " कल्याणा, ब्राह्मण सत्पात्र दिसतो. " कल्याणानें उत्तर केलें— " महाराज, अनुग्रह घेण्यास तो योग्य आहे. "

पुढें कोणत्या उपायानें स्वामींनीं शामभट्टाला देहावर आणिलें, याविषयींची हकीकत पुढच्या प्रकरणांत दिली आहे.

प्रकरण बाविसावें.

शामभट्ट अनुग्रह घेण्यास योग्य आहे असें कल्याणाचें ह्मणणें ऐकून स्वामींनीं आज्ञा केली कीं शामभट्टास घोड्याखालीं उतरावें व त्याच्या डोळ्यांस पाणी लावावें. कल्याण व शिपाई या दोघांनीं त्यास जमिनीवर उभा केल्यावर कल्याणानें त्याच्या डोळ्यांस पाणी लाविलें तेव्हां शामभट्टानें पाठ ह्मणण्याचें बंद केलें व स्वामींला साष्टांग नमस्कार घातला. नंतर स्वामींनीं त्यास प्रश्न केला कीं "तूं कोण आहेस सांग." जसा चाबुकस्वारापुढें घोडा थरथर कांपतो व दांडगाई करण्याचें सोडून देतो त्याप्रमाणें शामभट्टानें नम्रता धरली आणि उत्तर केलें–"महाराज, मी चिंचवडकर जोशी गरीब ब्राह्मण आहें." स्वामी ह्मणाले "अरे, तूं गरीब ब्राह्मण आहेस हें जर खरें आहे तर कोणाला मोल्यें करून दे, कोणाला मुलाचा त्याग करण्यास लाव, कोणाचीं चित्रें मोड, कोणाला विंचू डसव, असले उद्योग तूं कां करीत होतास, तें सांग."

शामभट्टानें उत्तर केलें–"महाराज, तीथ, वार व नक्षत्रें सांगून पायलीभर दाण्यावर माझा चरितार्थ चालेना. मला वतनवाडी नाहीं किंवा इनामहि नाहीं. घराच्या दुरुस्तीकरितां किंवा बायकोच्या बाळंतपणाकरितां पांचपंचवीस रुपये सुद्धां मला मिळेनात तेव्हां फलज्योतिषग्रंथावरून लोकांना चमत्कार करून दाखवून द्रव्य मिळवावें या हेतूनें मी घराहून निघालों. आकाशांत

धूमकेतु निघाला आहे, त्याचें फळ राज्यक्रांति होईल असें आहे. राज्यक्रांतीच्या वेळेस दंगे होतात व लोकांचे पुष्कळ हाल होतात, हा अनर्थ लोकांना कळवावा, ग्रहांची शांति करावी आणि लोकांची पीडा दूर करावी, हा उद्योग मी करीत आहें. महाराज, लोकांचा मजवर इतका भरंवसा आहे कीं मला विचारल्यावांचून ते आपलें घर सारवीत नाहींत, पापडाचें पीठ भिजवीत नाहींत, उखळ पुरीत नाहींत; जात्यास टांकी लावीत नाहींत, मुलांचा कान टोंचीत नाहींत, हजामती करीत नाहींत, धान्य पेरीत नाहींत; उसांचा किंवा तिळांचा घाणा चालवीत नाहींत; गलबतें हाकारीत नाहींत; गाई, म्हशी इत्यादि जनावरें विकत घेत नाहींत किंवा विकीत नाहींत; मुलाला बायको पसंत करीत नाहींत; मुंजी, लग्नें लावीत नाहींत; घर बांधीत नाहींत; वरात काढीत नाहींत, लग्नमुंजींचीं बोलावणीं करीत नाहींत किंवा त्याकरितां सामान खेरेदी करीत नाहींत; नवें वस्त्र नेशीत नाहींत. महाराज, फार काय सांगूं, मुहूर्त पाहिल्याशिवाय ते कोणतेंच काम करीत नाहींत. संसारांतील हरएक कामाकरितां मीं सुवेळा पाहून देतों. फलज्योतिषग्रंथ मला तोंडपाठ म्हणतां येत आहेत. आपण परीक्षा घेऊन मला अजिक्य पत्र लिहून द्यावें. "

शामभट्टाला ज्योतिषाविषयीं अत्यंत भ्रम झाला आहे हें स्वामींनीं पूर्वीच जाणिलें होतें. तो भ्रम दूर व्हावा या बुद्धीनें स्वामी म्हणाले. " आपल्या मालाचा खप व्हावा म्हणून जसा हलवाई पेढ्यांना बेगड

चिकटवितो, किंवा वाणी लवंगा, सुपारी व वेलदोडे या पदार्थांस रंग लावतो, किंवा चितारी एका चित्रांत अनेक रूपें दाखवितो, त्याप्रमाणें तूं आपल्या ज्योतिषधंद्यास उत्तेजन येण्याकरितां नाना चमत्कार करून दाखविण्याचें आरंभिलें आहेस. बेगडाला किंवा रंगाला भुलून नासका व कुजका माल गिऱ्हाईक बहुत मोल देऊन घेतें. नासकेकुजके पदार्थ खाल्ल्यानें शरीरास रोग उत्पन्न होतात. तुझ्या चमत्काराला भुलून लोकहि भक्तिहीन होतील व आपलें अनहित करून घेतील. तूं चांगला मुहूर्त पाहून घरून निघालास आणि गांवाबाहेर येतांच नदीमध्यें वेड्यासारखा धांवत जाऊन बटोच्या आंगावर आपटलास व बटोच्या हातून मार खाल्लास. चांगल्या मुहूर्ताचें फळ तुलाच जर होत नाहीं तर तें लोकांना कितपत होईल? याचा तूंच विचार कर, म्हणजे तुला कळेल."

शामभट्ट ह्मणाला—"महाराज, तो अनर्थ बटोच्या हयगयीमुळें झाला. माझ्याबरोबर त्यानें आपलें डोकें दरवाजाबाहेर काढलें असतें ह्मणजे गुरु माझ्या पाठीमागें लागला नसता. बटोनें मला मारिलें असें आपण ह्मणतां हें अगदीं खोटें आहे. मी शुक्र आहें असें समजून गुरूनें मला मारिलें."

स्वामि ह्मणाले—"अरे, त्या वेळेस तूंहि कबूल केलें होतेंस कीं ज्या हातांनीं तुला मार बसला ते हात बटोच्या हातासारखे कठीण होते आणि धुतलेल्या धोतराच्या ओल्या घडीवर तळहातांनीं झोडपावें त्याप्रमाणें तुझ्या पाठीचा धबाधब आवाज झाला होता.

बटोच्या आंगावर तूं एकदम जाऊन पडला होतास ह्मणून बटोनें तुला ओळखिलें नव्हतें; मी शुक्र नाहीं असें तूं ह्मणालास तेव्हां तुझा आवाज ओळखिल्याबरोबर बटो तुला सोडून पळाला."

असें ऐकिल्यावर शामभट्टानें बटोकडे वळून रागानें पाहिलें तेव्हां बटोनें चुकलों ह्मणून आपल्या थोबाडींत मारून घेतली. तें पाहून शामभट्ट ह्मणाला–" महाराज, बटोच्या कृतीवरून मला आतां असें वाटतें कीं आपण ह्मणतां तेंच खरें आहे, परंतु चंद्राची व गुरुची लढाई मी पाहिली ती कांहीं खोटी नव्हती."

स्वामि म्हणाले—" तुला केवढा भ्रम झाला आहे पहा. अरे, स्वर्गांत वास करणारे–चंद्र, गुरु, किंवा मंगल–ग्रह पृथ्वीवर कसे येतील ? चंद्र या पृथ्वीवर येऊन पडला तर आकाशमंडळाचा छेद होऊन ही सर्व पृथ्वी तो व्यापून टाकील. अशाच भ्रमानें तूं आगटीचा उजेड पाहून त्याला मंगळ समजलास आणि एका गरीब शेतकऱ्याच्या पाठीवर विंचू टाकून दिलास. त्याच्या सोबत्यानें तुझी पण बरीच खोड मोडली. तुला त्यानें झाडाला उलटें टांगलें आणि तूं वाट चालत असतां तुला घोड्याखालीं पाडून काठीनें झोडपलें. "

शामभट्ट म्हणाला—" महाराज, तें दुष्ट शकुनाचें फळ आहे. ' क्वयासितिष्ठआगच्छकितेतत्रगतस्यतुः ' अशा प्रकारचे शब्द निघते वेळेस ऐकिले असतां विपत्ति प्राप्त होते असें ग्रंथांत स्पष्ट सांगितलें आहे. "

स्वामि म्हणाले—" ग्रंथांतील वचनांची मात्र तुला आठवण राहाते, आणि तुझ्या बोलण्याची आठवण तुला राहात नाहीं याचें मला नवल वाटतें. बटोचें व तुझें बोलणें चाललें असतां तूं म्हणालास कीं तूं पहिल्यानें त्या शेतकऱ्यास काठी मारली नसतीस तर तुला मार खावा लागला नसता, आणि तूंच पुन्हा म्हणतोस कीं दुष्ट शकुनाचें तें फळ आहे! ज्योतिषाच्या नादानें तुला केवढा भ्रम झालेला आहे!"

शामभट्ट म्हणाला—" आपल्या कृपेनें मला एकेक गोष्ट आठवूं लागली आहे. मीं शेतकऱ्यास काठी मारली नसती तर त्यानें मला मुकाट्यानें जाऊं दिलें असतें खचित; परंतु स्वामिमहाराज, मीं विक्रमराजाला दूतांच्या हातून सोडविलें ही गोष्ट मात्र अगदीं खरी आहे. शनीच्या पीडेपासून मी शामभट्टजोशी चिंचवडकर लोकांना सोडवितों ह्यांत तिलप्राय संदेह नाहीं. ही गोष्ट आपणासहि कबूल करावी लागेल व मला अजिंक्यपत्र द्यावें लागेल."

रंगोपंत, कल्याण, बटो आणि शिपाई हे चौघेजण हा संवाद ऐकून आश्चर्य करीत उभे राहिले होते. शुद्धीवर येऊन व एकेक गोष्ट कबूल करून शामभट्ट पुन्हा पूर्वस्थितीवर जातो याचें स्वामीला फार वाईट वाटलें. ते म्हणाले—" अरे, विक्रमराजाला होऊन सतराशें वर्षांवर काळ गेला आणि तूं विक्रमाची सुटका कशी केलीस, याचा तूं कांहीं तरी विचार केला आहेस काय? तूं ज्या विक्रमाला सोडविलेंस तें लाकडाचें चित्र होतें. तूं चित्रांचा नाश करून चित्रकाराचें नुक-

सान केलें होतेंस म्हणून तूं तें भरून देण्याचें कबूल केलें होतेंस, आणि तूं आतां फिरून म्हणतोस कीं विक्रमाला दूतांच्या हातून मीं सोडविलें ! याचप्रमाणें दोन टेंकड्यांवर तुझे पाय टेंकून तूं झोंप घेत उभा राहिला होतास परंतु शनीनें तुला उचललें असें म्हणून तूं बटोला मारण्याकरितां त्याच्या अंगावर चालून गेला होतास ! बाबारे, शनि आकाशांत राहणारा एक ग्रह आहे, तो पृथ्वीवर येत नाहीं व कोणाला उचलूं शकत नाहीं. शनीनें अमुक केलें व मंगळानें तसुक केलें ही तुला भ्रांति झाली आहे. वेडेपणामुळें तूं बटोला मारण्याला तयार झाला होतास व तुझ्या वेडेपणामुळेंच बटोचा मार वांचला. तुझ्याच वेडेपणामुळें चित्रकारानेंहि तुझ्यापासून बारा आण्याच्या ऐवजीं एक संबंध रुपया घेतला. "

शामभट्ट आश्चर्यानें म्हणाला—" आपण काय म्हणतां महाराज ! मी चित्रकाराला एक कवडी सुद्धां दिली नाहीं. गांवकऱ्यांनीं आपसांत वर्गणी करून त्याला अठरा आणे करून दिले ही गोष्ट माझ्या पक्की ध्यानांत आहे. "

स्वामि म्हणाले—" ज्या वेळेस तूं चित्रकाराचीं चित्रें मोडलींस त्याच वेळेस तूं त्याला कवडी सुद्धां दिली नाहींस ही गोष्ट खरी आहे. त्याचीं चित्रें मोडल्यावर खेळ करून दाखविण्याचें साधन नाहींसें झालें तेव्हां त्या चित्रकारानें सरोद्याचें सोंग घेतलें व त्या सोंगानें तो तुला नरसिंहभट्टाच्या घरीं पुन्हा भेटला. त्यावेळेस प्रश्न सांगण्याचे मिषानें त्यानें तुझ्या-

जवळ एक रुपया मागितला आणि बटो नाहीं ह्मणत होता तरी तूं तो त्याला देवविलास. "

शामभट्ट ह्मणाला--" महाराज, आपण ह्मणतां कीं चित्रकारानें सरोद्याचें सोंग घेतलें होतें तें खरें असावें असें मलाहि आतां वाटूं लागलें आहे. त्या वेळेस त्यानें त्रिपुंड गंध लाविलें होतें, अंगावर वस्त्रांचा भारा घेतला होता, व तोंडानें बडबड करण्याचें काम सुरू केलें होतें, तेवढ्यावरून मला त्यास ओळखितां आलें नसावें. विक्रमराजाला मी शनीच्या तापापासून मुक्त केलें असें सरोदी बोलला होता, यावरून सरोदी चित्रकार असावा असें समजण्यास आधार आहे. परंतु एवढ्यावरून मी जोशी नाहीं, किंवा मला मुहूर्त पाहतां येत नाहीं असें ठरत नाहीं. उत्तम मुहूर्ताचें साधन करून गोपिकाबाईला मीं मोत्यें करून दिलीं, या अद्भुत चमत्काराबद्दल मला अजिक्यपत्र मिळालें पाहिजे, व ही गोष्ट ऐकून आपण तें लवकर द्याल अशी मला खातरी आहे. "

स्वामि ह्मणाले--" बाबारे, आधणाच्या पाण्यांत धान्य वैरून धान्याची मोत्यें झालीं असें तूं समजतोस, ही समज अगदीं खोटी आहे. ज्योतिषाचे फलग्रंथ वाचून व पाठ करून त्यावर तुझा इतका विश्वास बसला आहे कीं ज्योतिषापुढें बाकीचे सर्व ग्रंथ तुला कवडीमोल दिसतात. अशा कारणावरून तूं पुराणांला नांवें ठेविलींस आणि ज्योतिष मात्र खरें आहे असें म्हणालास. ह्याच कारणावरून धान्याचीं मोत्यें करण्याचा तूं आव घातलास. शिजलेलें धान्य सुपांत

ओतल्यावर नरसिंहभट्टास,गोपिकाबाईस व बटोस घुगऱ्या दिसल्या व तुला एकट्याला मात्र मोत्यें दिसलीं. सुपांत घुगऱ्या नाहींत, मोत्यें च आहेत, असें हट्टानें तूं बटोकडून कबूल करून घेऊं लागलास. मार खाण्याच्या भीतीमुळें निरुपायास्तव त्यानें तसें कबूल केल्यावर तूं म्हणालास कीं तीं मोत्यें आहेत असें त्यानें सिद्ध करून दाखविलें तर बरें, नाहीं तर तूं त्याला कडक शासन करशील. अशा संकटांत तूं त्याला पाडिलें असतां त्यानें आपल्या पडशींतून संकाजीकडून आलेलीं मोत्यें काढून घेतलीं व त्यांपैकीं कांहीं ताम्हनांत व कांहीं सुपांत टाकून दिलीं. ही गोष्ट बटोनें शिवाजीपुढें कबूल केली आहे व तुझ्या चरित्रांत लिहिलेली आहे."

हें ऐकून शामभट्टानें बटोकडे पाहिलें तेव्हां तो हात जोडून उभा राहिलेला त्याला दिसला. या गोष्टीस बटोची संमती पडली असें पाहून शामभट्ट निराश झाला व उद्वेगानें बोलला. " आपल्या एकंदर भाषणावरून ज्योतिःशास्त्र खोटें आहे असें ठरवून मला अजिक्यपत्र देऊं नये असें चिन्ह दिसतें, परंतु मी खरा जोशी असेन तर तें मी आपणापासूनच घेईन."

यावर स्वामींनीं उत्तर केलें. " बाबारे, तूं असा रागावून आपल्या डोक्यांत राख घालूं नकोस. ज्योतिःशास्त्र खोटें आहें असें म्हणण्याचा माझा अर्थ नाहीं. सूर्य एक महिन्यानें एक राशी भोगतो, गुरु एक वर्ष, किंवा कांहीं महिने एका राशीस राहतो व शनि अडीच वर्षें राहतो, अमुक दिवशीं ग्रहण लागेल, अशा प्रकारचें गणित खरें आहे व तें प्राणीमात्राच्या

उपयोगाचें आहे. या गणितावरून मुहूर्तग्रंथ लिहिले आहेत. त्यांत जे चमत्कारिक प्रकार वर्णन केले आहेत ते जोशांना खरे करून दाखवितां येत नाहींत व लोकांच्या उपयोगी पडत नाहींत. जो सर्वशक्तिमान् परमेश्वर, जो कर्ताकरविता नारायण, ज्यानें आपल्या इच्छामात्रेंकरून हें जग निर्माण केलें, ज्यानें सूर्यादि नवग्रह उत्पन्न केले, त्याची शक्ति ग्रहांपुढें चालत नाहीं असें तूं लोकांना सांगतोस हें मत मला संमत नाहीं. (भौमक्षेत्रेयदाजीवःषष्ठाष्टसुचंद्रमाः।वर्षेऽष्टमेपिमृत्युर्वैईश्वरोरक्षितायदि॥जन्मलग्नेयदाभौमश्चाष्टमेचबृहस्पतिः। वर्षेचद्वादशेमृत्युर्दैवोवैरक्षितायदि ॥) असे श्लोक म्हणून तूं बटोला सांगितलेंस कीं ईश्वराच्यानें प्राण्याचें रक्षण होणार नाहीं. ईश्वराला अमुक एक गोष्ट करतां येणार नाहीं ही गोष्ट अगदीं खोटी आहे. ज्यानें सूर्यादि नवग्रह उत्पन्न केले त्याला त्यांचें निवारण करतां येणार नाहीं असें ह्मणणें ह्मणजे मीं केलेलें मातीचें चित्र मलाच मोडतां येणार नाहीं या ह्मणण्याप्रमाणें आहे. नवग्रहांपेक्षां देवाची शक्ति कमी आहे असें मी कधींहि कबूल करणार नाहीं. माझा राम समर्थ आहे व तो पाहिजे तें करील, हा माझा पूर्ण विश्वास आहे. रामास कर्ताकरविता ह्मणण्याचें टाकून शनि, गुरु, मंगळ, राहु इत्यादि ग्रहांस मोठेपणा देणें हें मूर्खपणाचें काम आहे. ग्रहांपुढें रामाचें चालत नाहीं असें ह्मणणें ह्मणजे लोखंडापुढें लोहाराचें कांहीं चालत नाहीं असें म्हणण्याप्रमाणें आहे. लोहार लोखंडाला तापवील, वांकवील, त्याचा रस करील, खिळे करील,

त्याला भोंकें पाडील, त्याचे तुकडे करील, पत्रे करील, पाहिजे तें करील, त्याप्रमाणें देवाचें सामर्थ्य आहे. ग्रहांपेक्षां देव श्रेष्ठ आहे ह्यांत संशय नाहीं. त्याच्या इच्छेनें जग चालतें व त्याच्याच इच्छेनें शेवटीं जगाचा नाश होणार आहे. देवाच्या इच्छेपुढें नवग्रहांचें कांहींएक चालत नाहीं. एकट्या रावणानें नवग्रह पालथे घालून त्यांच्या पायऱ्या केल्या व त्यांच्या उरावर पाय देऊन तो चालत गेला, त्या रावणाला माझ्या रामानें मारिलें; आणि त्या रामाला नवग्रहांचें बल हरण करतां येणार नाहीं असें म्हणणें अगदीं वेडेपणाचें नाहीं काय? सर्वांपेक्षां देव मोठा आहे व बलवान् आहे या गोष्टीवर भरंवसा ठेवणें, हेंच ज्ञान मनुष्याच्या फायद्याचें आहे. ग्रहांवर विश्वास ठेवण्याविषयीं तूं लोकांना शिकवितोस हें अहितकारक आहे. यहुदी, पारशी, हपशी, फिरंगी इत्यादि लोक फक्त देवावर विश्वास ठेवून कामें करतात. नवग्रहांला, जन्मपत्रिकेच्या फळाला, द्विदार्शकाला, एकनाडीला, राक्षस, देव आणि मनुष्यगणाला, किंवा दुष्ट शकुनाला ते ओळखीत नाहींत; मुहूर्त पाहून ते लढाईला जात नाहींत, किंवा शनि, मंगळ, गुरु इत्यादि ग्रहांचीं दानें ते करीत नाहींत; तरी त्यांच्यांतील नवराबायकोचा जोडा सुखानें काळ घालवितो, त्यांचे शिपाई जय मिळवितात. त्यांनीं ग्रहांचीं दानें केलीं नाहींत म्हणूनच त्यांस अमुक एक पीडा झाली आहे असेंहि दिसत नाहीं. तर बाबारे, ईश्वरापेक्षां ग्रहांच्या व मुहूर्तांच्या फलावर तूं ज्यास्त विश्वास ठेवूं नकोस व

तसें करण्यास लोकांनाहि शिकवूं नकोस. तूं देवावर विश्वास ठेवून वागत जा म्हणजे तुला नदींत पडावें लागणार नाहीं, शेतकऱ्यांचे हातून मार खावा लागणार नाहीं, शनि पीडा करीत आहे असें भासणार नाहीं व मुलांच्या अगर शिपायांच्या हातून तुझी अप्रतिष्ठा होणार नाहीं. देवापेक्षां ग्रह श्रेष्ठ व मोठे नाहींत असें तूं समज व तसेंच लोकांनाहि शिकवीत जा."

कल्याणानें डोळ्याला पाणी लावल्यावर शामभट्ट शुद्धीवर आला होता तरी जोशांना ज्योतिष सांगतां येत नाहीं व त्याचा उपयोग लोकांना होत नाहीं असें स्वामींनीं म्हटल्यापासून त्याचें डोकें पुन्हा फिरूं लागलें होतें. भक्तिमार्ग श्रेष्ठ आहे व ज्योतिषमार्ग कनिष्ठ आहे या बोलण्याचा त्याला राग आला व तो आपल्या पूर्व स्थितीवर येऊन मोठ्यानें बोलूं लागला— "हें तुमचें ब्रह्मज्ञान व्यर्थ आहे असें मी समजतों. सूर्य, चंद्र, शुक्र, मंगळ इत्यादि ग्रह आपणास स्पष्ट दिसतात. सूर्य उगवला म्हणजे तो सर्व पृथ्वीवर उजेड पाडतो, चंद्र उगवला म्हणजे चांदणें पडतें; शुक्राच्या पहांटच्या प्रकाशांत वाटसरू लोक रस्त्यानें चालत जातात; अशा प्रकारें बलिष्ट ग्रहांचा उपयोग प्रत्यक्ष होत असून देवापेक्षां ग्रह श्रेष्ठ नाहींत असें म्हणणें अगदीं अल्प समजुतीचें काम आहे. सूर्य, चंद्र दिसतात त्याप्रमाणें तुमचा देव आकाशांत दिसत नाहीं किंवा पृथ्वीवर ऊन किंवा चांदणें पाडीत नाहीं. सूर्यादि ग्रहांचा असा प्रत्यक्ष रीतीनें प्राणिमात्रांस उपयोग होत असून त्यांचीं शुभाशुभफलें प्राण्यांस

भोगावीं लागत नाहींत हें म्हणणें मी कधींहि कबूल करणार नाहीं. "

यावर स्वामि म्हणाले—" बाबारे, तूं फक्त फलज्योतिषाविषयींचे ग्रंथ वाचले आहेस म्हणून तुला हा भ्रम झाला आहे. तूं जुने ग्रंथ पहाशील तर तुला असें दिसून येईल कीं, नवग्रह, राशी व नक्षत्रें यांचीं शुभाशुभ फलें वैदिककाळीं लोक मानीत नव्हते. ज्योतिषाच्या सिद्धांतग्रंथांतहि शुभाशुभ फलांचा उल्लेख केलेला तुला आढळणार नाहीं. सिद्धांत ग्रंथांच्या काळानंतर ही सर्व रचना झालेली आहे व ह्या वेड्या समजुतीचा बराच भाग यवनी ग्रंथांतून घेतलेला आहे. दूरस्थ राशी व नक्षत्रें ह्यांचा संबंध प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या चरित्राशीं असावा असें प्रथम दर्शनीं मानणें सयुक्तिक नाहीं. सूर्यचंद्राच्या शक्तीचे परिणाम जसे पृथ्वींतील जड सृष्टीवर घडतात तसे नवग्रहांचे

---

१ ग्रहांचा संबंध मनुष्याच्या कृत्याशीं पोहोंचत नाहीं असें कैलासवासी विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांनीं स्पष्ट ह्मणून दाखविलें आहे. ते ह्मणतात—" या भूतलावर क्षणमात्र इतस्ततः संचार करणारा जो कीटकप्राय मनुष्य त्याच्या भातकुलीसारख्या चुटपुट्या गृहकृत्यांचा आणि आकाशांत फिरणाऱ्या ग्रहनक्षत्रादिकांचा बिलकुल संबंध नाहीं. यास्तव त्यांच्या योगायोगांचा त्यानें हर्षही मानूं नये व विषादहि मनांत बाळगूं नये. गिरणींत काम करणाऱ्या मनुष्याचें बरेंवाईट होणें हें जसें भोंवतालीं फिरणाऱ्या शेंकडों चाकांच्या गतीवर नाहीं * * * त्याचप्रमाणें मनुष्याची या भूगोलावर स्थिति आहे. आकाशांत फिरणारीं तेजें हीं त्याच्या कल्याणाविषयीं अगर अकल्याणाविषयीं केवळ उदासीन होत. " निबंधमाला, भाग १, लोकभ्रम, ज्योतिष, कलम ८ वें पहा.

व राशींचे परिणाम मनुष्यप्राण्यांवर कां घडूं नयेत असें प्रतिपादन करणें ह्मणजे सृष्टिक्रमाचे पदार्थ-ज्ञानाचा अभाव आहे असें कबूल करणें होय. ग्रहांचे व राशींचे परिणाम खरोखर घडते तर सर्व पृथ्वींतील प्राण्यांवर ते एकसारखे एकदम घडते. एकास एक व दुसऱ्यास दुसरा असे अनेक अनुभव आले नसते. बाबारे, कार्यकर्तृत्व एका परमेश्वराकडे आहे व त्यानें कांहीं अंशानें ही गोष्ट मनुष्याच्या स्वाधीन ठेविली आहे. जगनियंत्या परमेश्वराचा अधिकार नवग्रह व राशी यांजकडे आहे अशी कल्पना करणें शुद्ध वेडेपण आहे. "

हें ऐकून शामभट्ट ह्मणाला---" आपण 'परमेश्वर' ह्मणतां तो आहे कोठें ? त्यानें तर कलियुगांत बौध्यरूप धारण केलें आहे. तसें ग्रहांनीं केलें नाहीं; ग्रह मूर्तिमंत दिसत आहेत. ग्रहांवर आजपर्यंत ज्या लोकांनीं विश्वास ठेविला ते सर्वच मूर्ख होते असें ह्मणतां येणार नाहीं. कलीच्या माहात्म्याप्रमाणें तुह्मांला कुबुद्धि उत्पन्न झाली आहे व ज्योतिषाविषयींचे चमत्कार खोटे वाटूं लागले आहेत. ज्योतिषफळ रसभरित आहे. चमत्कारचिंतामणि या ग्रंथांत जन्मलग्नाचीं व द्वादश स्थानांची फळें सांगितलीं आहेत. केशवी, ग्रहलाघव, बृहज्जातक व कालामृत या ग्रंथांत जातकाविषयीं व ग्रहांच्या फलाविषयीं वर्णन आहे. मुहूर्तचिंतामणींत मुहूर्त सांगितले आहेत. अमुक मनुष्य अमुक प्रकारचा निघेल, तो धर्महीन, कुबुद्धि, राजास आवडता, कुलदीपक अगर धनवान् होईल ह्या गोष्टी ज्याच्या

त्याच्या जन्मकालच्या ग्रहांवरून समजतात. नवरा-नवरीच्या जन्मकुंडलीवरून व नक्षत्रराशीवरून दोघांचें जमेल किंवा नाहीं हें ठरवितां येतें. मुलाला किंवा मुलीला वाईट ग्रह आला असल्यास त्याची शांति करतां येते, दान करतां येतें किंवा जप करतां येतो. मूल अल्पायुषी मरेल असा योग आला असल्यास शांति, दान, जप या प्रकारानें त्याचें आयुष्य वाढवितां येतें. ग्रह प्रतिकूल आल्यास त्याला अनुकूल करून घेतां येतें. अशा प्रकारें फलज्योतिषाचा उपयोग होत असतां ज्योतिष उपयोगाचें नाहीं, देवाची भक्ति करणें उपयोगाचें आहे, असें तुम्ही म्हणतां हें व्यर्थ आहे. जसा राजा आपल्या प्रधानाच्या हातीं राज्यकारभार सोंपवितो त्याप्रमाणें बौध्यरूपी देवानें सर्व कारभार ग्रहांच्या स्वाधीन केला आहे. ग्रहांची शांति, जप अगर दान केलें नाहीं व नवरानवरींचीं टिपणें पाहिल्याशिवाय लग्नें केलीं तर लोकांचे घातपात होतील व चांगली संतति होणार नाहीं. कुतुबशाहा, अदिलशाहा, निजामअल्ली व मोंगल ह्या यवनी राजांच्या फौजा येऊन त्यांनीं वारंवार ब्राह्मणांचा नाश केला, गांवें लुटलीं, बायका नेल्या, मुलें मारून टाकलीं, परंतु ज्योतिषाच्या सहाय्यानें इतक्याहि संकटांतून ब्राह्मण पार पडले व त्यांचा बीमोड झाला नाहीं. ज्योतिषाप्रमाणें ते वागले नसते तर आज एकहि ब्राम्हण उरला नसता. स्वामि महाराज, मीं तुम्हांला आतां निरुत्तर केलें आहे. मला आतां अजिंक्यपत्र द्या. "

शामभट्टाच्या बोलण्यांत अडथळा न करतां त्याचें सर्व बोलणें स्वामींनीं ऐकून घेतलें. ज्योतिषाच्या फलाविषयीं शामभट्टाला पक्का भ्रम झाला आहे त्याचें निरसन करावें असें स्वामींच्या मनांत येऊन त्यांनीं उत्तर केलें. " बाबारे, तूं म्हणतोस त्याप्रमाणें देवानें आपला कारभार ग्रहांच्या स्वाधीन केला नाहीं, किंवा देवानें तो सोडला नाहीं. देवाची इच्छा सर्वांहून श्रेष्ठ आहे. जोशानें नवरानवरींचीं टिपणें जुळवून छत्तीस गुण उतरले असें सांगितलें तरी नवरी विधवा झाल्यावांचून राहात नाहीं, किंवा नवराबायको सुखानें नांदत नाहींत अशा गोष्टी घडतात. या गोष्टींमध्यें देवाची इच्छा बलवत्तर दिसते. उत्तम मुहूर्त पाहिला असला तरी कार्यभंग होतो, यांतहि देवाचीच इच्छा दृष्टीस पडते. ब्राम्हणेतर जातींत प्रीतिविवाह होतात व नवराबायको सुखानें राहतात व त्यांना संतति होते, ही ईश्वराचीच इच्छा आहे. त्याच्या इच्छेवांचून झाडाचें पान सुद्धां हालत नाहीं असें म्हणतात तें खरें आहे. केवळ ज्योतिषाच्या साहाय्यानें ब्राम्हण जिवंत राहिले आहेत व इतर मनुष्यें मरण पावलीं आहेत अशी गोष्ट घडलेली नाहीं. ग्रहांच्या आधीन ईश्वराची इच्छा नाहीं. ती स्वतंत्र आहे, म्हणूनच ग्रहांचें फळ येत नाहीं. ग्रहांचे योग, स्वप्नें आणि अपशकुन यांचें फळ केवळ काकतालीय न्यायानें घडतें, म्हणून त्यावर विश्वास ठेवूं नये. ईश्वर

१ ग्रहाणांचरितंस्वप्नोऽनिमित्तोत्पादकंतथा । फलंति काकतालीयंतेभ्यःप्राज्ञानविभ्यति । [वेणीसंहार नाटक.]

कर्ताकरविता आहे म्हणूनच जन्मनक्षत्राचा, एकनाडीचा, कुमुहूर्ताचा किंवा दुष्ट शकुनाचा दोष घडत नाहीं. याकरितां ग्रहांना खरें मानण्यापेक्षां देवाला खरें मानावें हें बरें आहे. देवाच्या इच्छेनें ग्रह नाश पावणारे आहेत. देव अमर, अविनाशी, अचिंत्य, अतर्क्य, साक्षीभूत, सर्वशक्तिमान् असा आहे. तुला जें ज्ञान झालें आहे तें संशयानें भरलें आहे. संशयास ज्ञान म्हणूं नये, अशाविषयीं मी आपल्या दासबोधांतील तुला ओंव्या[1] म्हणून दाखवितों, त्या तूं नीट लक्ष्य देऊन ऐक. जंव तें ज्ञान नाहीं प्रांजळ। तंव सर्व कांहीं निष्फळ। ज्ञानरहित तळमळ। जाणार नाहीं॥१॥ ज्ञान म्हणतां वाटे भ्रम। कायरे बा असेल वर्म। म्हणूनि हा अनुक्रम। सांगिजेल॥ २॥ भूत भविष्य वर्तमान। ठाउकें आहे परिच्छिन्न। त्यासीच म्हणिजेलें ज्ञान। परि तें ज्ञान नव्हे॥ ३॥ अमुक ग्रह अमुक ठिकाणीं पडला ह्मणजे अमुक फळ होईल, हें संशयाचें सांगणें आहे. कारण तसें घडणें किंवा न घडणें हें ईश्वराधीन आहे. तूं नदींत पडून बटोच्या हातून मार खाल्लास ह्याचें कारण बटोनें आपलें डोकें दाराबाहेर केलें नव्हतें असें तूं म्हणतोस, परंतु घोडें मिळाल्याबरोबर तें सुलग्नीं निघाल्यानें मिळालें तसेंहि तूं ह्मणतोस. एवंच, तुलाच जर संशयानें सोडिलें नाहीं तर तूं लोकांवर काय उपकार करणार आहेस हें स्पष्ट कळतें. तूं नवरानवरीच्या पत्रिका जुळवून दिल्यावर एखादी वाईट गोष्ट घडली ह्मणजे 'जन्मकाळ चुकला

१ दासबोध, पंचमदशक, पंचमसमास, यांत ह्या ओंव्या आहेत.

होता, पापग्रहांची दृष्टि होती, किंवा मुलीला पापग्रह पडले होते ' असें सांगून तूं आपलें व लोकांचें कसें-तरी समाधान करूल देतोस; असले संशय नाहींसे झाले पाहिजेत. संशयरहित जी विद्या तिला ज्ञान म्हणावें. याविषयीं तुला प्रमाण सांगतों तें तूं नीट लक्ष्यांत आण. संशयरहित जें ज्ञान । तेंचि साधूंचें लक्षण। सिद्धा अंगीं संशयो जाण। लागेल कैसा॥१३॥ संशयाचें ज्ञान खोटें। संशयाचें वैराग्य पोरटें। संशयाचें भजन खोटें। निष्फळ होय ॥ १४ ॥ व्यर्थ संशयाचें जिणें। व्यर्थ संशयाचें धरणें। व्यर्थ संशयाचें करणें। सर्व कांहीं ॥ १५ ॥ व्यर्थ संशयाची पोथी। व्यर्थ संशयाची व्युत्पत्ति। व्यर्थ संशयाची गति। निश्चयें वीण२० तनुस्थानीं शनि आहे तो अति दुःख देणारा आहे. धनस्थानीं शुक्र आहे तो धनप्राप्ति करून देणारा आहे. अशा प्रकारचीं वचनें तुला संशय उत्पन्न करीत आहेत. या संशयामुळें तुला ताप आला असतां तूं भर ज्वरांत हजामत केलीस व रघुनाथरावाचें कुष्ठांग असून तुला तें दिव्यांग दिसलें ! तुला ताप आला होता तेव्हां जर बटोनें व चिट्कंभट्टानें उपचार केले नसते तर तूं तत्काळ मरण पावला असतास. बाबारे, आपल्या उद्योगाचें व कर्माचें फळ देव आपणास देईल असा मनांत निश्चय धरून तूं शुद्ध मार्गानें आचरण करीत जा. देवाची भक्ति केल्यानें व विचारयुक्त वागल्यानें तुझें कल्याण होईल. ''

१ दासबोधांतील पंचमदशकांतील दहाव्या समासांत वरील आव्या आहेत.

ज्योतिषाच्या नादानें शामभट्ट बिघडला आहे असें जाणून स्वामींनीं शामभट्टास जोशीपणाचा धंदा सोडून देण्याविषयीं आज्ञा केली. ते म्हणाले—"बाबारे, ज्योतिःशास्त्राच्या अति अभ्यासामुळें तुला संशयानें घेरलें आहे, म्हणून तूं तो अभ्यास सोडून दे. ज्योतिषांत संशय बरेच आहेत, एक ग्रंथकार म्हणतो कीं 'चरलग्नेप्रयातव्यं,' म्हणजे मेष, कर्क, तूळ आणि मकर हीं लग्नें गमनास उक्त आहेत. दुसरा म्हणतो छे, छे. तसें नाहीं—'लग्नेकार्मुकमेषतौलिगमनेकार्येविलंबोनृणां ॥' मेष किंवा तूळ लग्नावर गेलें असतां कार्य उशीरानें होईल. 'उषःप्रशंसतेगर्गः' गर्ग ऋषि सांगतात कीं लग्न मुळींच पाहूं नये. सकाळीं उठावें आणि चालूं लागावें. 'शकुनंचबृहस्पतिः' जोशांमध्यें कोणी बृहस्पति नांवाचा गृहस्थ होऊन गेला, तो म्हणतो कीं शकुन पाहून जावें. 'अंगिरामनउत्साह.' अंगिरा ऋषीचें मत असें आहे कीं मुहूर्त पाहूं नये किंवा शकुन पाहूं नये; मनाच्या उत्साहकालीं गमन करावें. 'विप्रवाक्योजनार्दनः' जनार्दन जोशी म्हणतात कीं हें सर्व लटिकें आहे; ब्राह्मणाची आज्ञा घेऊन खुशाल गांवाला जावें. अशा प्रकारचीं अनेक विरुद्ध मतें ज्योतिषांत आहेत. उदाहरणार्थ मीं तुला हीं कांहीं दाखविलीं. अशा भिन्न मतांमुळें ज्याला स्वतःचा निश्चय नाहीं त्याला तुझ्यासारखा भ्रम होणें कांहींएक कठिण नाहीं. ज्या विद्येनें तुला भ्रम झाला आहे ती विद्या तूं टाकून दे."

ज्योतिषांत अगदीं हलकट व हुच्च प्रकार सांगि-

तले आहेत अशी शामभट्टाची खातरी करून देण्याकरितां स्वामि आणखी म्हणाले—" बाबारे, सभ्य मनुष्याला प्राकृत भाषेंत तोंडानें उघड बोलतां येणार नाहींत असले चावटपणाचे प्रकार ज्योतिषांत वर्णन केले आहेत. ते सांगण्याची मला लाज वाटते, परंतु ते तुला कळावे व तुला शहाणें करावें एवढ्याचकरितां मी नुसते श्लोक तुला म्हणून दाखवितों. त्यांचा अर्थ करून त्यांतील हलकटपणा मला सांगवत नाहीं. ' शोणितंबिंदुमात्रेणस्वैरिणीचाल्पशोणिता । रक्तेरक्तेभवेत्पुत्रोकृष्णेचैवमृतप्रजा ॥ पिच्छलीचभवेद्वंध्याकाकवंध्याचपांडुरे । पीतेदुश्चारिणीज्ञेयासुभगागुंजसादृशे ॥ नीलांबरधरानारीविधवापुष्पवत्यपि। भोगिनीपीतवस्त्राच ' रामराम! मला पुढचे श्लोक म्हणवत नाहींत. असे श्लोक ज्या ग्रंथांत आहेत त्या ग्रंथांना पवित्र म्हणूं नये. हा हलकटपणा आहे. असल्या कुतर्कापासून गरीब बायकांची उगीच विटंबना मात्र होते. बाबारे, हें निंद्यकर्म, हें पातक आहे. "

असें बोलतांना स्वामींचे डोळे लाल झाले व त्यांच्या तोंडावर इतकें तीव्र तेज आलें कीं शामभट्ट, बटो, रंगोपंत व शिपाई हे भयानें थरथर कांपूं लागले. नंतर शामभट्टाची भ्रांति अगदीं नाहींशी करावी असा वि-

---

१. भूतभविष्यवर्तमान सांगणारे जोशी ह्यांजविषयीं साधु तुकारामबोवा यांनीं आपला तिरस्कार दाखविला आहे. त्यांचें म्हणणें पुढील अभंगांत दिलें आहे—भूतभविष्यवर्तमान ॥ सांगो जाणती शकुन ॥ १ ॥ पाहो नावडती डोळां ॥ आम्हा तयांचा कंटाळा ॥ २ ॥

चार स्वामींच्या मनांत येऊन त्यांनीं कृपाळु होऊन कल्याणास आज्ञा केली कीं " शामभट्टाच्या पाठीवर एकदां ही माझी कुबडी मार म्हणजे त्यास लागलेलें वेड नाहींसें होईल. " कल्याणानें तसें केलें तेव्हां शामभट्ट गर्भगलित होऊन स्वामींच्या पायांवर जाऊन पडला आणि म्हणाला—" गुरु महाराज, आपल्या उपदेशानें माझ्या मनांतला संशय फिटला आहे व माझें वेड नाहींसें झालें आहे. मी आपला मुलगा आहें, मी आपला शिष्य, सेवक, आहें. मला दीक्षा द्यावी; मी ती घेण्यास तयार आहें. कृतापराधाची मला क्षमा करावी. "

शामभट्टाला उपरति झाली आहे व त्याचें वेड नाहींसें झालें आहे तरी दीक्षा घेण्यास तो अजून योग्य झाला नाहीं असें समजून स्वामि म्हणाले. " आजपासून एक वर्षपर्यंत तूं शुद्धीवर राहिलास व चमत्कार करण्याचें सोडून दिलेंस तर मग मी तुला मंत्रोपदेश करीन. तुला भ्रमणांत पाडणारी विद्या तूं अगदीं सोडून दे. आपल्या घरीं माघारा जा आणि देवावर विश्वास ठेवून पोट भरण्याकरितां अन्य उद्योग कर. "

शामभट्ट म्हणाला—" महाराज, मला वतनवाडी नाहीं. मीं आपलें आयुष्य ज्योतिष पढण्यांत घालविल्यामुळें मला दुसरा धंदा करतां येणार नाहीं, व दुसरा धंदा शिकण्याचे माझे दिवस राहिले नाहींत. माझ्या निर्वाहाची आपण सोय करून द्याल तर मात्र

मला आपण सांगतां तसें करतां येणार आहे. मग मी जोसपणाचा धंदा सोडून देईन. ”

जोशीपणाच्या कामांत बटोला संसारापुरतें द्रव्य मिळत नव्हतें व लोकांकडून त्याचा अपमान होत होता या दोन कारणांसाठीं आपली वृत्ति सोडून बटो शामभट्टाजवळ राहिला होता हें आपणांस या पुस्तकाच्या आरंभीं कळलें आहे. आपली गरीबी स्वामींच्या कानावर घालावी या हेतूनें बटोनेंहि शामभट्टाप्रमाणेंच स्वामींला विनंति केली. तेव्हां स्वामींनीं कृपाळु होऊन प्रत्येकास दहा बिघे जमीन इनाम देवविण्याचें कबूल केलें. स्वामि म्हणाले— “ चिंचवड व कोथरूड हीं गांवें शिवबाच्या जहागिरीपैकींच आहेत; मी त्यास या कारकुनाबरोबर पत्र लिहून पाठवितों व तुमच्या संसाराची सोय करून देतों. जोशी, याज्ञिक व वैदिक या लोकांना सरकारांतून वेतन नसल्यामुळें त्यांना लोकांजवळून द्रव्य मिळवावें लागतें. ‘मी जोशी आहें, मी याज्ञिक आहें, किंवा मी वैदिक आहें,’ असें म्हटल्यानें लोक थोडेच आपल्या खिशांतून पैसे काढून त्यांच्या हातावर पटकन् ठेवितील? चमत्काराशिवाय नमस्कार सुद्धा कोणी करीत नाहीं, याकरितां ‘तुला साडेसाती आली आहे, त्यांतून मी तुला मुक्त करीन’ अशा प्रकारचें अभयवचनें देऊन जोशांला, याज्ञिकांला किंवा वैदिकांला द्रव्य मिळवावें लागतें. त्यांच्या उपदेशामुळे कर्ममार्ग इतका पसरला आहे कीं खऱ्या देवाला व खऱ्या भक्तीला लोक विसरून गेले आहेत व नवग्र

हांची पूजा करूं लागले आहेत. खरें पहातां नवग्रह सप्तऋषि, षोडशमातृका इत्यादि देव नाहींत. देव कोणाला म्हणावें तें मी तुला सांगतों. ऐक—ठायीं ठायीं देव असती । तिहीं केली नाहीं क्षिती । चंद्रसूर्य तारा जीमूती । तैयांचेनि नव्हे ॥ २३ ॥ जेणें केल्या मेघमाळा । चंद्रबिंबीं अमृतकळा । तेज दिधलें रविमंडळा । तया नांव देव ॥ २० ॥ चंद्र सूर्यादि नवग्रह, षोडशमातृका वगैरे, यांहून देव निराळाच आहे. पुण्याहवाचन, नांदीश्राद्ध, प्रायश्चित्त कृच्छ्रें, होमहवन इत्यादि केवळ कर्में केल्यानें त्या देवाची प्राप्ति होईल असें तूं समजूं नकोस. नवग्रहांचीं दानें केल्यानें किंवा पत्रिका पाहिल्यानें ईश्वर संतोष पावेल असेंहि समजूं नकोस. रघुनाथ स्मरोन कार्य करावें । तें तात्काळचि सिद्धि पावे । कर्ता राम हें असावें । अभ्यंतरीं ॥ ३३ ॥ जो जगन्नियंता परमेश्वर त्याला तूं मनोभावें करून भक्तीनें नमस्कार कर, म्हणजे तूं त्याला आवडता होशील. सर्व धर्मांचा त्याग करून त्या एका देवाला अनन्यभावानें तूं शरण जा म्हणजे तुझ्या सर्व पापांचा नाश होऊन तूं मोक्षाला जाशी-

---

१ त्यांनीं हें जग—ब्रह्मांडगोल—उत्पन्न केलें नाहीं. दासबोध, आठवा दशक, पहिला समास, यांत वरील ओंव्या सांपडतात.

२ एवं सकळांमध्यें थोर । तो एकचि परमेश्वर । तयामध्यें हरिहर । होती जाती ॥ २० ॥ दासबोध, सहावें दशक, समास चौथा, यांत ही ओंवी आहे.

३ दासबोध दशक ६ समास ७ वा.

ल. हें भगवद्गीतेंतील सार तुला सांगितलें आहे."

शामभट्ट आधींच शुद्धीवर आला होता, नंतर ह्या उपदेशानें तो पुन्हा स्वामींच्या पायां पडून त्यांच्या अद्भुत शक्तीची प्रशंसा करूं लागला. त्यांचें सर्व म्हणणें त्यानें कबूल केलें. आतां तो अजिक्यपत्र घेण्याची गोष्ट सुद्धां काढीत नाहीं असें पाहून स्वामींनीं सर्वांस आपापल्या ठिकाणीं जाण्याविषयीं परवानगी दिली. शामभट्ट जाऊं लागला तेव्हां स्वामि आणखी म्हणाले. "पहारे बुवा, मीं केलेला उपदेश तूं पक्का ध्यानांत ठेव. कुमुहूर्त, कुवेळा, आठवा मंगळ, बारावा शनि इत्यादि अहितकारक गोष्टी सांगून तूं लोकांना निरुत्साह करूं नकोस व लोकांच्या कार्यांत विघ्नें आणूं नकोस. लोकांना भक्तिमार्गाला लावून उत्साहबुद्धि उत्पन्न करावी आणि उद्योगी करावें एतदर्थ मी प्रयत्न करीत आहें. मीं सांगितलेली गोष्ट सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखी आहे."

अशा प्रकारें स्वामींची आज्ञा झाल्यावर शामभट्ट आणि बटो चिंचवडास परत जाण्याकरितां निघाले. घरीं पोहोंचेतोंपर्यंत शामभट्ट कोणाच्या घरीं उतरला नाहीं, किंवा कोणाशीं बोलला नाहीं. घरीं गेल्यावर काय हकीगत घडली ती पुढच्या प्रकरणांत दिली आहे.

रंगोपंतावरोबर स्वामींनीं शिवाजीच्या पत्राचें उत्तर

---

१ मन्मनाभावमद्भक्तोमद्याजीमांनमस्कुरु ॥ मामेवैष्यसिसत्यंतेप्रतिजानेप्रियोसिमे ॥ ६५ ॥ सर्वधर्मान्परित्यज्यमामेकंशरणंव्रज ॥ अहंत्वासर्वपापेभ्योमोक्षयिष्यामिमाशुचः ॥ ६६ ॥ श्री भगवद्गीता. अध्याय १८ वा.

पाठविलें व शामभट्टाचे चरित्रांत शेवटपर्यंत झालेली हकीकत लिहून तेंहि परत केलें. त्या वेळेस छापखाने नव्हते म्हणून शामभट्टाच्या चरित्राच्या प्रति झाल्या नाहींत व तें सर्वांना वाचण्यास मिळालें नाहीं. शामभट्ट व बटो या प्रत्येकास मौजे चिंचवड व मौजे कोथरूड येथील दहा बिघे जमीन द्यावी अशाविषयीं स्वामींनीं पत्रांत मजकूर लिहिला होता. त्या पत्राची नक्कल येथें देण्याची जरूर वाटली नाहीं म्हणून दिली नाहीं. शामभट्ट व बटो यांस लवकरच जमिनी मिळून हर्ष झाला हें पुढल्या प्रकरणावरून कळेल.

प्रकरण तेविसावें.

शामभट्ट परत घरीं आल्यावर लक्ष्मीला जो आनंद झाला त्याचें वर्णन मला करतां येत नाहीं. सूर्योदय झाल्यावर जशीं कमळांचीं फुलें उमलतात त्याप्रमाणें तिचें तोंड प्रफुल्लित दिसूं लागलें. दिवाळीच्या सणाचे दिवस रडण्यांत व दुःखांत गेले होते व घरीं कांहींच सामान आणिलेलें नव्हतें, हें जाणून बटोनें आपली पडशी उघडली आणि लक्ष्मीला जें सामान लागत होतें तें बाजारांतून आणून दिलें, व ती स्वयंपाक करण्याच्या कामाला लागली. लक्ष्मीला पाहून शामभट्टासहि आनंद झाला, व तिजकडे घटकाभर टकमका पाहून त्यानें यथेच्छ नेत्रसुख घेतलें. त्या काळीं नवराबायको ह्यांनीं दिवसास गप्पा मारीत बसण्याचा शिष्टसांप्रदाय नव्हता. जरी प्रत्येकास एकमेकांचें हितगुज विचारण्याची व ऐकून घेण्याची उत्कंठा होती व बटो बाजारांत गेल्यामुळें जरी तीं उभयता एकटीं होतीं तरी "कां, बरें आहेना ?" या शब्दांशिवाय शामभट्ट कांहीं जास्त बोलला नाहीं, आणि "बरें आहे" या शब्दांपलीकडे लक्ष्मीनें उत्तर दिलें नाहीं. ही जुनी चाल हल्लींच्या कांहीं लोकांस कशीशीच वाटेल खरी, परंतु शामभट्ट किंवा लक्ष्मी यांपैकीं कोणींच 'ती चाल वाईट आहे' असें म्हटलें नाहीं. आपण आपल्या प्रियपत्नीचा योग्य समाचार घेतला असें समाधान शामभट्टाला झालें, आणि आपल्या नवऱ्याच्या प्रश्नास मीं योग्य

उत्तर दिलें असें लक्ष्मीला वाटलें. तथापि एकमेकांचें हितगुज ऐकण्याविषयींची लालसा एवढ्यावर तृप्त झाली होती असें नाहीं; दिवस केव्हां सरेल आणि आपण यथेच्छ केव्हां बोलूं असें उभयतांस झालें होतें.

शामभट्ट परत घरीं आला अशी बातमी गांवांत पसरल्याबरोबर गांवचे लोक त्याच्या घरीं येऊं लागले. थोड्याच वेळानें त्याच्या ओसरीवर मनुष्यांची गर्दी झाली. शामभट्ट बरेच दिवस गांवीं नसल्यामुळें पुष्कळांचीं कामें खोळंबून राहिलीं होतीं. कोणाच्या मुलाचे कान टोंचण्याचे राहिले होते, कोणाला पत्रिका तयार करावयाच्या होत्या, कोणाला आपल्या मुलीस नवरा पाहून ठेवण्याचा होता, कोणाला शनि, राहु, मंगळ इत्यादि ग्रहांचीं दानें करण्याचीं होतीं, कोणाला घर बांधण्याकरितां मुहूर्त पाहण्याचा होता, अशीं अनेक कामें शामभट्टाच्या येण्यावर तहकूब राहिलीं होतीं, व लोक शामभट्टाची वाटच पहात होते. पूर्वी दिलेल्या मुहूर्तांचा व पाहिलेल्या घटिताचा गुण आला नाहीं म्हणून कित्येकांस पुन्हा प्रश्नहि करावयाचे होते, परंतु शामभट्टाची स्नानसंध्या व भोजन व्हावयाचें होतें म्हणून त्याच वेळेस त्याला कोणी प्रश्न केले नाहींत व शामभट्टहि कोणाशीं ज्योतिषासंबंधीं बोलला नाहीं. शामभट्टाचें स्वागत केल्यावर भोजनोत्तर जमण्याच्या इराद्यानें सर्व लोक आपापल्या घरीं गेले.

प्रातःकाळच्या प्रहर घटकेच्या सुमारास शामभट्ट घरीं येऊन पोहोंचला हें या गोष्टीवरून आपणांस क-

ळलेंच असेल. सर्व लोक निघून गेल्यावर शामभट्टानें आपलें आन्हिक कर्म सारिलें व बटोची स्नानसंध्या झाली तेव्हां लक्ष्मीनें दोघांचीं ताटें वाढिलीं आणि ते दोघे भोजनास बसले. रामदासस्वामींची आज्ञा घेऊन निघाल्यापासून शामभट्ट कोणाच्या घरीं उतरला नव्हता हें मागच्या प्रकरणाच्या शेवटीं सांगितलेंच आहे. सूर्योदय होण्यापूर्वी शामभट्ट आणि बटो बाट चालत असत व दोन प्रहर झाले ह्मणजे कोठेंतरी सावली व पाणी पाहून एक भाताची तपेली उकडून ते जेवीत असत, व संध्याकाळ होऊन अंधार पडण्याच्या सुमारास एखाद्या देवळाच्या पडवींत अगर कोणाच्या ओट्यावर ते झोंप घेत असत. अशा प्रकारें प्रवास केल्यामुळें त्यांस चारी ठावांचें जेवण इतके दिवस मिळालें नव्हतें, तें आज मिळालें. तें त्यांस फार गोड लागलें. जों जों शामभट्ट मिटक्या मारून आवडीनें जेवूं लागला तों तों लक्ष्मीला आपण केलेल्या स्वयंपाकाची धन्यता वाटूं लागली.

भोजन झाल्यावर शामभट्ट आणि बटो ओसरीवर येऊन बसले. रामदासस्वामींची आज्ञा घेतल्यापासून दोघांमध्यें वर्णन करण्यासारखें भाषण झालें नव्हतें. "कुमुहूर्त, कुवेळा, आठवा मंगळ, बारावा शनि इत्यादि अहितकारक गोष्टी सांगून लोकांना निरुत्साह करूं नकोस व लोकांच्या कार्यांत विघ्नें आणूं नकोस" अशा प्रकारें स्वामींनीं केलेली आज्ञा अमलांत कशी आणावी ह्या विचारांत शामभट्ट पडला होता. "प्रश्न विचारण्यासाठीं लोक मजकडे आल्यावर मीं त्यांना

नाहीं कसें सांगावें ? लोकांना मीं मुहूर्त दिले नाहींत तर त्यांचीं कामें कशीं होतील ? नवरानवरीच्या पत्रिकांवरून किंवा नांवांवरून मीं छत्तीस गुण मिळविले नाहींत; मंगळ चांगला आहे किंवा वाईट आहे तें पाहिलें नाहीं; एकनाड, द्विर्द्वादश, षडाष्टक इत्यादि दोष दाखविले नाहींत, तर नवराबायकोचा उत्तम जोडा जमणार नाहीं. अनिष्ट ग्रहांचें दान घेतलें नाहीं अगर जप केला नाहीं तर लोक पटापट मरून जातील व ब्राह्मण बियाला उरणार नाहीं." अशा प्रकारचे विचार त्याच्या मनांत घोळत होते. आपण मोठ्या संकटांत पडलों आहों असें त्यास वाटत होतें, या कारणामुळें बटोशीं बोलण्याकरितां त्याला फुरसत सांपडली नव्हती. अहोरात्र त्यानें या विचारांत घालविले. स्वामींची आज्ञा मोडण्याचा त्याला एकदम धीर होत नव्हता, तथापि जोशाचें काम बजावल्यावांचून आपण फार दिवस जगणार नाहीं व जगांतील व्यापार चालणार नाहींत अशी भीति त्यास वाटत होती. सरतेशेवटीं त्यानें असा निश्चय केला कीं, कांहीं दिवस धीर धरून व स्वामींच्या आज्ञेप्रमाणें वागून जगांतील व्यापार सुरळीत रीतीनें कसे चालतात तें पाहूं. भोजनोत्तर ओसरीवर येऊन बसल्यावर शामभट्टानें हा निश्चय केला. तो म्हणाला—" बटो, स्वामींच्या आज्ञेप्रमाणें निदान एक वर्ष तरी मला स्वस्थ बसून रहावें लागणार आहे. तोंपर्यंत मी ज्योतिषाची पोथी सुद्धां उघडणार नाहीं व तुला शिकविणार नाहीं. आपल्या मुलाबाळांजवळ जाऊन राहण्याची तुझी इच्छा असल्यास तूं

आपल्या घरीं जाऊन रहा. मी तुला बोलावणें पाठवीन तेव्हां तूं पुन्हा आलास तर राहिलेलें अध्ययन मी पूर्ण करून देईन."

रामदासस्वामींचा उपदेश ऐकिल्यापासून बटोला घरीं जाण्याची व मुलाबाळांस पाहण्याची घाई झाली होती, परंतु घरीं गेल्यावर जोसपणाच्या गांवांत आपला मान कसा राहील व आपणास पैसा कसा मिळेल ही काळजी त्याला वाटत होती. तो म्हणाला—"आपली अवज्ञा करावी अशी माझी प्राज्ञा नाहीं, परंतु 'करूं गेलों काय आणि वरतीं झाले पाय' या म्हणीप्रमाणें माझी अवस्था झाली आहे. आपल्याजवळ कांहीं दिवस राहून मीं कीर्ति संपादन करावी व माझ्या वृत्तीच्या गांवकऱ्यांनीं मला सन्मान द्यावा व मीं द्रव्य मिळवावें ही मला बळकट आशा होती, तिची निराशा झाली."

बटो असें बोलतो आहे तों शिवाजीतर्फे जो मोकासदार मोकाशाचें काम पहात होता त्याचें पत्र घेऊन चिंचवडचा कुळकर्णी तेथें येऊन पोहोंचला. शामभट्टास दहा बिघे जमीन द्यावी अशाबद्दलचें लिहून आलें आहे असें त्यानें शामभट्टास कळविलें. तें ऐकून शामभट्ट म्हणाला—"बटो, तुलाहि दहा बिघे जमीन देण्याचें स्वामींनीं कबूल केलें आहे, त्याप्रमाणें मौजे कोथरूड येथील पाटिलास हुकूम गेला असेल. ती जमीन मिळाल्यावर तुला आपल्या मुलाबाळांचें संगोपन करण्यास बराच आधार होईल. तूं आपली जोशीपणाची वृत्ति चालवूं नये अशी स्वामींची आज्ञा तुलाहि झालेली

आहे हें तूं ध्यानांत ठेव. सत्पुरुषाची आज्ञा पाळावी असें शास्त्रांत सांगितलें आहे. " असें म्हणून शामभट्टानें आपली पडशी आणण्याकरितां बटोला सांगितलें. ती त्यानें आणल्यावर त्यांतील कांहीं द्रव्य, सुपाऱ्या, नारळ, खोबऱ्याच्या वाट्या, चोळीचे खण, पागोटीं वगैरे सामान शामभट्टानें बटोला दिलें. तें घेऊन बटो खुष झाला. आपल्या मुलाबाळांचें संगोपन करण्याची काळजी फारशी राहिली नाहीं असें वाटून त्याला समाधान झालें. शामभट्टाच्या गैरहजिरींत बाणेरें या गांवीं मिळालेली सर्व मिळकत बटोची आहे असें समजून तीहि शामभट्टानें त्यास दिली. नंतर शामभट्टाला व लक्ष्मीला नमस्कार करून बटो आपल्या गांवीं गेला. जमीन, बरेंच द्रव्य व सामान मिळाल्यामुळें घरीं जातांना बटोस फारसें वाईट वाटलें नाहीं.

बटो गेल्यावर चिंचवडचा कुळकर्णी शामभट्टास ह्मणाला—" जोशीबुवा, तुझी गांवाला गेल्यानंतर गंगाधरपंताचा जांवई वारला तेव्हां त्याच्या घरीं एकच आकांत झाला. त्याच्या मनांत आपली मुलगी रबड्याच्या मुलाला द्यावयाची होती. तो मुलगा सशक्त व निरोगी आहे व रबड्याचें घराणें चांगलें आहे, परंतु त्याच्या टिपणाशीं एकनाडी येते असें तुह्मीं सांगितल्यावरून त्याचा हिरमोड झाला. गंगाधरपंताचा तुमच्यावर अत्यंत भरंवसा होता ह्मणून तुमच्या ह्मणण्याप्रमाणें चांगले चांगले मुलगे त्यानें टाकून दिले. शाळिग्रामाच्या मुलाच्या टिपणाशीं मुलीचें टिपण सो-

ळा आणे जमलें व छत्तीस गुण उतरले असें तुह्मीं सांगितल्यावरून गंगाधरपंतानें आपली मुलगी त्या मुलाला दिली; परंतु लग्न झाल्यापासून तीन महिन्यांच्या आंतच ती विधवा झाली. याबद्दल सर्व दोष गंगाधरपंत तुह्माला देत आहे व सर्व गांवांत त्यानें तुमची निंदा करण्याचें काम मांडिलें आहे. गंगाधरपंत आतांच तुमच्याकडे येणार आहे."

हें कुळकर्ण्याचें बोलणें चाललें असतां शामभट्ट दुसऱ्या विचारांत निमग्न झाला होता म्हणून त्यानें कुळकर्ण्याचें सर्व बोलणें ऐकिलें नव्हतें. शामभट्ट विचार करीत बसल्यावर देहभान विसरतो हें आपणांस त्याच्या पूर्व इतिहासावरून कळलेंच आहे. आपल्या बोलण्याला शामभट्ट कांहींच उत्तर देत नाहीं हें पाहून कुळकर्ण्यास आश्चर्य वाटलें. तो पुन्हा म्हणाला—"जोशीबुवा, गंगाधरपंत आपणाकडे येणार आहे."

'जोशीबुवा' या नांवानें हांक मारल्याबरोबर शामभट्टास ती ऐकूं गेली. आपल्या विचारांत कुळकर्ण्यानें व्यत्यय केला याबद्दल त्यास थोडासा राग येऊन तो म्हणाला—"गंगाधरपंत मजकडे येणार आहे ह्यांत नवल काय आहे? माझ्या भेटीला व मला प्रश्न विचारण्यासाठीं सर्व गांव मजकडे येईल. ज्योतिःशास्त्र इतकें मोठें आहे कीं जोशाची गरज सर्वांना लागते. हजामत कोणत्या वारीं, कोणत्या तिथीस, कोणत्या नक्षत्रावर केली असतां काय फळ मिळेल; कोणत्या नक्षत्रावर कोणाची भेट घ्यावी; को-

णत्या दिवशीं नवें वस्त्र नेसावें; कोणत्या दिवशीं गांवाला जावें; राजाला कधीं भेटावें; धान्य कधीं पेरावें; घर कधीं बांधावें; गाय, बैल कधीं घ्यावीं; पुरलेलें द्रव्य कधीं काढावें; ह्या सर्व गोष्टी मला कळतात. मुलाला पाळण्यांत कधीं घालावें, त्याचा कान कधीं टोंचावा, त्याचें उष्टावण कधीं करावें, त्याचें चौल केव्हां करावें; त्याची मुंज कधीं लावावी, त्याचें लग्न कोणत्या मुलीशीं करावें, लग्नाचीं बोलावणीं कधीं करावीं, वरात कधीं न्यावी, असे अनेक विषय मला करतळामळ झाले आहेत. इतकेंहि असून प्रश्नांचीं उत्तरें देण्यास मला बिलकुल उशीर लागत नाहीं. प्रत्येक प्रश्नाचें उत्तर देण्यास माझी तयारी असते. हरविलेल्या वस्तूंचा शोध करा, पाण्यांत पडलेल्या वस्तूंचा शोध करा, परगांवांहून, डोंगरांतून, दऱ्याखोऱ्यांतून येणाऱ्या मनुष्याचा शोध करा, चोरून नेलेल्या वस्तूंविषयीं प्रश्न करा, दुसऱ्याच्या मनांत काय आहे तें विचारा, ऊर्जितकाळ कधीं येईल तें पहा, परीक्षा उतरेल कीं नाहीं तें विचारा, ह्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें देण्यास मी तयार आहें. माझी गरज सर्वांना लागते म्हणून माझ्यावांचून कोणत्याहि मनुष्याचें चालणार नाहीं. ”

कुळकर्ण्याचा ज्योतिषावर भरंवसा होता म्हणून त्याला शामभट्टाचें बोलणें गोड लागलें. तें संपण्यापूर्वीच गंगाधरपंत तेथें येऊन बसला होता. ज्योतिषाप्रमाणें वागून त्याचें नुकसान झालें होतें म्हणून त्याला मात्र तें पसंत पडलें नाहीं. तो म्हणाला—

" जोशीबुवा, तुम्ही ज्या ज्या गोष्टी बोललांत त्यांविषयीं ज्योतिःशास्त्रांत लेख आहेत खरे. परंतु तुम्हीं सांगितल्याप्रमाणें घडलें नाहीं म्हणजे लोकांनीं काय करावें याविषयीं कोठेंच निर्णय केलेला नाहीं. ज्योतिषाप्रमाणें वागल्यावर जें लोकांचें नुकसान होतें तें कोणीं भरून द्यावें ? मी आपल्या बुद्धीप्रमाणें चाललों असतों तर माझ्या कर्माबद्दल अर्थात् मीच जबाबदार झालों असतों, परंतु मीं तुमच्या मताप्रमाणें काम केलें आहे तेव्हां त्या कामाच्या बऱ्यावाईटाबद्दल तुम्ही जबाबदार आहांत. जामीनदाराच्या वचनावर विश्वास ठेवून सावकार कुळाला कर्जाऊ पैसे देतो ते त्या कुळाकडून वक्तशीर आले नाहींत म्हणजे, सावकार जामीनदारास पकडतो व त्याजकडून आपले पैसे व्याजासह भरून घेतो, त्याप्रमाणें तुमच्या वचनावर विश्वास ठेवून ज्यानें काम केलें आहे त्या कामाबद्दलचें नुकसान तुमच्याजवळून भरून कां घेऊं नये ? रूपवान्, सशक्त, निरोगी, कुळसंपन्न अशा मुलांच्या पत्रिका आणून मीं तुम्हांला दाखविल्या परंतु त्या सर्वांना तुम्हीं कांहींना कांहींतरी दूषणें ठेवून शाळिग्रामाच्या मुलाशीं माझ्या मुलीचें टिपण सोळा आणे जुळतें असें सांगितलें आणि त्याच मुलाला मुलगी देण्याच्या भरीस मला पाडिलें. त्या वेळेस मीं तुम्हांला इतकेंहि सांगून ठेविलें कीं तो मुलगा रोगी दिसतो आहे व त्याला मी आपली मुलगी द्यावी अशी माझी मनोदेवता लवत नाहीं. त्यावर तुम्हीं मला खातरीनें सांगितलें कीं त्या मुलाचे ग्रह उत्तम आहेत

व तो अल्पायुषी मरणार नाहीं. असें असूनहि माझी एकुलती एक मुलगी बालविधवा झाली आणि तिचें दुःख मला पहावें लागलें! तुम्हीं तिला सर्वपरीनें बुडविलें असें मला वाटतें व तुमच्या सांगण्यावरून मीं तिच्या जन्माचें मातेरें केलें. ह्या अशा लठ्ठ ढोबळ चुकीबद्दल मीं तुम्हांस काय म्हणावें हें मला सुचत नाहीं. एखाद्या सामान्य मनुष्याच्या सांगण्यावरून मी असा फसलों असतों तर मला त्यास शासन करतां आलें असतें. "

गंगाधरपंत बोलूं लागल्यापासून गांवांतील एकेक मनुष्य शामभट्टाच्या ओसरीवर येऊं लागलें होतें व त्याचें बोलणें संपण्यापूर्वी बरीच मंडळी तेथें जमली होती. गंगाधरपंताच्या मुलीबद्दल सर्वांना हळहळ वाटत होती, म्हणून शामभट्टाचा अपमान करण्यासारखें भाषण त्यानें केलें होतें तरी त्याबद्दल कोणास फारसें वाईट वाटलें नाहीं. जे फार भाविक पुरुष होते त्यांस मात्र तें रुचलें नाहीं. परंतु गंगाधरपंताच्या बोलण्यापासून शामभट्टाला राग न येतां उलटा त्यास आनंद झाला. तो म्हणाला—" गंगाधरपंत, तुमच्या मुलीविषयीं मलाहि वाईट वाटतें, परंतु ज्योतिःशास्त्र खरें ठरलें याचा मला आनंद वाटतो. तुमच्या मुलीच्या तनुस्थानीं रवि आणि मंगळ हे दोन बलिष्ठ ग्रह पडले आहेत. त्यांच्या फलाप्रमाणें ही गोष्ट घडली आहे. याविषयीं ग्रंथांत असें लिहिलें आहेः—' मूर्तौकरोतिविधवांदिनकृत्कुजश्चराहुर्विनष्टतनयांरविजोदरिद्रां ॥ ' तुमच्या मुलीला दीर्घायु नवरा

पाहून देऊन तिला अखंड सौभाग्यवति करावें या हेतूनें मीं शाळिग्रामाच्या मुलाची पत्रिका पसंत करून तुम्हाला दिली, परंतु मुलीच्या बलिष्ठग्रहांपुढें त्याच्या ग्रहांचा जोर चालला नाहीं याला तुमचा व माझा काय उपाय आहे ? खरें पाहिलें असतां तुमच्या मुलीचें कांहींएक नुकसान झालेलें नाहीं; कारण तिच्या नशिबांतच तसें लिहिलेलें होतें. तुमच्या मुलीनें शाळिग्रामाच्या मुलाचा मात्र घात केला ! यावरून तुम्ही असें समजा कीं मीं सांगितल्यामुळें तुमचें काडीमात्र नुकसान झालेलें नाहीं. भलत्यासलत्या मुलाशीं तुम्हीं तिचें लग्न लाविलें असतें तर तो कदाचित् तीन महिनेहि वांचला नसता व तुमच्या मुलीला याहीपेक्षां लवकर वैधव्य प्राप्त झालें असतें ! भवितव्यापुढें कोणाचेंच कांहीं चालत नाहीं. लोकांचें सुकृत अगर दुष्कृत याबद्दल जोशी कधींहि जबाबदार होणार नाहीं, व देवाच्या सत्तेपुढें कोणाचेंच शहाणपण चालणार नाहीं. ”

भाविक लोकांना शामभट्टाचें बोलणें अगदीं पसंत पडलें, परंतु ज्यांना ज्यांना गंगाधरपंताच्या मुलीबद्दल वाईट वाटत होतें व ज्योतिषाच्या खरेपणाबद्दल संशय आला होता, त्यांना तें पसंत पडलें नाहीं. गंगाधरपंत म्हणाला—“ जन्मकाळीं मुलीला वाईट ग्रह पडले आहेत असें तुम्हीं मला पूर्वी सांगितलें असतें म्हणजे मीं तिला सुस्थळीं दिली असती व निदान तिच्या खाण्यापिण्याची व वस्त्रप्रावर्णाची काळजी तरी मला वहावी लागली नसती. तसें तुम्हीं केलें नाहीं

यावरून तें तुम्हालाच कळलें होतें कीं नाहीं याबद्दल मला शंका वाटते. बेरेंवाईट होणें दैवाधीन आहे व देवाच्या सत्तेपुढें मनुष्याचें शहाणपण चालत नाहीं असें जरी तुम्हीं मला सुचविलें असतें तरी मला माझ्या मनाप्रमाणें योग्य तजवीज करतां आली असती. तसेंहि तुम्हीं मला सांगितलें नाहीं, यावरून मला असें वाटतें कीं तुम्हीं आतां कांहींतरी कारण शोधून काढिलें आहे."

हें ऐकून शामभट्ट रागानें ह्मणाला.—"ज्योतिष खरें नाहीं किंवा तें मला समजत नाहीं असें तुह्मी मानित असाल तर ती मोठी चूक आहे. एका देवाशिवाय सर्व लटिका मायेचा पसारा आहे असें ह्मणाऱ्या एका सत्पुरुषानें[1] अशाच प्रकारची कटकट माझ्या कपाळाशीं केली होती परंतु त्याविषयीं माझी खातरी झाली नाहीं."

गंगाधरपंत ह्मणाला—"मी विद्वान् नसल्यामुळें ज्योतिष खोटें आहे असें मला सिद्ध करून देतां येणार नाहीं, परंतु ज्योतिषापासून लोकांना उपयोग होत नाहीं हें खरें करून दाखविण्यास मी तयार आहें. या पृथ्वीवर कोट्यावधि मनुष्यें आहेत त्यांपैकीं फलज्योतिषावर पूर्ण विश्वास ठेवून चालणारे असे फक्त ब्राह्मण लोकच आहेत व त्यांची संख्या फारच थोडी

---

१ म्हणजे रामदास स्वामींनीं असा शामभट्टाच्या बोलण्याचा अर्थ होता असें स्पष्ट दिसतें; परंतु त्यानें स्वामींचें नांव घेतलें नाहीं. स्वामींच्या वचनावर लोक जास्त विश्वास ठेवतील ही भीति त्याला वाटली असावी.

आहे. विश्वास न ठेवणाऱ्या लोकांपेक्षां ब्राह्मण मूठभर उंच वाढलेले आहेत, सशक्त आहेत किंवा सुखी आहेत असें दिसत नाहीं. मुसलमान लोक वेळ अवेळ न पाहतां केवळ देवाचें नांव घेऊन कामें करतात, ते ब्राह्मणांपेक्षां कमी न होतां आज त्यांवर राज्य करीत आहेंत. नवरानवरीचे छत्तीस गुणांचा मेळ न पाहतां किंवा मंगळाच्या स्थानाचा विचार न करतां ब्राह्मणेतर जातींत लग्नें होतात, तीं वधुवरें ब्राह्मणांपेक्षां कमी सुखांत काळ घालवितात, अल्पायुषी मरतात, किंवा संतति झाल्यावांचून राहतात असें ह्मणतां येणार नाहीं. मुहूर्त व पत्रिका पाहून ब्राह्मणांस मोठासा उपयोग झाला आहे असें दिसत नाहीं. कांहीं कांहीं वाईट मात्र झालेलें ऐकूं येतें, त्याची हकीकत आतांच येथें तुह्मांला कळणार आहे. जें घडावयाचें तें कालत्रयीं चुकणार नाहीं हें जर खरें आहे तर मुहूर्त व पत्रिका पाहण्याचे खटाटोप पाहिजेत तरी कशाला ? जो ईश्वर सर्व गोष्टी घडवितो त्याच्या भजनानें व पूजेनें आपलें कल्याण होणार आहे. ज्योतिषाच्या, मंत्राच्या किंवा तंत्राच्या योगानें आपलें कल्याण होणार नाहीं असें मला आतां वाटूं लागलें आहे. ज्योतिष मंत्र किंवा तंत्र व्यर्थ आहेत.ज्योतिषाचा ताळा आला नाहीं अशा गोष्टी आपल्या याच गांवांत पुष्कळांस माहीत आहेत व तुमची खातरी करून देण्याकरितां मीं त्या लोकांना येथें आणिलें आहे. ”

असें ह्मणून गंगाधरपंतानें आपल्याजवळ बसलेल्या मनुष्याकडे पाहून त्यास मानेनें खूण केली तेव्हां तो

ह्मणाला—" माझ्या जमिनीचा कौल घेण्याकरितां मला जहागिरदाराकडे जावयाचें होतें. मी शामभट्टाकडे मुहूर्त पाहण्यासाठीं गेलों तेव्हां त्यानें मला सांगितलें कीं, तूं आज गेलास तर तुझें काम होणार नाहीं. आठ दिवसांनीं गेलास तर तें होईल. त्याप्रमाणें मीं केलें; परंतु पुण्यास गेल्यावर मला कळलें कीं, मी आठ दिवसापूर्वी आलों असतों तर माझें काम हटकून झालें असतें. जहागिरदार परगांवीं निघून गेले होते व जाण्यापूर्वी मला कौल देण्याचा आहे असें ते आपल्या कारकूनाजवळ बोलले होते. "

ही गोष्ट संपल्यावर गंगाधरपंतानें दुसऱ्या एका गृहस्थास खूण केली तेव्हां त्यानें आपली गोष्ट सांगितली. तो ह्मणाला " माझ्या मुलाला बारीक ताप येत होता व त्याची प्रकृति बरी नव्हती. शामभट्टानें दिलेल्या मुहूर्तावर मीं त्याचा कान टोंचला तरी मुलाचा ताप वाढून तो शेवटीं मरण पावला. "

भामट्यानें फसविल्याची एक गोष्ट एकानें सांगितली ह्मणजे ऐकणारास जशी दुसऱ्या एका गोष्टीची आठवण होते, त्याप्रमाणें तेथें बसलेल्या मंडळीस एकेक गोष्टीचें स्मरण होऊं लागलें. दहा पांच प्रश्न केलेले असले म्हणजे त्यांतून निदान पांचांचीं उत्तरें तरी चुकलेलीं असतातच, हा अनुभव प्रश्न विचारणारांस आलेला असतो. मुलाच्या कान टोंचण्याची गोष्ट संपली नाहीं तोंच एक गृहस्थ म्हणाला. " अहो, मी चांगला मुहूर्त पाहून उत्तम शकुनावर घरून निघालों होतों परंतु वाटेंत गाडी उलटून माझा

पाय मोडला, तेव्हांपासून 'नारायणराव लंगडा' असें नांव मला मिळालें!"

चवथा गृहस्थ म्हणाला—"माझी गोष्ट यापेक्षां दुःखाची आहे. घर बांधण्यास महिना व नक्षत्र कोणतें? घराचें तोंड कोणीकडे करावें, शिलान्यास, शेषाचें मुख, घटित काष्ठ काम उभें करण्यास मुहूर्त, स्तंभचक्र, आढ्यास मुहूर्त, गृहारंभास लग्नशुद्धि इत्यादि गोष्टींचा चांगला विचार करून जोशीबुवाच्या सल्ल्यानें मीं नवीन घर बांधिलें, परंतु त्यांत मी जाऊन राहिल्यावर एका महिन्याचे आंतच माझा मुलगा मेला! यापेक्षां दुःखाची कोणतीच गोष्ट नसेल."

हें ऐकून पांचवा गृहस्थ म्हणाला—"तुमच्या गोष्टीपेक्षांहि माझी गोष्ट हृदयद्रावक आहे व तिची नुसती आठवण झाली ह्मणजे माझ्या डोळ्यांना पाणी येतें." असें बोलतांना त्या गृहस्थानें आपले डोळे पुसले, नंतर तो आपली गोष्ट सांगूं लागला. "आपले ग्रह पहावे असें मनांत येऊन मीं आपली पत्रिका एका ज्योतिषास दाखविली, त्याचें नांव येथें सांगण्याची मला जरूर नाहीं. माझी पत्रिका पाहून त्यानें मला एक अपूर्व गोष्ट सांगितली. ती त्यानें मला कळविली नसती तर मला दुःख झालें नसतें, व मजसारखा सुखी प्राणी त्रिभुवनांत सांपडला नसता असें मला वाटतें. जोशी ह्मणाला 'तुझी बायको वाईट चालीची असावी असे ग्रह तुझ्या जन्मकाळीं पडले आहेत.' माझ्या बायकोवर माझें अत्यंत प्रेम होतें व तिचेंहि माझ्यावर तसेंच होतें, ह्मणून मला जोशाचें

बोलणें प्रथमतः खरें वाटलें नाहीं. तथापि ज्योतिष कधीं कधीं खोटें ठरतें हें मला माहीत नव्हतें ह्मणून मी मोठ्या काळजींत पडलों. कोणते ग्रह वाईट पडले आहेत व त्यांविषयीं ग्रंथांत काय लिहिलें आहे तें समजण्याकरितां मी जोशास प्रश्न केला तेव्हां त्यानें मला हा श्लोक ह्मणून दाखविला. (तिग्मांशुभौमरविजाःकलिसप्तमस्थाजायांकुकर्मनिरतांतनुसंततिंच । जीवेंदुभार्गवबुधाबहुपुत्रयुक्तांरूपांन्वितांजनमनोहररूपशीलां ॥) तो ह्मणाला. ' तुझ्या जायास्थानीं मंगळ आहे. त्याचें फळ असें लिहिलें आहे. ' हा श्लोक व ज्योतिषग्रंथ हे दोन्ही खोटे आहेत असें मला एकाएकीं ह्मणवेना. तेव्हांपासून माझ्या मनांत माझ्या बायकोविषयीं कुकल्पना येऊं लागल्या. जोशापासून मीं तो श्लोक लिहून घेतला आणि मंगळाच्या फळाविषयीं भलतेसलते विचार माझ्या मनांत येऊं लागले. माझ्या बायकोनें नीटनेटक्यानें वेणीफणी केली, फुलें डोक्यांत घातलीं, उत्तमान्न शिजविलें तर मला मंगळाच्या फलाची आठवण होई व ती हें दुसऱ्याकरितां करीत आहे कीं काय अशी दुष्ट कल्पना माझ्या मनांत येई! ती चांगलें लुगडें नेसून देवदर्शनाला गेली अथवा शेजारींपाजारीं गेली तरी मला शंका येऊं लागली. त्या श्लोकाच्या पायीं मी अगदीं वेडावून गेलों. "

"अशी माझी स्थिति असतां माझा मित्र माझ्या घरीं आल्यावर त्याची सुद्धां मला शंका येऊं लागली. घरीं एखादा पाहुणा आला व बायकोनें त्याचें आदरातिथ्य केलें, ती त्याच्याशीं गोड बोलली, किंवा तिनें

त्याला टांकभर तूप जास्त वाढलें, तर देखील माझ्या मनांत कुकल्पना येऊं लागली! माझा स्वभाव शांत व ममताळू होता तो उतावळा व निष्ठुर झाला. मीं फटकन् भलतेंच बोलूं लागलों. तिला घराबाहेर जाण्याची चोरी झाली. शृंगार किंवा नीट वेणीफणी केल्यापासून तिला मजकडून त्रास होऊं लागला. मीं तिला कोणाशीं बोलण्याची सक्त मनाई केली. माझ्या स्वभावांत असें अंतर कां पडलें हें तिला कळेना. एकदां रडून व माझ्या पायां पडून ती ह्मणाली. 'तुह्मी मला असें कां हो छळतां? मी कोणता अन्याय केला आहे तो मला सांगा, मी पुन्हां तसें करणार नाहीं.' अन्याय सांगण्यासारखा कांहींच नव्हता ह्मणून मला तो सांगतां आला नाहीं. तूं नीट वागत जा व मी सांगितलेलें ऐकत जा, अशा प्रकारें कांहीं तरी सांगून मी तिची समजूत केली, व ती साध्वी तेवढ्यावर संतुष्ट होऊन आपल्या कामाला लागली, परंतु माझ्या मनाची भ्रांति फिटली नाहीं. मला असें वाटूं लागलें कीं मी सावध आहें व ती असावध आहे, तेव्हां मीं तिला कोठेंतरी पकडीन. नंतर तिला वाईट शब्द बोलण्याचें सोडून देऊन तिच्या पाळतीवर मी राहूं लागलों. मी बाहेर जातों असें सांगून कोठेंतरी जवळपास बसूं लागलों. अशा खटपटीस मी लागलों, परंतु तिचें वांकडें पाऊल मला दिसेना."

"आठ दिवसांनीं परत येईन असें खोटें सांगून एकदां मी गांवाला गेलों, परंतु चवथे दिवशींच मी परत घरीं आलों. तेव्हां मला असें दिसलें कीं माझी

बायको लाडू करीत बसली आहे व माझीं मुलें तिच्या-भोंवतीं बसलीं आहेत. मी कोणाशीं कांहींच बोललों नाहीं. मुकाट्यानें आंगरखा व पागोटें काढूं लागलों तेव्हां मी आपल्या एका मुलाच्या तोंडचें बोलणें ऐकलें. तो म्हणाला. 'हे सगळे लाडू बाबाला द्यावयाचे कायग, आणि आम्हांला कांहींच नाहीं ?' त्यावर ती म्हणाली. 'उगीच बैस. मोठ्यानें बोलूं नकोस.'

"हे शब्द माझ्या कानीं पडतांच मला जोशानें केलेल्या भाकिताची व सांगितलेल्या श्लोकाची आठवण झाली. मी आपल्या मनांत समजलों कीं मी आठ दिवसांनीं परत येणार असें तिला ठाऊक असतां तिनें ज्या बाबाकरितां लाडू केले आहेत तो 'बाबा' दुसरा असला पाहिजे ! फार दिवसांपासून टपत असल्यामुळें मीं आज तिला पकडलें असें मला वाटून कांहींएक विचारपूस न करतां मीं आपलें तोंड सोडलें. ज्योतिष खरें झालें असें मला वाटून मी अगदीं वेडा झालों. जोशानें मला सांगितल्यापासून जरी मी तिला त्रास देत होतों तरी ती वाईट चालीची आहे असें मीं तिला कधींहि म्हटलें नव्हतें, तें तेदिवशीं म्हटलें. माझें बोलणें ऐकल्याबरोबर तिच्या अंगाची आग होऊन ती म्हणाली. 'दुसरीं कांहीं दूषणें तुम्हीं मला दिलीं असतीं तरी मीं तीं निमूटपणें सोसलीं असतीं; परंतु आतां मात्र कडेलोट झाली.' असें म्हणून रागाच्या झपाट्यांत तिनें जाऊन विहिरींत उडी टाकली."

"तिला अतिशय राग आला होता हें मला कळलें होतें, परंतु ज्योतिषाचा ताळा पटला असें समजून अ-

सली बायको मेली तरी पतकरलें असें मला वाटून मी तिला खुशाल जाऊं दिलें ! तिचें मजवर अतिशय प्रेम होतें व मीं तिला जाऊं दिलें नसतें तर तिनें माझें कदाचित् ऐकिलें पण असतें. "

"विहिरींतून तिला लोकांनीं बाहेर काढली तेव्हां लज्जेस्तव मीहि तेथें गेलों.मी गेलों तेव्हां तिच्यांत धुगधुगी होती. मरतेसमयीं तिनें माझ्याकडे डोळे वटारून प्राण सोडला. इतक्यांत तिचा बाप–म्हणजे माझा सासरा–तेथें आला,व त्याला पाहून माझ्या काळिजांत चर्र झालें. त्याच्या तोंडानें मला असें समजलें कीं तो पूर्व दिवशीं माझ्या गांवीं आला व ते दिवशीं माझ्या घरीं भोजन करून तो आपल्या गांवीं परत जाणार होता व त्याच्याकरितां माझ्या बायकोनें ते लाडू केले होते ! ही गोष्ट मला कळली तेव्हां माझें अंतःकरण फाटून गेलें, व ती ऐकून लोकांनीं माझी 'छी थु' केली. त्यावेळीं झालेलें दुःख रडून व डोळ्यांला पाणी आणून मात्र मला सांगतां येतें; तें शब्दांनीं वर्णन करतां येत नाहीं. "

असें म्हणून त्या गृहस्थानें आपले डोळे पुसले, तें पाहून सर्वांसच वाईट वाटलें. ज्योतिषाच्या नादामुळे व ज्योतिष खरें आहे असा भरंवसा ठेविल्यामुळें हा मोठा अनर्थ झाला, असें लोक बोलूं लागले. परंतु ह्या गोष्टी ऐकून शामभट्टास फार राग आला. तो म्हणाला—"कलीच्या महिम्याप्रमाणें तुमची बुद्धि फिरली आहे असें मला वाटतें. पूर्वी तुम्हीच भक्तिभावानें येऊन मौंजी, लग्न इत्यादि कार्याविषयीं मला प्रश्न करीत होतां व मी सांगेन त्याप्रमाणें वागत होतां; प-

रंतु आज तुम्ही शास्त्राला नांवें ठेवूं लागला आहां. हा कलीचा प्रभाव आहे. परंतु मी तुम्हांला सांगून ठेवितों कीं तुम्ही ज्योतिषावर विश्वास न ठेवाल तर तुम्ही आपलें अतोनात नुकसान करून घ्याल."

असें बोलून शामभट्ट कांहीं वेळ स्तब्ध बसला. त्यास असें वाटलें कीं नुकसान होण्याच्या भीतीनें लोक माझें आर्जव करतील व मला प्रश्न विचारूं लागतील. परंतु कोणीच प्रश्न करीत नाहीं असें पाहून तो पुन्हा बोलूं लागला. "तुमचा ज्योतिषावर भरंवसा राहिला नाहीं तर मलाहि पंचाग पाहण्याची गरज उरली नाहीं. आजपासून एक वर्षपर्यंत मी कोणाला प्रश्न किंवा मुहूर्त सांगणार नाहीं, किंवा कोणाची पत्रिका करणार नाहीं. ज्योतिष्याचा विचार घेतल्याशिवाय तुम्ही आपलीं कार्यें अविंधासारखीं कशीं करतां ती मजा मलाहि पहावयाची आहेः मी मजा पाहणार आहें, हो खचित पाहणार आहें." असें म्हणून त्यानें आपला उजवा हात नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें खालीं वर केला. नंतर तो म्हणाला– "तुमची कार्यसिद्धि होऊं लागली नाहीं म्हणजे तुम्ही आपण होऊनच माझ्याकडे प्रश्न विचारण्यास याल व माझें आर्जव कराल."

हें शामभट्टाचें निकराचें बोलणें ऐकून भाविक लोकांस अतिशय भय वाटलें व इतर लोकांकडून झालेल्या अपराधांबद्दल त्यांनीं नाक घांसून क्षमा मागितली, परंतु शामभट्टानें एकच आग्रह धरला. "एक वर्षपर्यंत मी आपला नेम मोडणार नाहीं" असें

त्यानें खडसून सांगितलें तेव्हां भाविक लोकांचा निरुपाय होऊन हें आलेलें संकट कसें टळेल असें त्यांस वाटूं लागलें. गंगाधरपंतासारखे नास्तिक तेथें बसले होते त्यांना तशी भीति वाटली नाहीं. त्यांनीं भाविक लोकांची समजूत घालून त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांच्या बोलण्यावर भाविक लोकांचा विश्वास बसला नाहीं. त्यांनीं शामभट्टाचे गच्च पाय धरले, तेव्हां निरुपायास्तव रामदास स्वामींची तशी मला आज्ञा झाली आहे असें शामभट्टास सांगावें लागलें!

रामदास स्वामींच्या आज्ञेवरून शामभट्टानें जोशीपणाचें काम सोडलें आहे असें ऐकून भाविक लोकांनीं त्याचे पाय सोडले. त्यांची कंबरच बसली व शामभट्टास नेम मोडण्याविषयीं आग्रह करण्याचें काम त्यांनीं सोडून दिलें. गंगाधरपंत व इतर अभाविकांस या गोष्टीचा हर्ष झाला, तेव्हां गंगाधरपंत सर्व लोकांस ह्मणाला—" कलियुगांत मुहूर्त, शकुन व मंत्र खोटे ठरतील असें पूर्वीच कथन करून ठेविलें आहे. 'कलौसंभवंतिनसंभवंति' असें विद्वानांस ह्मणतांना मीं ऐकलें आहे. असें जर आहे तर स्वामींनीं शामभट्टास आज्ञा केली ती बावगी आहे असें ह्मणतां येणार नाहीं."

मुहूर्त, शकुन व मंत्र कलियुगांत खोटे ठरतील या विषयीं पुस्तकांत आधार आहे असें समजल्याबरोबर शामभट्टास तें खोटें ह्मणवेना. पुस्तकांत लिहिलेल्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत असें तो समजत होता हें आपणांस कळलेंच आहे. तथापि आपल्या पुस्तकांस अगदीं कायमची गांठ मारून ठेवावी ही गोष्ट त्याला

मानवली नाहीं; मात्र एक वर्षपर्यंत पुस्तकांप्रमाणें वर्तन करावयाचें नाहीं असा त्यानें कायमचा निश्चय केला. या वेळेस शामभट्टाचें माथें इतकें फिरून गेलें कीं त्यानें सर्व लोकांस आपापल्या घरीं जाण्यास सांगितलें. ज्योतिष्यावांचून आपले कामधंदे सुरळीत चालणार नाहींत असें ज्यांस वाटत होतें ते तेथून हालले नाहींत असें पाहून शामभट्टानें त्या सर्वांना हाकून लावलें व माझ्या घरीं फिरून आलांत तर मी तुम्हांस शिक्षा करीन असें भय घातलें. नंतर त्यानें पुढें एक वर्षपर्यंत आपलें घर सोडलें नाहीं व फलज्योतिषाविषयींचे चमत्कार करून दाखविले नाहींत. त्यामुळें त्याला पुन्हा पाण्यांत पडून भिजावें लागलें नाहीं, उलटें टांगून घ्यावें लागलें नाहीं, तापांत हजामत करावीशी वाटली नाहीं, चिंत्रें मनुष्याप्रमाणें दिसलीं नाहींत, किंवा शेतकऱ्यांच्या, मुलांच्या अगर शिपायांच्या हातून अप्रतिष्ठा करून घ्यावी लागली नाहीं.

स्वामींचा अनुग्रह शामभट्टावर झाला खरा, परंतु त्यापासून लोकांचेंहि पुष्कळ कल्याण झालें. समर्थांचा महिमा थोर आहे. त्यांची कृपा झाली ह्मणजे मनुष्यमात्राचा फायदा होतो हें अगदीं खरें आहे. शामभट्टानें ज्योतिषाचा नाद सोडून दिल्यामुळें बिचाऱ्या लक्ष्मीला अत्यंत सुख होऊं लागलें. तिला विचारल्यावांचून शामभट्ट पुन्हा एक वर्षपर्यंत घराबाहेर गेला नाहीं, किंवा त्यानें तिला कोणत्याहि प्रकारें दुखविलें नाहीं.

गोविंदपंतानें आपल्या मुलाला घरीं आणून ठेविलें

तरी तो पुन्हा चौकांत पडला नाहीं, त्याच्या घराला आग लागली नाहीं किंवा मूळनक्षत्राच्या दोषामुळें त्याच्या शरीरास अपाय झाला नाहीं. मुलाला परत घरीं आणल्याबद्दल यमुनाबाईला जो आनंद झाला तो सांगतां पुरवत नाहीं. गोविंदपंताचा मुलगा वीस वर्षांचा झाला तेव्हां तो शिवाजीच्या पदरीं नौकरीस राहिला व पुढें त्यानें शिवाजीला फार मदत केली.

नरसिंहभट्टाच्या बायकोस श्रीमंती आली नव्हती तरी डोकींतले दोन दागिने गेल्यामुळें ती इतकी शहाणी झाली कीं श्रीमान् होण्याकरितां पुन्हा ती जोशाच्या, सरोद्याच्या किंवा गारुड्याच्या नादीं लागून फसली नाहीं. दैवयोगानें प्राप्त झालेल्या स्थितींतच ती आनंदानें राहूं लागली व तिच्या मनाची हुरहुर दूर झाली.

आपली पत्रिका जोशाला दाखवून 'दिव्य' कांति करून घेण्याचा उपाय करावा असें रघुनाथरावास पुन्हा वाटलें नाहीं.

स्वामींच्या उपदेशापासून चिंचवडच्या लोकांचाहि बराच फायदा झाला. पत्रिका पहाण्याच्या, मुहूर्त विचारण्याच्या किंवा ग्रहांची शांति करण्याच्या भरीस न पडतां देवावर भरंवसा ठेवून एक वर्षपर्यंत त्यांनीं आपलीं कार्यें केलीं. पापडाचें पीठ भिजविणें, घर बांधणें, गांवाला जाणें, हजामत करणें अशा तऱ्हेच्या हरएक कामाकरितां उठतां बसतां मुहूर्त पहाण्यासाठीं त्यांना शामभट्टाच्या घरीं जावें लागलें नाहीं. नवरानवरीच्या पत्रिका पाहिल्यावांचून, किंवा मंगळाचा विचार केल्यावांचून लग्नें होऊं लागलीं, व आईबापांस

आपल्या इच्छेप्रमाणें चांगला, सशक्त, कुलवान् व बुद्धिमान् मुलगा पाहून आपल्या मुलीचें लग्न करतां येऊं लागलें.

शामभट्टाचें चरित्र पूर्ण करून स्वामींनीं शिवाजीकडे परत केलें असें पूर्वी सांगितलें आहे. त्याच्या हस्तलिखित प्रती करून शिवाजीनें मोठमोठाल्या गांवांतून वांटल्या आणि स्वामींच्या आज्ञेप्रमाणें सर्वांनीं वर्तन करावें असा वट हुकूम फिरविला. स्वामींची आज्ञा व शिवाजी महाराजांचा हुकूम ह्या दुजोऱ्यामुळें लोकांना ग्रहांपेक्षां देवावर जास्त भरंवसा ठेवावा लागला. नंतर ज्योतिषाचें महात्म्य अर्थातच कमी कमी होत गेलें व स्वतःच्या अकलेचा, बुद्धीचा, व पराक्रमशक्तीचा उपयोग लोक करून घेऊं लागले. श्री रामदासस्वामि, मोरयागोसावी, तुकाराम महाराज, ज्ञानदेव साधु इत्यादि सत्पुरुषांनीं लोकांना भक्तिमार्गाकडे वळवून संसारज्ञ केलें. त्या वेळच्या लोकांनीं आपापलीं कामें कशीं बजावलीं हें महाराष्ट्र देशाच्या इतिहासावरून कळून येणार आहे.

सारांश, आपल्या संसाराचे कामीं ज्योतिषाचा उपयोग घडतो कीं नाहीं हें तेव्हांच्या लोकांना शामभट्टाच्या गोष्टीपासून व श्री रामदास स्वामींच्या उपदेशापासून चांगलें कळूं लागलें. नंतर ग्रहांचा, मुहूर्तांचा किंवा अपशकुनांचा अडथळा त्यांनीं आपल्या कामाला होऊं दिला नाहीं. शामभट्टासारखे जे मिश्र वेडे होते त्यांच्या बुद्धीला मात्र मोठासा पालट पडला नाहीं. तेव्हांची स्थिति आपल्या पाहण्यांत हल्लीं येत

नाहीं हें आपलें दुर्दैव आहे असें आपण समजलें पाहिजे. शिवाजीच्या मागून लवकरच पेशवाई झाली व श्री रामदास स्वामि समाधिस्थ झाले. त्यानंतर जोशांनीं आपल्या पोथ्यांच्या गांठी निर्धास्तपणानें पुन्हा सोडून लोकांना मुहूर्ताच्या व फलज्योतिषाच्या नादीं लावण्याचें काम राजरोस आरंभिलें असावें. भोजनभाऊ रावबाजीच्या अमलांत तर त्यांची चंगळच झाली असावी व स्वामींनीं केलेला उपदेश व शामभट्टाची गोष्ट लोक अगदींच विसरून गेले असावे. त्याचीं फळेंहि त्यांना मिळाल्यावांचून राहिलीं नाहींत! हें जर खरें आहे तर श्रीच्या वचनावर विश्वास ठेवून श्रीच्या आज्ञेप्रमाणें आपण वागूं लागलों व उद्योगी झालों तर श्रीरामचंद्र अजूनहि आपणांस संसारसागरांत सुखी करील यांत तिळमात्र संदेह नाहीं.

शुद्धिपत्र.

भाग ३ रा.

पान.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
४३	१६	ठव,	ठेव,
९६	९	कळेंच	कळलेंच
१०१	१६	घेऊन	घेऊन दूर